जुलै २०२०/पाने ६०/किंमत ₹१०

लोकराज्य



जन्मशताब्दी

जलसंस्कृतीचे जनक
डॉ. शंकरराव चव्हाण

वर्धा येथील पवनार आश्रमात विनोबा भावे यांची
भेट घेताना शंकरराव चव्हाण.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेताना शंकरराव चव्हाण.

पैठण येथील जायकवाडी प्रकल्पाच्या भुमीपूजन प्रसंगी
माजी प्रधानमंत्री लाल बहाद्दूर शास्त्री आणि शंकररावजी चव्हाण.

ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी गोविंदभाई श्रॉफ यांच्यासमवेत शंकरराव चव्हाण.

शंकरराव चव्हाण यांच्या नांदेड येथील आनंद निलयम या निवासस्थानी
स्वाध्याय परिवाराचे पांडूरंगशास्त्री आठवले, अशोक चव्हाण.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्यावतीने शंकररावजी चव्हाण यांना
डिलिट पदवी प्रदान करण्यात आली. या वेळी राज्यपाल पी. सी. अलेक्झेंडर.

अंतरंग

सुसंस्काराची प्रेरणा ६
राज्याच्या सिंचन क्षमतेचा बारकाईने अभ्यास केलेले, त्याबद्दलचा व्यासंग असलेले नेते म्हणून शंकररावजींचे नाव आदराने घेतले जाते.

मंत्रालयाचे उद्‌गाते! ७
महाराष्ट्राच्या 'सचिवालया'चे 'मंत्रालय' असे नामकरण करून राज्याच्या कारभाराला त्यांनी शिस्त लावली. दूरदृष्टीचे नेते, करड्या शिस्तीचे कुशल प्रशासक ही त्यांची ओळख सदैव स्मरणात राहील.

कर्मयोगी ९
सहा दशकांच्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत त्यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर अनेक पदांच्या जबाबदाऱ्या लीलया पेलून त्या पदांना वेगळी उंची प्राप्त करून दिली.

मातीशी नाळ असलेला नेता १०
शंकररावजींनी मराठवाड्यासह राज्याला सुजलाम् सुफलाम् करण्याचा प्रयत्न केला. देशातील गरीब, आदिवासी, दलित, सर्व घटकांसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

जलतज्ज्ञ ११
शंकरराव हे उत्तम व अभ्यासू प्रशासक होते. राज्यातील पाण्याचा वापर येथील समाजजीवन बदलण्यासाठी झाला पाहिजे, यासाठी त्यांचा आग्रह होता.

शिस्तप्रिय कठोर शासक! १२
छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने आपण राज्य चालवतो आहोत आणि त्यांचीच रयतेबद्दलची नीती आपण अवलंबत आहोत, अशी भूमिका शंकरराव चव्हाण यांची होती. त्यांची कार्यपद्धती पाहिली तर त्यात तथ्य असल्याचे जाणवते.

माझे 'नाना' – माझे 'नायक'! १५
स्वातंत्र्य सैनिक राहिल्याने राष्ट्रभक्ती त्यांच्या रोमारोमात होती. भारताचे गृह व संरक्षण मंत्री असताना घेतलेल्या अनेक खंबीर निर्णयांमधून त्यांच्या देशप्रेमाची प्रचिती दिसून आली.

प्रतिभा आणि प्रतिमा १७
शंकरराव चव्हाण हे एक उत्तम प्रशासक, निष्कलंक, स्वच्छ प्रतिमेचा नेता, काहीसे कठोर व्यक्तिमत्त्व आणि परखडपणे विचार व्यक्त करणारे गृहमंत्री होते.

जलतत्वाचे साधक १९
जलसंधारण, जलसंपदा व पाणीपुरवठा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिंना शंकरराव चव्हाण यांच्या नावाने जलभूषण पुरस्कार देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

कृतार्थ ! २६
साहेबांचे आयुष्य हे रणरणत्या उन्हासारखं. त्यांनी स्वीकारलेली वाट. काट्याकुट्यांची नि अनिश्चिततेची पण त्या वाटेने त्यांचेबरोबर चालत असताना त्या उन्हाची झळ त्यांनी आम्हाला लागू दिली नाही.

सुसंस्काराची प्रेरणा	६
मंत्रालयाचे उद्‌गाते!	७
कर्मयोगी	९
मातीशी नाळ असलेला नेता	१०
जलतज्ज्ञ	११
शिस्तप्रिय कठोर शासक !	१२
लोकनेता	१४
माझे 'नाना' – माझे 'नायक'!	१५
प्रतिभा आणि प्रतिमा	१७
जलतत्वाचे साधक	१९
कणखर आणि करारी	२३
कृतार्थ !	२६
स्वच्छ चारित्र्याचा तारा	२८
स्मृतिस्मारके	३०–३१
प्रकल्पांचे शिल्पकार	३२
ध्येयप्राप्तीसाठी परिश्रम	३५
सर्वसामान्य हाच केंद्रबिंदू	३८
नम्र आणि खंबीर व्यक्तिमत्त्व	४१
अस्सल आणि सडेतोड	४४
चौफेर कर्तृत्व	४६–४७
साहित्यप्रेमी	४८
निष्ठावंत सैनिक	५१
मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०	५२
मंत्रिमंडळात ठरले !	५४
कोरोनाशी ताकदीने लढा..	५७

वर्ष ७२ वे | अंक १ | जुलै २०२०

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

मुख्य संपादक	डॉ. दिलीप पांढरपट्टे
प्रबंध संपादक	अजय अंबेकर
	सुरेश वांदिले
संपादक	अनिल आलूरकर
उपसंपादक	प्रवीण कुलकर्णी
	गजानन पाटील
	राजाराम देवकर
वितरण अधिकारी	मंगेश वरकड
वितरण साहाय्य	अश्विनी पुजारी
साहाय्य	भारती वाघ
मुखपृष्ठ रेखाचित्र	वासुदेव कामत
मुखपृष्ठ रचना	सीमा रनाळकर
मांडणी, सजावट	शैलेश कदम
मुद्रितशोधन	उमा नाबर
मुद्रण	मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., कोपरखैरणे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

(महाराष्ट्राच्या रौप्यमहोत्सवी सांगता समारोहानिमित्ताने प्रसिद्ध करण्यात आलेल्या एप्रिल १९८६ च्या 'लोकराज्य'मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या मनोगताचा संपादित भाग.)

अभिमानास्पद वाटचाल

“ महाराष्ट्र राज्य स्थापनेला १ मे १९८५ रोजी २५ वर्षे पूर्ण झाली. महाराष्ट्र राज्याची मुहूर्तमेढ १ मे १९६० रोजी भारताचे भाग्यविधाते पंडित जवाहरलाल नेहरू यांनी रोवली. १ मे १९६० हा दिवस महाराष्ट्रीय जनतेच्या दृष्टीने सोनियाचा दिन ठरला. महाराष्ट्रीय जनतेने मराठी लोकांच्या एकभाषी राज्याचे अनेक वर्षांपासून पाहिलेले स्वप्न त्या दिवशी साकार झाले. महाराष्ट्रीय जनतेचे हे स्वप्न साकारण्यामागे, महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये देशाच्या दिवंगत प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांचा मोठा वाटा होता. त्यांचे हे ऋण महाराष्ट्र कदापिही विसरणार नाही.

गेल्या २५ वर्षात महाराष्ट्राने विकासाच्या विविध क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली. सहकारी चळवळ, लोकशाही विकेंद्रीकरण, कृषिविकास, धवलक्रांती, प्रौढसाक्षरता, मुलींचे शिक्षण, सर्वांसाठी आरोग्य, कुटुंब कल्याण, समाजातील गरीब व उपेक्षित घटकांचे व आदिवासींचे कल्याण, झोपडपट्टी सुधारणा, प्रवासी वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण, भूमिहीन मजुरांना घरांसाठी जागा, कापूस एकाधिकार खरेदी, तळागाळातील व गरीब जनतेच्या आर्थिक विकासाची सनद समजल्या जाणाऱ्या २० कलमी कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, अशा अनेक बाबतीत विक्रमी यश संपादून महाराष्ट्राने भारतभर लौकिक संपादन केला.

महाराष्ट्राने सुरू केलेल्या रोजगार हमी योजनेचे सुयश बघून केंद्र सरकारने तिचा अंगीकार करून अन्य राज्यांना तो अमलात आणण्याची शिफारस केली. जागतिक बँकेनेही तिची वाखाणणी केली.

महाराष्ट्र ही जशी संतांची भूमी आहे तशीच ती देशासाठी सर्वस्वाचे बलिदान करणाऱ्या पराक्रमी शूरवीरांची आहे. महाराष्ट्रामध्ये एकाच मंचावरून भगवंताचे कीर्तन आणि वीररसाने ओथंबलेले, मनात शौर्याची भावना जागृत करणारे पोवाडे गायले जातात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सर्वधर्मसमभाव तत्त्वाचे पालन महाराष्ट्राने यथायोग्य केले असून येथे विविध धर्म, जाती, पंथांचे, प्रदेशांचे लोक अनेक पिढ्यांपासून बंधुभावाने एकोप्याने राहतात, हेच खरे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. ”

- शंकरराव चव्हाण, तत्कालीन मुख्यमंत्री

समतोल आणि समन्यायी

संपूर्ण जगाबरोबरच महाराष्ट्र कोविड-१९शी सामर्थ्याने लढा देत आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर गेल्या साठ वर्षात राज्याने अनेक क्षेत्रांत देशातील इतर राज्यांपुढे आदर्श निर्माण केला आहे. या कोविड-१९च्या लढ्यातदेखील महाराष्ट्र यशस्वी होईल, यात शंका नाही. राज्यावर अनेक संकटे आली पण या संकटांचे संधीत रूपांतर करून राज्य अग्रेसर कसे राहील याकडे राज्यकर्त्यांनी नेहमीच लक्ष दिले. यंदा राज्याच्या स्थापनेचे हीरकमहोत्सवी वर्ष सुरू आहे आणि हे जलक्रांतीचे जनक, माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्षही आहे. महाराष्ट्राच्या उभारणीचा ज्या धुरीणांनी पाया रचला त्यात त्यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल.

महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास व्हायला हवा असेल तर येथील शेतकऱ्यांचे पावसावरील अवलंबित्व कमी करायला हवे हे शंकरराव चव्हाण यांनी ओळखले होते. शिवाराला पाणी दिले तर शेती फुलेल आणि देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यास मदत होईल. दुष्काळाचे परिणामही कमी होतील, हे ओळखून त्यांनी धोरणे आखली व अमलात आणली. राज्याचे पाटबंधारे व ऊर्जा मंत्री आणि दोन वेळा मुख्यमंत्रिपदी राहिलेल्या शंकररावजींच्या कार्यकाळात अनेक धरणांचा आणि ऊर्जा प्रकल्पांचा पाया रचला गेला. त्या प्रकल्पांना मूर्त रूप येऊन लाखो हेक्टर जमीन सिंचनाखाली आली. राज्याच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण झाल्या. राज्यातील नद्यांचे पाणी शेती, उद्योगाला मिळाले पाहिजे. त्यासाठी मोठी धरणे बांधली पाहिजेत, हे धोरण राबवतानाच पाण्याचे समन्यायी वाटप झाले पाहिजे. त्यातून दुष्काळ हटवण्याचा प्रमुख उद्देश सफल झाला पाहिजे, यासाठी ते कमालीचे आग्रही होते. दुष्काळग्रस्त शेतकऱ्याला दोन पिकांसाठी पाणी उपलब्ध झाले तर त्यातून शेती आणि शेतकरी विकासाला चालना मिळेल, असे त्यांचे मत होते. पाणी हा त्यांचा केवळ जिव्हाळ्याचा नव्हे तर अभ्यासाचा विषय होता. त्यामुळे इतर राज्यांबरोबर पाण्याचे तंटे सोडवताना महाराष्ट्राच्या हिताला बाधा येणार नाही याची त्यांनी पुरेपूर काळजी घेतली. हक्काचे पाणी महाराष्ट्राच्या विकासासाठी वापरता आले पाहिजे यासाठी मोठे प्रकल्प हाती घेतले आणि ते पूर्णत्वास नेले.

शिस्त हा शंकररावजींचा स्थायिभाव होता. स्वातंत्र्यानंतर सर्वच आघाड्यांवर देश आणि पर्यायाने राज्ये विकासमार्गावर चालायची असतील तर शिस्तीशिवाय पर्याय नाही हे त्यांचे मत होते. त्यामुळेच राज्याचे मंत्री, मुख्यमंत्री आणि केंद्रीय गृहमंत्री म्हणून काम करत असताना त्यांनी शिस्तीला महत्त्व दिले. विशेषतः राज्याची आर्थिक घडी बिघडू नये यासाठी कठोर निर्णय घ्यायला मागेपुढे पाहिले नाही. त्यांच्या निर्णयावर प्रसंगी टीका झाली पण कालांतराने तेच निर्णय कसे योग्य होते आणि राज्याच्या हिताचे होते हे त्यांचे टीकाकारही मान्य करतात.

उच्चविद्याविभूषित असलेल्या शंकररावजींनी लोकहित हे सर्वोपरी मानले. राज्यातील विविध विभागांचा विकास होत असताना त्यात समानता असावी, कोणताही विभाग विकासाच्या मार्गावर मागे राहू नये, याकडे विशेष लक्ष दिले. दुष्काळाला सातत्याने सामोरे जाणाऱ्या मराठवाड्याच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवले. राज्याच्या प्रगतीत वाटा उचलणाऱ्या विविध प्रकल्पांकडे बघितले की, त्याचे श्रेय शंकररावजींच्या दूरदृष्टीला आणि निर्णय प्रक्रियेला द्यावे लागेल.

कला, साहित्य आणि क्रीडा प्रकारांचे आस्वादक असलेल्या शंकररावजींनी कलाकारांचा मान राहिला पाहिजे, त्यांना व्यासपीठ मिळाले पाहिजे यासाठी सातत्याने प्रयत्न केले. ऐन तारुण्यात स्वातंत्र्य चळवळीत आणि मराठवाडा मुक्तिसंग्रामात ते सहभागी झाले होते. त्यामुळे शासन हे गरिबांच्या कल्याणासाठी राबवले पाहिजे ते मूठभरांच्या हितासाठी असता कामा नये ही धारणा त्यांनी आयुष्यभर जोपासली. शंकररावजींच्या जन्मशताब्दीवर्षानिमित्त राज्य शासनातर्फे विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या वर्षीपासून जलसंपदा, जलसंधारण आणि पाणीपुरवठा क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींना 'जलभूषण पुरस्कारा'ने गौरवण्यात येणार आहे. त्याचबरोबर नांदेडमध्ये शंकरराव चव्हाण यांचे स्मारकही उभारण्यात येणार आहे.

राज्य कोविड-१९शी लढा देत आहे. अशा वेळी शंकररावजींनी दाखवलेल्या कडक शिस्तीच्या मार्गावरूनच पुढे जाणे आवश्यक आहे. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त प्रकाशित होत असलेल्या 'लोकराज्य'च्या विशेषांकाचा उद्देश त्यांचे कार्यकर्तृत्व नव्या पिढीसमोर आणण्याबरोबरच त्यांनी दाखवून दिलेली मूल्ये आजही किती महत्त्वाची आहेत हे अधोरेखित करण्याचा आहे.

डॉ. दिलीप पांढरपट्टे
(मुख्य संपादक)

शंकरराव चव्हाण यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. यानिमित्त राज्य शासन विविध उपक्रम राबवत आहे. त्यांनी पाणीप्रश्नी केलेले कार्य नेहमीच प्रेरणादायी ठरले आहे. राज्याच्या समतोल विकासावरच भविष्यातही भर द्यावा लागेल.

सुसंस्काराची प्रेरणा

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री

जुन्याजाणत्या राजकीय व्यक्तिमत्त्वांचा उल्लेख करताना, माजी मुख्यमंत्री शंकररावजी चव्हाण यांचे नाव अग्रक्रमाने नजरेसमोर येते.

अभ्यासू वृत्ती, बहुभाषिक पारंगतता, गटबाजीपासून दूर राहण्याचा स्वभाव, निष्कलंक चारित्र्य, स्वच्छ प्रतिमा यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व इतरांपेक्षा नेहमीच वेगळे भासत असे. सचोटी, टापटीप, हाती घेतलेल्या कामात झोकून देण्याची वृत्ती हे त्यांचे गुणविशेष होते. कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना शंकरराव चव्हाण आपल्या स्वकर्तृत्वाने मोठे झाले. त्यांच्या रूपाने मराठवाड्याला पहिल्यांदाच मुख्यमंत्रिपद मिळाले.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू त्यांच्याविषयी दिल्या जाणाऱ्या माहितीतून उजळून निघतात. त्यामध्ये ते मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी शेतकऱ्यांच्या सावकारांकडे वेगवेगळ्या कारणांनी ताब्यात असलेल्या जमिनी सोडवून आणल्याचे उदाहरण आवर्जून ऐकायला मिळते.

गिरण्यांच्या जमिनीचा प्रश्न त्यांना चांगला माहिती होता. त्यामुळेच गिरण्यांच्या जमिनी मालकाच्या घशात जाऊ नयेत यासाठी त्यांनी प्रयत्न केले. जायकवाडी हा राज्यातील सर्वात मोठा प्रकल्प शंकरराव चव्हाण यांच्या विकासविषयक दृष्टिकोनाचे मानचिन्ह मानला जातो. बागायती पिकांना आठमाही पाणी देण्याचा निर्णय त्यांनी नेटाने राबवला. महाराष्ट्रातील महाकाय धरणांचे ते निर्माते आहेत. जायकवाडी, उजनी, अप्पर वर्धा, काळ, अरुणावती, विष्णुपुरी अशा कितीतरी प्रकल्पांच्या कालव्यातून वाहणारे पाणी शंकरराव चव्हाण यांच्या कर्तृत्वाची गाणी गात वाहत आहे. धरणातील पाण्याचा योग्य वापर कृषी सिंचनासाठी व्हावा याकडे त्यांचा कटाक्ष होता. त्यामुळेच त्यांना आधुनिक भगीरथ असेही संबोधले जात होते. राज्याची जलसंस्कृती विकसित करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे.

त्यांच्या संकल्पनेतून तयार झालेला पैठणचा नाथसागर हा तर तहानलेल्या मराठवाड्यासाठी संजीवन देणारा प्रकल्प ठरला आहे. राज्याच्या सिंचन क्षमतेचा बारकाईने अभ्यास केलेले, त्याबद्दलचा व्यासंग असलेले नेते म्हणून शंकररावजींचे नाव आदराने घेतले जाते.

महाराष्ट्राच्या जलक्रांतीचे जनक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. केवळ मराठवाड्याचेच नाही तर ते महाराष्ट्राचे लाडके नेतृत्व होते.

शिस्तप्रिय माणूस म्हणून त्यांची वेगळी ओळख होती. महाराष्ट्राच्या सचिवालयाचे नामकरण 'मंत्रालय' असे त्यांनीच केले. नगराध्यक्षापासून, मंत्री, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री अशा अनेक पातळीवर त्यांनी महाराष्ट्राचे नेतृत्व केले.

केंद्रीय गृहमंत्री, संरक्षण मंत्री, परराष्ट्र मंत्री, अर्थमंत्री अशा वेगवेगळ्या महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी त्यांनी सांभाळली. राज्याच्या हिताचा निर्णय घेताना त्यांची दूरदृष्टी आणि विचार नेहमीच महत्त्वाचा ठरला आहे. ते महाराष्ट्राचे दोनदा मुख्यमंत्री झाले.

कृष्णा गोदावरी पाणी तंट्यात त्यांची भूमिका महत्त्वाची राहिली. मराठवाडा मुक्तिसंग्रामात त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ यांच्याबरोबर महत्त्वाची कामगिरी बजावली. त्यांच्या कडक शिस्तीमुळे त्यांना हेडमास्तर म्हटले जायचे.

महाराष्ट्र तोडण्याच्या मागणीला त्यांनी कधीच पाठिंबा दिला नाही. ऑपरेशन ब्लूस्टार, हजरतबाल दर्ग्यात लपलेल्या दहशतवाद्यांवरील कारवाई, पंजाबचा ऐतिहासिक करार या सर्व महत्त्वाच्या घटनांच्या वेळी शंकररावजी केंद्रीय गृहमंत्री होते.

काम करताना निष्ठा आणि श्रद्धांशी तडजोड करायची नाही असा शंकररावजी चव्हाण यांचा स्वभाव होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व समाजाला सदैव सर्जनशीलतेची, उद्यमशीलतेची आणि सुसंस्काराची प्रेरणा देत राहील, यात शंका नाही.

शब्दांकन : डॉ. सुरेखा मुळे,
जनसंपर्क अधिकारी,
जनसंपर्क कक्ष (मुख्यमंत्री सचिवालय)

मंत्रालयाचे उद्‌गाते!

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

अजित पवार
उपमुख्यमंत्री

महाराष्ट्र राज्य स्थापनेचे हीरकमहोत्सवी वर्ष आपण साजरे करत आहोत. हेच वर्ष महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. हा विलक्षण योगायोग आहे. संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आणून यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या विकासाचा पाया रचला. शंकरराव चव्हाण यांची त्यांना मोलाची साथ मिळालीच, परंतु नंतरच्या काळात राज्याचे नेतृत्व करत महाराष्ट्राला विकासाच्या वाटेवर नेण्यात शंकररावांचा मोठा वाटा आहे. जन्मभूमी पैठणनगरी असणाऱ्या शंकररावांनी नांदेडला कर्मभूमी मानली. नांदेडच्या बरोबरीने महाराष्ट्रासह देशाच्या विकासात त्यांनी योगदान दिले. महाराष्ट्राच्या 'सचिवालया'चे 'मंत्रालय' असे नामकरण करून राज्याच्या कारभाराला शिस्त लावली. दूरदृष्टीचे नेते, करड्या शिस्तीचे कुशल प्रशासक ही त्यांची ओळख सदैव स्मरणात राहणार आहे.

लढवय्ये स्वातंत्र्यसेनानी

शंकररावजी हे कृतिशील समाजकारणी-राजकारणी होते. ते लढवय्ये स्वातंत्र्यसेनानी होते. स्वामी रामानंदतीर्थ यांच्या नेतृत्वाखाली निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध त्यांनी लढा दिला. माजी प्रधानमंत्री पी. व्ही. नरसिंहराव, गोविंदभाई श्रॉफ, अनंतराव भालेराव, गोपाळराव एकबोटे, दिगंबरराव बिंदू या बिनीच्या स्वातंत्र्यसेनानींच्या खांद्याला खांदा लावून मराठवाडा मुक्तिसंग्रामात त्यांनी भाग घेतला. सचोटी, टापटीप, शिस्त आणि स्वीकारलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी पूर्ण झोकून देऊन काम करण्याची वृत्ती, ही शंकररावजींची गुणवैशिष्ट्ये होती.

पन्नासच्या दशकात शंकररावजींच्या राजकारणाची सुरुवात झाली. १९५२ साली

महाराष्ट्राला विकासाच्या वाटेवर नेण्यात ज्या नेत्यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल त्यामध्ये शंकरराव चव्हाण यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. राज्याच्या जलसिंचन आणि ऊर्जा क्षेत्रात मोठे योगदान देणारे शंकरराव चव्हाण करड्या शिस्तीचे कुशल प्रशासक होते. सचिवालयाचे 'मंत्रालय' हे नामकरण त्यांच्या काळात करण्यात आले. यातून त्यांची लोकाभिमुखता लख्खपणे दिसून आली.

सोलापूर-मुंबई एक्सप्रेस रेल्वेचा शुभारंभ करताना माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण, शरदचंद्र पवार आदी मान्यवर.

अमीट छाप

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात काम करताना शंकररावजींनी आपल्या कर्तृत्वाची अमीट छाप सोडली आहे. त्यांनी महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री म्हणून बारा वर्षे काम पाहिले, आपल्या दुसऱ्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात त्यांनी पाटबंधारे खात्याचा कारभार स्वत:कडे ठेवला. जायकवाडी, उजनी, अप्पर वर्धा, काळ, काळीसरार, अरुणावती, विष्णुपुरी या धरणांच्या उभारणीत महत्त्वाचे योगदान दिले. 'भूमी आणि जलव्यवस्थापन संस्था' अर्थात 'वाल्मी' या संस्थेची स्थापना करून जलव्यवस्थापनाच्या कामाला चालना दिली. पाण्याचे शास्त्रशुद्ध नियोजन आणि जलसिंचन क्षेत्राचा समतोल विकास यावरच त्यांची कार्यशैली आधारलेली होती. त्यामुळेच महाराष्ट्राच्या 'जलक्रांतीचे जनक' म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. त्यांच्या वीज मंत्रिपदाच्या कार्यकाळात कोराडी, पारस, चंद्रपूर ही औष्णिक वीज केंद्रे महाराष्ट्रात उभी राहिली. पाटबंधारे, वीजमंत्री आणि शेतीमंत्री म्हणून त्यांनी केलेले काम सदैव लक्षात राहील.

शंकररावजी मुख्यमंत्री असताना महाराष्ट्र राज्याने पहिल्यांदा शून्याधारित अर्थसंकल्प मांडला. देशातला तो पहिलाच प्रयोग होता. आठमाही पाणी हा महत्त्वाचा निर्णय त्यांच्याच कार्यकाळात घेण्यात आला. वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्यास त्यांचा तात्त्विक विरोध होता. ही मंडळे म्हणजे विधिमंडळाच्या अधिकारांवर आक्रमण आहे, संविधानाच्या चौकटीत हे बसत नाही, असे त्यांचे मत होते. प्रचंड टीकेनंतरही ते त्यांच्या मतावर, भूमिकेवर ठाम राहिले. आज त्यांच्या विरोधामागची दूरदृष्टी आपल्या लक्षात येते.

राज्याचे मुख्यमंत्रिपद सांभाळल्यानंतर १९७८ मध्ये शरदरावजींच्या मंत्रिमंडळात त्यांनी मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली. त्यापूर्वी त्यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळात काम केले होते. शंकररावजींचे सुपुत्र व आमचे सहकारी अशोकराव मुख्यमंत्री म्हणून राज्याचे नेतृत्व केले. वडील व मुलगा, दोघांनीही मुख्यमंत्री म्हणून राज्याचे नेतृत्व केल्याची जी मोजकी उदाहरणे आहेत, त्यात या पितापुत्रांचे नाव प्रामुख्याने घेता येईल.

ते पहिल्यांदा नांदेड शहराचे नगराध्यक्ष झाले. नगराध्यक्षपदाच्या कार्यकाळात त्यांनी नांदेडच्या विकासात भरीव कामगिरी केली. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतरावांनी या कामाची दखल घेतली. शंकररावजींना मुंबईत बोलवून त्यांना आपल्या मंत्रिमंडळात महसूल खात्याचे उपमंत्री केले. त्या वेळी शंकररावजी महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते. त्यानंतर १९५७ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद मतदार संघातून विधानसभेवर ते निवडून आले. तेव्हापासून १९८० पर्यंतचा मधला सुमारे सव्वा वर्षांचा काळ वगळला तर ते सातत्याने सरकारमध्ये राहिले. १९७८ मध्ये काँग्रेसपासून वेगळे होऊन त्यांनी 'महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस' हा स्वतंत्र पक्ष स्थापन केला. त्या वेळी साधे आमदार असताना शंकररावजी मंत्रालयामागील आमदार निवासात राहत होते. अधिवेशन काळात आमदार निवास ते रीगल समोरच्या जुन्या विधानभवनात पायी येत. त्यांच्या या साधेपणात प्रचंड ताकद होती.

महाराष्ट्राचे चौथे मुख्यमंत्री म्हणून १९७५ साली त्यांनी पहिल्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर १९८६ ते १९८८ या कालावधीत ते दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. १९५२ ते २००२ मध्ये राज्यसभेतून निवृत्त होईपर्यंची तब्बल ५० वर्षांची त्यांची प्रदीर्घ राजकीय कारकीर्द संस्मरणीय राहिली. या काळात ना सत्ता त्यांच्या अंगाला चिकटली, ना सत्तेच्या मोहात ते अडकले. त्यांच्यावर कुठलाही आरोप होऊ शकला नाही.

देशासाठी योगदान

पंजाबमधील दहशतवाद मोडून काढण्यात केंद्रीय मंत्री म्हणून शंकररावजींनी दिलेले योगदान कायम लक्षात राहणार आहे. दहशतवादाने होरपळलेल्या पंजाब राज्यातील परिस्थिती सुधारणे, तिथे शांतता प्रस्थापित करून निवडणुका पार पाडणे आणि लोकनियुक्त सरकार प्रस्थापित करणे, यात तत्कालीन केंद्रीय नेतृत्वाला त्यांची समर्थ साथ लाभली. पंजाबमधील दहशतवाद संपवण्यासाठी त्यांचे असलेले योगदान देश आणि महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब ठरते. शंकररावजी केंद्रीय मंत्री असताना त्यांनी अनेक महत्त्वाच्या, संवेदनशील बाबींवर कर्तव्यबुद्धीने व देशहित सर्वोच्च मानून निर्णय घेतले. याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. सुवर्णमंदिरातून दहशतवाद्यांना बाहेर काढण्यासाठी केलेले ऑपरेशन ब्लूस्टार किंवा अयोध्येत १ डिसेंबर १९९२ ला कारसेवकांनी वादग्रस्त वास्तू पाडण्याची घटना. अयोध्याप्रकरणी त्यांची भूमिका जर त्या वेळी मान्य झाली असती तर आज कदाचित भारतीय राजकारण आणि समाजकारण वेगळ्या वळणावर असते. देशाच्या राजकारणात त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा स्वतंत्र ठसा उमटवला आहे. यशवंतराव चव्हाण साहेब, शंकरराव चव्हाण साहेब, शिवराज पाटील साहेब, सुशीलकुमार शिंदे साहेब महाराष्ट्रातील या चार नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्रिपदाची जबाबदारी आतापर्यंत सांभाळली आहे, याचीदेखील नोंद यानिमित्ताने घेणे आवश्यक आहे.

शंकररावजी हे कडक शिस्तीचे होते. त्यांच्या शिस्तीमुळे काही जण त्यांना हेडमास्तर म्हणायचे. परंतु ही ओळख त्यांनी त्यांच्या ज्ञानातून, अनुभवातून, जाणतेपणातून मिळवली होती. या भूमिकेतूनच त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. प्रशासनावर त्यांची कायम मजबूत पकड राहिली. त्यांचा राज्याच्या प्रश्नांचा प्रचंड अभ्यास होता. त्यामुळे अधिकाऱ्यांनाही अभ्यास केल्याशिवाय त्यांच्यासमोर उभे राहण्याची हिंमत होत नसे, याचे किस्से आजही सांगितले जातात.

शब्दांकन : संग्राम इंगळे,
मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

सहा दशकांच्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत त्यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर अनेक पदांच्या जबाबदाऱ्या लीलया पेलून त्या पदांना वेगळी उंची प्राप्त करून दिली.

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

कर्मयोगी

प्रतिभाताई पाटील

शंकरराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ टपाल तिकिटाचे लोकार्पण करणे ही माझ्यासाठी मोठी गौरवाची बाब आहे. माझ्या राजकीय कारकिर्दीत मला त्यांचा सहवास लाभला हे माझे भाग्यच. आपले सर्व जीवन देशाच्या सेवेसाठी अर्पण करणारे ते एक अत्यंत निष्ठावान व्यक्ती होते. त्यामुळे वैयक्तिक मतभेद असले तरी देशभरात सर्व क्षेत्रातील व्यक्ती त्यांचा आदर करत.

रामानंद तीर्थांचे शिष्य

स्वातंत्र्य चळवळीचा ते एक भाग राहिले. हैदराबादच्या निजामाविरुद्ध चालवलेल्या 'राजदरबार छोडो' या आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग होता. रामानंद तिर्थांना नरसिंह राव, शंकरराव चव्हाण आणि वीरेंद्र पाटील असे तीन उत्तम शिष्य लाभले. तिघेही कालांतराने आंध्र, महाराष्ट्र आणि कर्नाटकाचे मुख्यमंत्री झाले आणि केंद्रीय स्तरावरही तिघांनी देशाचे उत्तम प्रकारे नेतृत्व केले. नरसिंह राव प्रधानमंत्री असताना गृहमंत्री म्हणून शंकरराव चव्हाण यांची त्यांना साथ लाभली.

शंकरराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रसिद्ध करण्यात आलेले टपाल तिकिट.

टपाल तिकिटाच्या लोकार्पण प्रसंगी बोलताना तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील.

साकारला हरित महाराष्ट्र

१२ वर्षांहून अधिक काळ त्यांनी पाटबंधारे व ऊर्जा मंत्री म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावली. सिंचनासाठी अनेक मोठे प्रकल्प उभारून महाराष्ट्राला हरित क्रांतिकडे घेऊन गेले. अनेक ऊर्जा प्रकल्प उभारून विजेच्या बाबतीतही राज्याला समृद्ध केले. केंद्रात शिक्षण, समाजकल्याण, गृह, वित्त आणि परराष्ट्र मंत्री म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली.

हरितक्रांती असो की, विविध भागांचा संतुलित विकास, सार्वजनिक जीवनात विधायक कार्याची उभारणी कशी करावी, याचा आदर्श वस्तुपाठ शंकरराव चव्हाणांनी घालून दिला. ते बुद्धिमान आणि कर्तव्यदक्ष प्रशासक होते. समाजातील सर्व वर्गांच्या विकासासोबत शेतकरी व सर्वसामान्यांच्या विकासाबाबत आग्रही होते. प्रत्येक कामात शिस्त आणि ते वेळेत पूर्ण करण्याची हातोटी त्यांच्या अंगी होती. राज्याच्या दोन वेळा मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात त्यांनी उत्कृष्ट प्रशासन नेतृत्वाची ओळख करून दिली.

शेतकरी सुखावला

मुख्यमंत्री असताना आपल्या मंत्रिमंडळातील सदस्यांना त्यांनी पराकोटीची शिस्त लावली होती. सर्व मंत्र्यांना प्रत्येक विभागाच्या ध्येयधोरणांची व योजनांची चांगली ओळख करून देऊन अंमलबजावणीदरम्यान समन्वय ठेवला जात होता. पाण्याशिवाय शेती म्हणजे एक जुगार आहे हे त्यांनी हेरले होते. त्यामुळे सिंचनावर त्यांनी भर दिला. त्यांनी जायकवाडी, येलदरी, मांजरा, हातनूर, पेंच, उजनी, भातसा, सिद्धेश्वरी, अपर वर्धा, अपर पैनगंगा व मुळा आदी सिंचन प्रकल्पांची मुहूर्तमेढ रोवली. यामुळे शेतकऱ्यांचे जीवन सुखी तर झालेच शिवाय अनेक ठिकाणचा पुराचा धोका टळला. शहरांनाही पाण्याची सोय झाली. मी अमरावतीची पालकमंत्री असताना त्यांना अपर वर्धा प्रकल्पाच्या भूमिपूजनासाठी आमंत्रित केले होते. तेव्हा त्यांनी माझ्या विनंतीनंतर शहनूर, चारगडसह चार प्रकल्पांची घोषणा केली होती. अपर वर्धा धरणातून अमरावती शहराला सुरळीत पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यातही त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे.

गृहमंत्री असताना आसाम सामंजस्य करार, पंजाबमधील दहशतवादावर नियंत्रण, तेथे निवडणुका घेण्याचे श्रेय त्यांनाच जाते. ते एक महान कर्मयोगी होते. त्यांच्या अर्धांगिनी श्रीमती कुसुमताईंनी त्यांना पावलापावलावर साथ दिली त्यामुळे देशसेवेचे ते एवढे महान कार्य करू शकले.

(माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण आणि जायकवाडी प्रकल्पाचे छायाचित्र असलेल्या पाच रुपये किमतीच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन १७ डिसेंबर २००७ रोजी राष्ट्रपती भवनच्या दरबार हॉलमध्ये केल्यानंतर स्व. शंकरराव चव्हाण यांच्याविषयी तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी काढलेले हे गौरवोद्गार.)

– टीम लोकराज्य

मातीशी नाळ असलेला नेता

सोनिया गांधी

शंकरराव चव्हाण यांनी महाराष्ट्राला सुजलाम् सुफलाम् केले. इंदिराजींचे ते अत्यंत विश्वासू होते. त्यांची मातीशी नाळ जोडली गेली होती. मराठवाड्यासारख्या कमी पर्जन्यमानाच्या दुष्काळी भागातून त्यांचे नेतृत्व उदयाला आले. त्यामुळे सिंचनासारख्या क्षेत्रात चांगली कामगिरी करून त्यांनी मराठवाड्यासह राज्याला सुजलाम् सुफलाम् करण्याचा प्रयत्न केला. केवळ शेतकरीच नाही तर देशातील गरीब, आदिवासी, दलित, सर्व घटकांसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर देशात शांतता प्रस्थापित करण्यात त्यांनी मोठी कामगिरी केली. राजीव गांधी सरकारमध्ये शंकररावांनी पंजाब व ईशान्य भागात शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न महत्त्वाचे ठरले. प्रशासकीय कौशल्य आणि दूरदृष्टी यामुळे शंकररावांचा लौकिक होता, म्हणूनच त्यांची प्रशासनावर पकड होती.

(काँग्रेसच्या अध्यक्षा आणि खासदार श्रीमती सोनिया गांधी यांनी नांदेड येथील शंकरराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण व स्मृतिसंग्रहालयाच्या उद्घाटन कार्यक्रमात व्यक्त केलेल्या भावना..)

स्मृतिसंग्रहालयातील छायाचित्रे पाहताना काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी, डॉ. मनमोहन सिंग, माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, सौ. अमिता चव्हाण आदी मान्यवर.

शंकरराव हे उत्तम व अभ्यासू प्रशासक होते. राज्यातील पाण्याचा वापर येथील समाजजीवन बदलण्यासाठी झाला पाहिजे, यासाठी त्यांचा आग्रह होता.

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

जलतज्ज्ञ

शरद पवार

ज्यांच्या मंत्रिमंडळात आणि ज्यांनी माझ्या मंत्रिमंडळात काम केले, अशांमध्ये शंकरराव चव्हाण यांचा समावेश होतो. अभ्यासू आणि उत्तम प्रशासक म्हणून शंकरराव यांचा उल्लेख होतो तो यथार्थ आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना राज्याचे मंत्री बरोबर साडेदहाला मंत्रालयात येतात का हे पाहणे याकडे त्यांचा कटाक्ष होता. साडेदहा ते दीडपर्यंत मंत्र्यांनी प्रशासकीय काम करावे, नस्त्यांचे उर्वरित काम करावे आणि दोननंतर जो काही जनता दरबार आहे तो भरवावा यासाठी ते आग्रही होते. त्यामुळे त्यांना हेडमास्तरही म्हटले जायचे, पण एक प्रशासक म्हणून ते निश्चितच योग्य होते असे म्हणायला हवे.

राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या कार्यकाळात अनेक कामे झाली पण मी येथे उल्लेख करीत आहे तो त्यांच्या पाटबंधारे मंत्री असलेल्या काळाचा. १९६७ला मी राज्याच्या विधिमंडळात आमदार म्हणून आलो आणि त्या वेळी शंकरराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील पाण्यासंदर्भात निर्माण केलेल्या समितीत मी होतो. या समितीने अनेक जिल्ह्यांचा दौरा केला. या दौऱ्यात मीही सहभागी होतो. विविध गावांना भेटी दिल्या. अनेक समस्यांचे मूळ पाण्याची कमतरता आहे हे ओळखून राज्यातील पाण्याचा वापर हा येथील समाजजीवन बदलण्यासाठी झाला पाहिजे यासाठी त्यांचा आग्रह होता. त्यांनी पाण्याचा थेंब अन् थेंब समाजजीवनासाठी वापरला जावा म्हणून अनेक धरणांचे बांधकाम केले. या वेळी एक आठवण सांगतो. उजनी हे सोलापूरचे भाग्यविधाते ठरणारे धरण त्यांच्या प्रयत्नांतून झाले. एकेकाळी दुष्काळी जिल्हा असणाऱ्या सोलापूर जिल्ह्यात महाराष्ट्रातील सर्वाधिक म्हणजे आज ३९ साखर कारखाने आहेत ते शंकरराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीचे द्योतक आहे. या धरणाचे भूमिपूजन ज्येष्ठनेते यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले होते. त्या वेळी मी आमदार म्हणून उपस्थित होतो. त्या वेळी ते म्हणाले होते. उजनी धरण भीमा नदीवर आहे आणि तीच नदी अडवली जाणार आहे. विठ्ठलाच्या दर्शनाला आलेला विठ्ठलभक्त चंद्रभागेत स्नान करण्याचीही आशा ठेवतो. पण हे पाणी अडवले तर त्या विठ्ठलालाही आवडेल. कारण हे पाणी खेड्यापाड्यांतील शेतकऱ्याच्या शिवारात पोहोचेल आणि त्या पाण्यावर उगवलेल्या शाळू (ज्वारी)चे दाणे तो त्या विठ्ठलाला अर्पण करेल.

चूक मान्य

राज्याचा एकसंध विकास व्हावा आणि राज्य एकसंध राहावे यासाठी वैधानिक विकास महामंडळाचा प्रस्ताव मी विधानमंडळात मांडला आणि तो मंजूरही झाला. त्या वेळी या विकासमंडळाला कडाडून विरोध कोणी केला असेल तर तो शंकरराव चव्हाण यांनी. त्यांचे म्हणणे असे होते की, लोकप्रतिनिधींचे अधिकार राज्यपालांच्या हातात देणे योग्य नाही. आम्ही खरे तर त्या वेळी शंकरराव चव्हाण यांचे म्हणणे मान्य केले नाही. ही आमची चूक होती हे मान्यच करावे लागेल.

झिरो बजेट या शंकररावांच्या कल्पनेलाही आम्ही प्रचंड विरोध केला परंतु त्या-त्या परिस्थितीत तीही योग्य होती.

अभ्यासू नेतृत्व

कृष्णा-गोदावरी पाणी तंट्यामधील प्राणहिता नदीच्या पाणीवाटपासंदर्भात महाराष्ट्रात आणि शेजारच्या राज्यात वाद होता. तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी आपल्या मंत्रिमंडळातील सहकारी पाटबंधारे मंत्री श्री. राव यांना हा वाद सोडवण्यास सांगितले. हे मंत्री स्वतः आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जलतज्ज्ञ म्हणूनही प्रसिद्ध होते. शंकरराव चव्हाण यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर श्री. राव यांनी कबूल केले की, शंकररावांसारखा अभ्यासू आणि जलनीतितज्ज्ञ मी पाहिला नाही. यावरूनच शंकररावांचे महत्त्व समजते.

बाबरी मशीद

या ठिकाणी बाबरी मशीद घटनेचा उल्लेख करणे आवश्यक आहे. त्या वेळी शंकरराव चव्हाण केंद्रीय गृहमंत्री होते. केंद्रीय गृहसचिव माधवराव गोडबोले यांनी उत्तर प्रदेशमधील कल्याणसिंग यांचे सरकार बरखास्त करून परिस्थितीवर नियंत्रण मिळवावे असा अहवाल दिला होता. शंकरराव चव्हाण यासाठी आग्रही होते. मात्र प्रधानमंत्री नरसिंहराव, परराष्ट्र मंत्री माधवराव सोळंकी, अर्जुनसिंग आणि मी हा प्रस्ताव फेटाळला आणि जे घडायला नको होते ते घडले. त्यानंतर देशात आणि विशेषतः मुंबईत उसळलेल्या जातीय दंगलीतून झालेली जीवितहानी टाळता आली असती. शंकरराव चव्हाण एक उत्तम प्रशासक, अभ्यासू जलतज्ज्ञ म्हणून कायमच स्मरणात राहतील.

(महाराष्ट्र विधानमंडळातील वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे जन्मशताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांनी अध्यक्षस्थानावरून शंकरराव चव्हाण यांच्याविषयी व्यक्त केलेल्या भावनांचा संपादित भाग...)

टीम लोकराज्य

महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय जीवनावर शंकरराव चव्हाण यांची अमीट छाप आहे. ते शिस्तप्रिय कठोर शासक होतेच त्यासोबतच सामाजिक सुधारणा आणि सर्वसामान्य जनतेप्रति त्यांचे ममत्व होते.

शिस्तप्रिय कठोर शासक!

सुशीलकुमार शिंदे

संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे अशा भूमिकेने महाराष्ट्रातील थोर नेते प्रयत्नशील होते. देश स्वतंत्र झाल्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली देशातील संस्थानिकांचे भारतामध्ये विलीनीकरण होत होते. पण निजामाचे हैदराबाद स्टेट हे विलीन होण्याकरिता राजी नव्हते, ते विलीन होण्याकरिता म्हणून मराठवाड्यातून रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्त्वाखाली हैदराबाद विलीनीकरणाकरिता लढा चालू होता या लढ्यात शंकरराव चव्हाण हे सहभागी होते आणि रामानंद तीर्थांच्या बरोबर हैदराबाद मुक्तीसाठी ते लढ्यात उतरले. रामानंद तीर्थ यांच्याबरोबर ते सरचिटणीस म्हणून पक्षाचे काम पाहत होते. ही चळवळ त्यांनी अतिशय जवळून पाहिली, रझाकारांनी केलेला अत्याचार पाहिला, ही पार्श्वभूमी घेऊनच ते पुढे राजकारणात आले.

१९७२ मध्ये मी पोलीस उपनिरीक्षकाचा राजीनामा देऊन राजकारणामध्ये आलो, तेव्हापासून मी काँग्रेसमध्ये क्रियाशील कार्यकर्ता म्हणून काम करत आहे. शंकरराव चव्हाण त्या वेळेस फारच गतीने काम करत. बैठकीस येताना ते स्वच्छ पांढरे धोतर, नेहरू शर्ट त्यावर जॅकेट या पोशाखात येत असत. डोक्यावर पांढरी स्वच्छ गांधी टोपी ज्याची उंची साधारणत: चार ते साडेचार इंच असायची, असे हे व्यक्तिमत्त्व प्रदेश काँग्रेस कमिटीच्या बैठकीला आले की, त्यांच्या या वेगळेपणामुळे सगळ्यांचे लक्ष त्यांच्याकडे जायचे आणि तो काळ यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, विदर्भातील वसंतराव नाईक अशा कर्तृत्ववान नेत्यांच्या चलतीचा काळ होता.

मार्गदर्शनाचा काळ

१९७४ साली मी करमाळा मतदारसंघातून एप्रिल महिन्यात आमदार म्हणून निवडून आलो व पुढे नोव्हेंबरमध्ये मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी मला आपल्या मंत्रिमंडळामध्ये राज्यमंत्री म्हणून घेतले, पुढे फेब्रुवारी महिन्याच्या १९७५ मध्ये मराठवाड्यातील मागासलेल्या भागातून शंकरराव चव्हाण यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाली. मी राजकारणात नवीन असल्यामुळे फक्त शरद पवारांच्याशिवाय मला राजकीय मदत करण्यासाठी कुणीही नव्हते पण शंकरराव चव्हाणांनी मला त्यांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून घेतले आणि सहा खात्यांचा कारभार माझ्याकडे सोपवला. माझा त्यांच्याशी काही जास्त परिचय नव्हता. पण हळूहळू विश्वासार्हता वाढत गेली. मी त्या वेळेस नवीनच असल्यामुळे कॅबिनेट बैठकांना जात असे. त्यावेळी राज्यमंत्र्यांनाही कॅबिनेट बैठकीत बोलावण्यात येत असे. मी माझे मुख्यमंत्री कॅबिनेटमध्ये सहकाऱ्यांशी कसे बोलतात, आयएएस अधिकाऱ्यांच्या बरोबर कसे बोलतात व मंत्रिमंडळापुढे आलेल्या विषयांवर सविस्तरपणे कशी चर्चा करतात हे लक्षपूर्वक पाहत असे. त्या सुरुवातीच्या काळामध्ये या पाहण्याचा, ऐकण्याचा व निर्णय घेण्याचा माझ्या मनावर खूप परिणाम झाला आणि पुढच्या राजकीय आयुष्यामध्ये मला योग्य तऱ्हेने वाटचाल करता आली.

सहकाऱ्यांच्या मताचा आदर

त्यांच्या त्या छोट्याशा कारकिर्दीमध्ये मी राज्यमंत्री म्हणूनच होतो त्या वेळचा एक प्रसंग मला आठवतो, एक समाज कल्याण खात्याची नस्ती माझ्याकडे

नवी दिल्ली येथे विज्ञान भवनात ७ एप्रिल१९८६ रोजी राष्ट्रीय एकात्मता मंडळाच्या बैठकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन.टी. रामाराव आणि केंद्रीय विधिमंत्री अशोक सेन.

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

सामाजिक न्याय

आणखी एक दुसरा प्रसंग, त्या वर्षी पोलीस उपनिरीक्षकाची भरती होती, मुख्यमंत्री यांच्याकडे निवडीसंबंधीची फाईल आली होती. वाघ नावाचे पोलीस महानिरीक्षक होते त्यांना ती नस्ती घेऊन माझ्याशी चर्चा करायला मुख्यमंत्री यांनी सांगितले. चर्चा केली असता आणि त्यामध्ये दलितवर्गीयांमधील प्रामुख्याने निरनिराळ्या जातींना प्रतिनिधित्व दिले पाहिजे ही भूमिका मी मांडली आणि त्या वेळेस समाजातल्या अत्यंत कमकुवत असलेल्या सफाई कामगार समाजातील दोन, मातंग समाजातील दोन व रामोशी समाजातील एक अशा पाच लोकांची दलितांमधील सामाजिक समतोल साधावा म्हणून नेमणूक केली, अर्थातच त्यात गुणवत्ता हाही निकष होताच असे शंकरराव सामाजिक समतोलाच्या दिशेने विचार करणारे व सामाजिक न्याय देणारे मुख्यमंत्री म्हणून माझ्या आयुष्यात कायम स्मरणात राहिले.

माझ्या सचिवाने शेरा मारून समाजकल्याण खात्याच्या कॅबिनेट मंत्र्याकडे पाठवण्याकरिता दिली व त्यामध्ये जे प्रस्ताव होते ते नुकतेच पी.जी. गवई नावाचे मागासवर्गीय अधिकारी गृहसचिव झाले होते त्यांची बदली करून त्यांना आदिवासी कल्याण आयुक्त म्हणून पाठवावे असा प्रस्ताव होता, ती फाईल वाचल्यानंतर मला धक्काच बसला कारण मी एक मागासवर्गीय मंत्री, पण महाराष्ट्रामध्ये पहिल्यांदाच गृहसचिव झालेल्या अधिकाऱ्याची बदलीची शिफारस करणे हे सामाजिकदृष्ट्या राज्याला परवडण्यासारखे नव्हते म्हणून मी ती नस्ती घेऊन थेट शंकरराव चव्हाण यांच्याकडे गेलो. त्यांना संबंधित प्रस्ताव आला आहे, असे सांगितले व म्हणालो साहेब, मी दलितवर्गीयांमधील एक उपजातीचाच आहे आणि पी.जी. गवई हे ही दलित आहेत जर आपण हे प्रपोजल स्वीकारले, शिवाय आपण नवीनच मुख्यमंत्री आहात याचा एक वेगळा संदेश महाराष्ट्रामध्ये जाईल आणि खूप मोठ्या प्रमाणात चर्चा होईल, कदाचित आंदोलने होतील असेही त्यांना सांगितले. मी त्यांना सावध केल्याबद्दल त्यांनी मला धन्यवाद दिले. पुढे ते सचिव, संबंधित मंत्री, मी यांच्याबरोबर चर्चाकरून शंकररावांनी पी.जी.गवई यांना गृहसचिव म्हणून तिथेच ठेवले.

लाभार्थ्यांपर्यंत योजना

इंदिरा गांधी यांनी विकासाचा वीस कलमी कार्यक्रम दिला होता. शंकरराव चव्हाणांनी त्याची काटेकोर अंमलबजावणी सुरू केली होती. त्यांच्या करारीपणामुळे अनेक योजना योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्या. या योजनांनी गरीब, दरिद्री नारायणाचे भले झाले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. गरिबांचा कळवळा असल्यामुळेच अनेक विरोधांना त्यांनी जुमानले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने आपण राज्य चालवतो आहोत आणि त्यांचीच रयतेबद्दलची नीती आपण अवलंबत आहोत, ही त्यांची भूमिका होती. त्यांची कार्यपद्धती पाहिली तर त्यात तथ्य असल्याचे निश्चितपणे जाणवते.

तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधींसोबत शंकरराव चव्हाण.

१९९२ साली ते केंद्रीय गृहमंत्री होते. श्री. नरसिंहराव प्रधानमंत्री होते. अखिल भारतीय काँग्रेस महासमितीच्या सरचिटणीसपदी नरसिंहरावांनी माझी निवड केली. त्यामुळे मी दिल्लीत गेलो. शंकरराव गृहमंत्री म्हणून अत्यंत कौशल्याने जबाबदारी पार पाडत होते. त्याच वेळी अयोध्येमध्ये बाबरी मशिदीचा विषय गाजला. केंद्र सरकारच्या भूमिकेवरून बरीच उलटसुलट चर्चा तेव्हा झाली. मी सरचिटणीस असल्याने सगळ्या गोष्टींचा जवळून साक्षीदार होतो. शंकररावांनी तेव्हा उत्तर प्रदेश सरकारविरुद्ध अतिशय कणखर आणि सडेतोड भूमिका घेतली. कोणत्याही कठीण प्रसंगाला न डगमगता तोंड देण्याची त्यांची वृत्ती होती. केंद्रीय गृहमंत्री म्हणून त्यांनी केलेली कामगिरी उल्लेखनीय ठरली, यात शंका नाही.

चेहऱ्यावरून रागीट वाटणारे पण अत्यंत दयाळू, रसिक असे शंकररावांचे व्यक्तिमत्त्व होते. नाट्यसंगीत त्यांना खूप आवडत असे. भजनी मंडळ, वारकरी संप्रदाय, कीर्तनकार या त्यांच्या मर्मबंधातील ठेवी होत्या. जे पद मिळेल त्या पदावर स्वाभिमानाने काम केले. मराठवाड्यासारख्या मागासलेल्या भागातून आलेला हा नेता महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाचे नेतृत्व करून गेला. शंकररावांच्या अनेकविध गुणांची, करारीपणाची आणि त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या लोककल्याणाच्या निर्णयांची आठवण माझ्या मनात अनंतकाळ राहील, यात शंका नाही.

(लेखक माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय गृहमंत्री आहेत.)

ग्रामीण भागातून येऊन शंकरराव चव्हाण यांनी राज्य व केंद्र शासनामध्ये दूरदृष्टीने व रचनात्मक कार्य केले. समाजवादी अर्थव्यवस्थेचे पुरस्कर्ते आणि प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरूंचे सिंचन धोरण प्रत्यक्षात आणत जायकवाडी धरणाचे उद्‌गाते म्हणून ते कायम स्मरणीय लोकनेते ठरले. शंकररावांच्या व्यक्तिमत्त्वाला एका वाक्यात अधोरेखित करायचे झाल्यास अध्यात्म, विज्ञान, व्यवहाराची जोड असलेला लोकनेता असेच मी म्हणेन.

लोकनेता

शिवराज पाटील-चाकूरकर

शंकरराव हे कर्तृत्ववान नेते होते. त्यांची वाटचाल मला आठवते, शंकररावांचे शिक्षण हैदराबादला झाले. माजी प्रधानमंत्री पी. व्ही. नरसिंहराव आणि स्वामी रामानंद तीर्थ ही थोर मंडळी त्यांचे सहपाठी होते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश केला व ते नांदेड नगरपरिषदेचे अध्यक्ष झाले. नवीन नगररचना, पिण्याच्या पाण्याची सोय करण्यावर त्यांनी भर दिला. लोकांना सोबत घेऊन त्यांनी नवीन नांदेड शहर घडवले. आजचे नांदेड हे शंकररावांच्या विचारांच्या पायावर उभे आहे. शंकररांवाच्या कर्तृत्वाला कार्यशैली व कार्यनिष्ठेची जोड असल्यामुळे त्यांना नेतृत्वाची संधी मिळाली.

मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात ते सिंचन मंत्री झाले व तत्कालीन प्रधानमंत्री पंडित नेहरूंनी हाती घेतलेल्या महत्त्वाकांक्षी सिंचन कार्यक्रमात त्यांनी हिरीरिने भाग घेतला व त्यांनी पंडितजींचे सिंचन धोरण प्रत्यक्षात आणले. या प्रकल्पांना विरोध झाला तसे ज्यांना याचे महत्त्व पटले त्यांनी मोठ्या प्रमाणात समर्थन केले. हे प्रकल्प केवळ पैशांनी आकाराला येणारे नव्हते तर त्यासाठी दूरदृष्टी, आवश्यक नियोजन महत्त्वाचे होते. शंकररावांनी या सर्व आघाड्यांवर काम करून हा प्रकल्प प्रत्यक्षात आणला. जन्म खेड्यात झाला असला तरी त्यांच्या अंगी असलेली सामाजिक जाण व व्यापक दृष्टिकोनच या प्रसंगातून सर्वांना अनुभवाला आला.

राज्यातील जायकवाडी धरणाची निर्मिती ही त्यांच्या सिंचनविषयक दूरदृष्टीचेच मोठे उदाहरण होय. राज्यात मंत्री व मुख्यमंत्रिपदाच्या यशस्वी कारकिर्दीनंतर त्यांनी केंद्र शासनात अर्थ-नियोजन, शिक्षण, संरक्षण आणि गृह खाते समर्थपणे सांभाळले. त्यांच्या या सर्व राजकीय वाटचालीत राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय प्रश्न डोळ्यासमोर ठेवून विचार करण्याचा त्यांचा दृष्टिकोन मला त्यांचा राजकीय विचार वाटतो.

मजूर, शेतकऱ्यांबद्दल तळमळ

शंकरराव हे समाजवादी अर्थव्यवस्थेचे पुरस्कर्ते होते. देशातील श्रीमंतीचा वाटा हा गोरगरीब, मजूर, शेतकरी यांना मिळावा याचाच त्यांनी सदैव विचार मांडला. मात्र, हे करत असताना देशातील छोटे व्यापारी, उद्योजक, कारखानदारी बंद करा असा अट्टाहास त्यांचा नव्हता. देशातील मजूर व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवले पाहिजे. तसेच ज्यांना जास्त आवश्यकता आहे अशा समाजघटकाला पैसा मिळाला पाहिजे, असे त्यांचे धोरण होते.

शंकररावांचे आंतरराष्ट्रीय विचार प्रगल्भ होते. खेड्यात जन्म झालेल्या शंकररावांनी नगर, जिल्हा, राज्य, देश असा सबंध अनुभव घेत केलेल्या प्रवासामुळे खेड्यातील गोरगरीब जनता, शेतकरी व नगरांमधील मजूर यांच्या प्रश्नांसह त्यांनी आंतरराष्ट्रीय प्रश्नांचीही उकल केली. जगात जे जुने व आदर्शवत आहे त्याचे संरक्षण व्हावे आणि वाईटाचा नाश व्हावा; यासोबतच नवनिर्मितीला चालना मिळावी हा शंकररावांचा आंतरराष्ट्रीय विचार होता.

सामाजिक प्रश्नांची उकल करण्यासाठी शंकररावांकडे सामाजिक विचारांची भक्कम जोड होती. अध्यात्म, नवनवीन तंत्रज्ञान आणि निसर्गशक्ती यांची उत्तम सांगड घालून त्यांनी सामाजिक विचारांची मोट बांधली होती. म्हणूनच अध्यात्म, विज्ञान आणि व्यावहारिक ज्ञान सतत त्यांच्या व्यक्तिमत्त्वात व सामाजिक व्यवहारात प्रतिबिंबित होत असे.

बरेच जण म्हणतात की, शंकरराव चव्हाण तुमचे मित्र होते. पण, मी त्यांचा मित्रच नव्हतो तर त्यांनी मला कुटुंबातील सदस्याप्रमाणे वागणूक दिली. त्यांनी सतत प्रोत्साहन दिले. सुख-दुःखात मार्गदर्शन केले. नगरपरिषद कशी चालवावी हे त्यांच्याकडून शिकलो व नगरपरिषदेचा अध्यक्ष झालो. पुढे त्यांनी राज्यात व केंद्र शासनात सिंचन, संरक्षण आणि गृहमंत्री म्हणून केलेले अफाट कार्य व्यक्तिगतरीत्या मला खूप मार्गदर्शक ठरले. सामाजिक राजकीय जीवनात एकही वावगे काम त्यांच्या हातून घडले नाही. शंकरराव चव्हाणांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या विचारांचे आचरण करून देशाचे उत्तम नागरिक बनण्याचा प्रण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

(लेखक लोकसभेचे माजी अध्यक्ष आहेत.)

माझे नाना शिस्तप्रिय, वक्तशीर होते, नियमावर बोट ठेवून चालणारे होते. त्यांच्या आचार- विचारात परखडता होती, स्पष्टता होती. आयुष्यात त्यांनी अनेक चढ-उतार पाहिले, जय-पराजय पाहिले. पण त्यांना कधी ना यशाचा दर्प शिवला, ना कधी अपयशाच्या निराशेने ग्रासले. वस्तुस्थिती स्वीकारून पुढे वाटचाल करण्याचा त्यांचा स्थायिभाव होता.

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

माझे 'नाना' - माझे 'नायक'!

अशोक चव्हाण

प्रत्येक मुलाच्या आयुष्यात त्याच्या वडिलांचे एक वेगळे स्थान असते. माझ्याही जीवनावर माझे वडील स्व.डॉ. शंकरराव चव्हाण यांचा प्रचंड प्रभाव राहिला आहे. ते माझे गुरू आहेत, मार्गदर्शक आहेत, प्रेरणास्थान आहेत, आधारस्तंभ आहेत. माझ्यासाठी ते एक मी स्वतः अनुभवलेले खरेखुरे नायक आहेत. ते आज प्रत्यक्ष सोबत नसतील. पण त्यांचे संस्कार, त्यांची शिकवण व त्यांच्या आठवणी कायम माझ्या पाठीशी असून, त्यातून मला दिशा मिळत आली आहे.

प्रश्नांची जाणीव

एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्म झाल्याने शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांच्या व्यथांची त्यांना जाणीव होती. श्रमिकांसाठी ते तळमळीने काम करायचे. शेतकरी आणि कामगारांसाठी निर्णय घेताना अनेकदा त्यांना अनपेक्षित विरोधाला तोंड द्यावे लागले. कधी आमिषेही दाखवली गेली. पण ते निर्मोही होते. सर्वसामान्यांच्या हिताशी त्यांनी कधीच तडजोड केली नाही.

घरात आम्ही त्यांना 'नाना' म्हणायचो. घरातही त्यांना शिस्त लागायची. आम्ही सहा भावंडे होतो. पाच मोठ्या बहिणी आणि मी धाकटा भाऊ. आम्ही जास्त दंगा केलेला त्यांना आवडायचा नाही. झोपणे-उठणे, जेवण, अभ्यास सगळे वेळच्या वेळी झाले पाहिजे, असा त्यांचा दंडक असायचा. व्यायामाची त्यांना प्रचंड आवड होती. रोजच्या व्यस्त दिनचर्येतही ते न चुकता व्यायामासाठी वेळ काढत.

माणूस बाहेरचा असो की घरातला. नियम म्हणजे नियम! त्यात त्यांनी कधी फरक केला नाही. एकदा एका कार्यक्रमासाठी तयार होताना आईला थोडा उशीर झाला. तर ते परस्पर एकटेच कार्यक्रमाला निघून गेले. कमाल जमीन धारणा कायदा आल्यानंतर आमच्या एका जवळच्या नातलगाची अनेक एकर शेती सरकार दप्तरी जमा होणार होती. शेती वाचवण्यासाठी त्यांनी नानांना विनवणी केली. पण नियमानुसार होणाऱ्या शासकीय कार्यवाहीत हस्तक्षेप करण्यास नानांनी नकार दिला. त्यांची सचोटी निर्विवाद होती. म्हणूनच अनेक दशके सत्तेत राहूनही कधी कोणाला त्यांच्याकडे बोट दाखवता आले नाही.

कामाच्या व्यस्ततेमुळे आम्हांला, त्यांचा कमी वेळ मिळाला. पण जो वेळ मिळाला तो क्वॉलिटी टाईम होता. ते अनेकदा माझा अभ्यास घेत. मला चांगल्या गोष्टी शिकवत. फावल्या वेळेत पुस्तक चाळणे, कोणत्याही कामाचे व्यवस्थित नियोजन करणे, चर्चेचे टिपण काढणे, लोकांचे म्हणणे नीट समजून घेणे, महत्त्वाचे मुद्दे नोंदवून ठेवणे अशा माझ्या अनेक सवयी ही त्यांचीच देण आहे.

शंकरराव चव्हाण आणि अशोक चव्हाण.

सर्वात लहान असल्यामुळे माझ्यावर त्यांचा विशेष लोभ होता. अगदी बालवयापासून ते मला कार्यक्रमांना घेऊन जात. नवीन प्रकल्प दाखवत. त्याचे महत्त्व सांगत. पण एकुलता एक मुलगा म्हणून याहून अधिक लाड कधी केले नाही. किंबहुना त्यांच्या संस्कारांमुळे मलाही कधी तसा मोह झाला नाही. शाळेत, महाविद्यालयात असताना मी शंकरराव चव्हाण यांचा मुलगा अशी ओळख स्वतः हून कधीच करून देत नव्हतो.

ते मुख्यमंत्री असताना एकदा काही कामानिमित्त मी त्यांच्या बैठकीत शिरलो. त्या वेळी ते एका महत्त्वाच्या पदावरील अधिकाऱ्याच्या नेमणुकीबाबत इतर मंत्र्यांशी चर्चा करीत होते. सुरुवातीला त्यांनी माझ्या तेथील उपस्थितीवर हरकत घेतली नाही; पण एका क्षणाला मी अनाहूतपणे त्या चर्चेत माझे मत बोलून गेलो. नानांना ते अजिबात रुचले नाही. चढ्या आणि कठोर शब्दांत त्यांनी मला नंतर येण्यास सांगितले.

ते जितके कठोर होते, तितकेच प्रेमळही होते. चुकलो तर ते रागवायचे आणि समजावूनही सांगायचे आठ-नऊ वर्षांचा असताना एकदा शाळेत माझे दप्तर हरवले. त्यांना समजल्यावर तासभर माझी उलटतपासणी झाली. पण त्यानंतर आजपर्यंत माझी एकही वस्तू हरवलेली नाही. रेल्वे-विमानातून उतरताना किंवा कुठे मुक्कामी असेल तर ते राहण्याची खोली सोडताना आपल्या सगळ्या वस्तू घेतल्या की नाही, याची खात्री करून घेण्याची सवय जडली ती जडलीच.

नानांनी गरिबी अनुभवली होती. त्यामुळे ते काटकसरी होते. त्यांनी आम्हांला कधी काही कमी पडू दिले नाही. पण अनावश्यक खर्चाची सवयही लागू दिली नाही. राहणी तर इतकी साधी होती की, मुख्यमंत्रिपद सोडल्यानंतर भल्या मोठ्या सरकारी बंगल्यातून सहकुटुंब थेट आकाशवाणीनजीकच्या आमदार निवासातील दोन खोल्यांमध्ये वास्तव्याला जाताना त्यांना क्षणभरही विचार करावा लागला नाही.

खंबीर निर्णयामागची प्रेरणा

स्वातंत्र्य सैनिक राहिल्याने राष्ट्रभक्ती त्यांच्या रोमारोमात होती. भारताचे गृह आणि संरक्षण मंत्री असताना घेतलेल्या अनेक खंबीर निर्णयांमधून त्यांच्या देशप्रेमाची प्रचिती दिसून आली. देव-धर्मावरही त्यांची प्रचंड श्रद्धा होती. अध्यात्मात रस होता. आमच्या शेतात पहिल्यांदा कालव्याचे पाणी आले तेव्हा त्यांनी मोठ्या आनंदाने खणा-नारळाने गोदावरी नदीची ओटी भरली होती.

प्रथा-परंपरांचे ते जसे पालन करायचे, तितक्याच सहजतेने नवीन बदलांनाही आत्मसात करायचे. विचारांनी ते नेहमीच पुढारलेले होते. माझ्यासोबत मोठ्या बहिणींच्या शिक्षणावरही त्यांनी तेवढेच लक्ष दिले. माझ्या आंतरजातीय विवाहाला त्यांनी अगदी आनंदाने स्वीकारले. सुनेला ते कायम 'बेटा' म्हणूनच हाक मारत. कधी कुठे गेले आणि मुलींसाठी काही आणले तर तेच सुनेसाठीही न विसरता घेऊन यायचे. इतर सर्व आजोबांप्रमाणे नातवंडांवर त्यांचा प्रचंड जीव होता. नातवांसाठी मात्र आमच्या तुलनेत ते थोडे मवाळ असायचे.

आईवडिलांसोबत सपत्नीक अशोकराव चव्हाण.

महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रदीर्घ कालावधीनंतर नाना दिल्लीत गेले, तेथील वातावरणात स्थिरावले; पण 'गल्ली'शी असलेली नाळ त्यांनी कधी तुटू दिली नाही. दिल्लीच्या शिष्टाचाराचा, संस्कृतीचा भाग म्हणून तेथील पेहरावात वावरल्यानंतर ते कर्मभूमीत येत तेव्हा धोतर, झब्बा, जाकीट व डोक्यावर गांधी टोपी या पारंपरिक वेषभूषेत सामान्यांमध्ये मिसळत. त्यांची ख्यालीखुशाली विचारत. लहान-मोठे प्रश्न समजून घेत.

ते दूरदर्शी होते, व्यासंगी होते. त्यांचे वाचन, माहिती अफाट होती. विषयांची जाण होती. त्यांचे व्यवस्थापन कौशल्यही विलक्षण होते. त्यांच्या नियोजनात आणि अंमलबजावणीत कमालीची परिपूर्णता होती. प्रशासनावर त्यांचा चांगला वचक होता. ते सतत कार्यमग्न असायचे. नवे प्रकल्प, नव्या योजनांच्या अनुषंगाने अभियंते, तज्ज्ञ आणि तंत्रज्ञांचा त्यांच्याकडे सतत राबता असायचा. रोज वेगवेगळ्या घटकातील लोकांना ते भेटायचे. त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करायचे.

हाती घेतलेले काम पूर्ण केल्याशिवाय ते स्वस्थ बसायचे नाही. रात्रंदिवस त्यांच्या ध्यानीमनी फक्त कामांचा, योजनांचाच विचार असायचा. निधनाच्या साधारणतः दीड वर्षापूर्वी त्यांच्यावर एक शस्त्रक्रिया झाली. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी रुग्णालयात आले होते. नेमके त्याच वेळी नाना गुंगीतून बाहेर आले. विलासरावांवर नजर पडताच त्यांनी पहिली विचारणा केली; 'विष्णुपुरी'साठी निधीची तरतूद झाली की नाही?

अफाट लोकसंग्रह ही त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठी कमाई होती. त्यांच्या निधनाला आता १६ वर्षे झाली आहेत. पण आजही लोक त्यांचे नाव घेतात, त्यांच्याप्रति आदर व्यक्त करतात. त्यांचा मुलगा म्हणून ही बाब मला नेहमीच अभिमानास्पद आणि जबाबदारीची जाणीव करून देणारी असते.

'नानां'ना विनम्र अभिवादन.

(माजी मुख्यमंत्री तथा मंत्री,
सार्वजनिक बांधकाम.)

मूठभरांना खूश करावे असे निर्णय शंकरराव चव्हाण यांनी कधीही घेतले नाहीत. तसेच निर्णय त्यांनी कधी घाईघाईने जाहीर केले नाहीत. संबंधित विभागाशी चर्चा करूनच निर्णय घेतले. पूर्ण होणार नाहीत अशी आश्वासने जाहीर सभांमध्ये देऊन क्षणिक लोकप्रियता मिळवली नाही.

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

प्रतिभा आणि प्रतिमा

विलासराव देशमुख

शंकररावांचा नि:पक्षपातीपणा, प्रशासनावरील उत्तम पकड यामुळे आज ते या उच्च पदावर आहेत. त्यांची प्रतिमा स्वच्छ आहे. सध्याच्या परिस्थितीत असा हा राजकारणी दुर्मीळ आहे. ते कार्यकर्त्यांच्या पचनी पडले नसतील परंतु जनतेने त्यांच्या विचारांची, विकासाची बांधिलकी ओळखली आहे, मानली आहे. वैयक्तिक कामापेक्षा जनहिताच्या कामाला त्यांनी अधिक महत्त्व दिल्याने संधिसाधू व स्वार्थी कार्यकर्त्यांचे कोंडाळे त्यांच्याभोवती कधी निर्माण झालेले नाही.

आदरयुक्त भीती

एक उत्तम प्रशासक, निष्कलंक, स्वच्छ प्रतिमेचा नेता, काहीसे कठोर व्यक्तिमत्त्व आणि परखडपणे विचार व्यक्त करणारे देशाचे गृहमंत्री, मराठवाड्याचे सुपुत्र शंकरराव चव्हाण यांच्याशी त्यांचे निकटचे कार्यकर्तेही आदरयुक्त भीतीनेच वागतात. विचारांची मांड पक्की असणारे अभ्यासू शंकरराव चव्हाण १९८६ मध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व करण्यासाठी दिल्लीहून पुन्हा आले. त्या वेळी त्यांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यांनी विश्वासाने महत्त्वाची पाच खातीही सोपवली.

शंकररावांचा प्रत्येक विषयाचा अभ्यास आणि कठोर प्रशासन राबवणारी भूमिका त्यामुळे आम्हालाही खात्याचा कारभार करताना अभ्यास आणि प्रशासनाचा योग्य वापर करण्यावर भर द्यावा लागत असे. त्यांचा दरारा एवढा की, अनेक वर्षे शंकरराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणारे कार्यकर्तेही त्यांच्याशी बोलताना जपूनच बोलतात.

समाजहितात तडजोड नाही

समाजहितासाठी भूमिका घेतली की, तडजोड करणे नाही हा त्यांचा स्वभावधर्म आहे. मग घेतलेल्या भूमिकेच्या परिणामाची तमा न बाळगता ते आपल्या भूमिकेशी ठाम असत. ते कधीही तडजोड करीत नाहीत. या संदर्भात अतिशय परखड अशा स्वभावाबद्दल प्रधानमंत्री पी. व्ही. नरसिंहराव यांनीही १० ऑगस्ट रोजी दिल्लीत शंकररावजींच्या झालेल्या न भूतो न भविष्यातील सत्कार समारंभात गौरव केला आहे.

भूमिका नंतर पटतातच

मराठवाडा, विदर्भ तसेच उर्वरित महाराष्ट्राच्या विकासासाठी विकास योजना त्यांनी राबवल्या. जलसिंचन असो वा इतर अनेक महत्त्वाचे प्रकल्प असोत असे विविध प्रकल्प त्यांनी तत्काळ निर्णय घेऊन राबवले. विचारांशी प्रामाणिकपणा राखणे हे शंकररावांचे खास वैशिष्ट्य राहिलेले आहे. हैदराबाद मुक्तिसंग्रामातील एक लढवय्या सैनिक म्हणून तर विकासावर आणि जनहितावर प्रेम करणारा नेता म्हणूनच त्यांनी आपली वाटचाल चालू ठेवलेली आहे. त्यांची भूमिका कित्येकांना समजली नसेल, टीकाही झाली असेल परंतु योजना साकार

मुंबई येथील अशोकराव चव्हाण यांच्या सागर या शासकीय निवासस्थानी माजी प्रधानमंत्री पी. व्ही. नरसिंहराव, शंकरराव चव्हाण, विलासराव देशमुख, कुसुमताई चव्हाण आणि अमिता चव्हाण.

झाल्यानंतर शंकररावांच्या भूमिकेचे महत्त्व अनेकांना पटल्याचे आपण पाहतो. मराठवाड्याच्या विकास चळवळीचा इतिहास शंकररावांच्या कार्याच्या नोंदीशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. जायकवाडी प्रकल्प आज मराठवाड्याला एक वरदान ठरला आहे. हा प्रकल्प शंकररावजींनी साकार केलेले एक जिवंत स्वप्नच आहे. पाणीवाटपासंबंधी त्यांची भूमिका अशीच स्पष्ट आहे. उसासाठी सर्वाधिक पाणी वाटप होते. त्यामुळे इतर पिकांवर अन्याय होतो. याबाबतची त्यांची भूमिकाही सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या हिताचीच आहे. विषयाचा संपूर्ण अभ्यास केल्याशिवाय, माहिती घेतल्याशिवाय ते बोलत नाहीत. त्यांच्या शिस्तीच्या व अभ्यासू भूमिकेमुळे प्रशासनाला एक वेगळी दिशा लाभली.

शंकररावांकडे जाणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याला अभ्यास करून व विषयाची संपूर्ण माहिती घेऊनच जावे लागते. कारण ते कुठल्या मुद्द्यावर स्पष्टीकरण मागतील याचा अंदाज करता येत नाही. प्रशासनावर त्यांची पकड वादातीत आहे. अगदी मंत्रालयात काम करणारा कर्मचारीसुद्धा सकाळी १० वाजता आपल्या कार्यालयात पोहोचला पाहिजे. सर्वसामान्य जनतेने मंत्रालयात दुपारी दोननंतरच आले पाहिजे. असे नियम त्यांनी केले. १९८६-८७ या काळात ते मुख्यमंत्री असताना सामान्य प्रशासन-खात्याचे राज्यमंत्री श्रीकांत जिचकार सकाळी १० वाजता मंत्रालय प्रवेशद्वारावर थांबले व १० वाजल्यानंतर येणाऱ्या कर्मचाऱ्यांची नोंद घेतली. काही लोकांना हा प्रकार विलक्षण वाटला.

कसोट्यांवरच काम

शिस्तबद्धता, संपूर्ण साकल्याने विचार करूनच विकासाभिमुख निर्णय घेणे याचे फलित आज मराठवाड्यात दिसते आहे. जलसिंचनाबरोबरच विजेच्या बाबतीत मराठवाडा अग्रेसर आहे.

स्वभाव वैशिष्ट्यांचा परिणाम त्यांच्या कार्यकर्त्यांवर झाला आहे का, त्यांचा लोकसंग्रह, कार्यकर्त्यांचा संच मर्यादित का, याचा विचार केला तर कार्यकर्त्यांची सोय व्हावी म्हणून अयोग्य निर्णय त्यांनी कधीही घेतलेले नाहीत. स्वत:च ते अत्यंत स्वच्छ प्रतिमेचे असल्याने लोकहिताचीच कामे त्यांनी केली. त्यांच्या सर्व कसोट्यांवर पारखून निघालेला कार्यकर्ताच त्यांच्या जवळ टिकतो. म्हणून तो कार्यकर्ताही सच्चा असतो. आज सच्च्या कार्यकर्त्यांचाच संच कमी आहे.

राजकारण व प्रशासनापलीकडच्या विषयावर शंकररावांसोबत चर्चा होते. त्यांच्याशी चर्चा करताना एक वेगळा आनंद मिळत असतो. आपल्या नातवंडांबरोबर व कुटुंबीयांबरोबर रममाण होणारे शंकररावही अनेक वेळा मी पाहिले आहेत. शास्त्रीय संगीत ऐकणे तसेच चांगली मराठी नाटके पाहणे हा त्यांचा छंद त्यांनी खास जपलाय. अत्यंत शिस्तीचे शंकररावजी संगीत मैफलीमध्ये मात्र फारच वेगळे दिसतात, हे अनेकदा पाहिले आहे.

देशाची परिस्थिती गुंतागुंतीची बनू पाहत असतानाच ते गृहमंत्री झाले. अशा अवघड परिस्थितीमध्ये गृहमंत्रिपदाची जबाबदारी प्रधानमंत्र्यांचे विश्वासू सहकारी म्हणून ते समर्थपणे पार पाडत आहेत याचा सार्थ अभिमान वाटतो. कै. श्रीमती इंदिरा गांधी, कै. राजीव गांधी यांच्या काळातदेखील आपली वेगळी प्रतिमा त्यांनी कायम ठेवली व त्यांना उत्तम साथ दिली. १९५० पासून सतत सत्तेमध्ये व उच्चपदस्थ राहूनही आपली चारित्र्यसंपन्नता टिकवून ठेवणारे शंकरराव हे एक आगळे व्यक्तिमत्त्व आहे.

स्वत: ते श्रद्धाळू आहेत, भक्तिमार्गाचे आहेत, परंतु याचा परिणाम कधीही बाहेर दिसला नाही. स्तोम दिसले नाही. लोकशाहीत लोकांना बरोबर घेऊन जायचे असते एखाद-दुसऱ्याला नव्हे त्यांच्या कृतीतून, निर्णयातून त्यांनी हे अनेक वेळा दाखवून दिले आहे.

(शंकरराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात विविध पदांचा कार्यभार सांभाळलेले आणि नंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिलेले विलासराव देशमुख यांनी शंकरराव चव्हाण यांच्याविषयी व्यक्त केलेल्या भावना...)

(हा लेख दैनिक एकमतमध्ये पूर्वप्रकाशित)

भारत-श्रीलंका कसोटी सामन्याचा शुभारंभ करताना शंकरराव चव्हाण

नांदेड विमानतळावर माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्यासमवेत शंकररावजी चव्हाण.

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

महाराष्ट्राच्या राजकारणात यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील आणि शंकरराव चव्हाण या चार मुख्य नेत्यांची दखल घेतल्याशिवाय महाराष्ट्राचा राजकीय, आर्थिक आणि सामाजिक इतिहास पुढे जाणार नाही. यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील हे पश्चिम महाराष्ट्रातील, वसंतराव नाईक हे विदर्भातील आणि शंकरराव चव्हाण मराठवाड्याचे, असा हा महाराष्ट्राच्या पहिल्या ४० वर्षांचा राजकीय समतोल आहे.

जलतत्वाचे साधक

उल्हासदादा पवार

जलसंस्कृतीचे जनक म्हणून गौरवपूर्ण उल्लेख करण्यात येणाऱ्या माजी मुख्यमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांचे यंदा जन्मशताब्दी वर्ष आहे. त्या निमित्ताने जलसंधारण, जलसंपदा व पाणीपुरवठा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिंना शंकरराव चव्हाण यांच्या नावाने जलभूषण पुरस्कार देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

निजामाच्या राजवटीत त्या सत्तेविरुद्ध लढा दिलेल्या त्या वेळच्या प्रमुख नेत्यांमध्ये स्वामी रामानंद तीर्थ, पी. व्ही. नरसिंहराव, गोविंदभाई श्रॉफ, अनंतराव भालेराव, गोपाळराव एकबोटे, दिगंबरराव बिंदू, जी. व्यंकट स्वामी, वीरेंद्र पाटील, यांच्या बरोबरीने शंकरराव चव्हाण यांचाही मोठा वाटा होता.

शून्यातून विश्व

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शंकरराव चव्हाण यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात नांदेड नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदापासून सुरू झाली. त्यानंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात उपमंत्रिपदावर काम करण्याची संधी मिळाली. तेथपासून पुढे त्यांची राजकीय जीवनाची कमान वाढतच राहिली. यानंतर त्यांनी मागे वळून कधीही बघितले नाही. मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री, संरक्षणमंत्री, अर्थमंत्री या पदापर्यंत काम केलेल्या डॉ. शंकरराव चव्हाण हे राज्यसभा, लोकसभा, विधान परिषद आणि विधानसभा अशा केंद्र आणि राज्यातील चारही प्रतिनिधिगृहांचे सन्माननीय सभासद राहिले होते. राज्याच्या जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा राहिला. थोर स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेल्या शंकरराव चव्हाण यांनी शून्यातून विश्व

निर्माण केले. कर्तव्यनिष्ठ, लोकाभिमुख, निष्कलंक चारित्र्य असलेले, दूरदृष्टी आणि विचार यांचा समन्वय साधणारे आणि घेतलेल्या कामात पूर्ण झोकून देऊन काम करणे हे शंकररावांचे वैशिष्ट्य होते.

परिपूर्णतेसाठी तळमळ

त्या काळात संजय गांधी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले होते. तो दौरा पुढे पुणे, शिर्डी, औरंगाबाद आणि नांदेड असा गाडीने झाला. त्या संपूर्ण दौऱ्यात संजय गांधी हे ड्रायव्हरलगतच्या सीटवर बसत. मागील सीटवर शंकररावजी, पी. के. सावंत आणि मी असे तिघेही होतो. या दौऱ्यादरम्यान शंकररावजींचे व्यक्तिमत्त्व मला हळूहळू उलगडत गेले. शंकररावजी हे स्वामी रामानंद तीर्थ यांचे अनुयायी होते. त्यांच्या आयुष्याला कमालीची शिस्त होती. प्रत्येक कामात परिपूर्णता येण्यासाठीचा त्यांचा निर्धार, गलथानपणाला योग्य शासन करताना कर्तव्यकठोर होण्याचा गुण आणि उत्तमाची प्रशंसा करण्याचे त्यांचे औदार्यसुद्धा मी जवळून बघितले. मी पश्चिम महाराष्ट्रातून आल्याने आणि वयाने व पदाने त्यांच्यापेक्षा अतिशय लहान असल्यामुळे त्यांच्यासमोर व्यक्त होताना स्वाभाविकच माझ्यात बुजरेपणा होता.

त्यांची निरनिराळी स्वभाववैशिष्ट्ये अनुभवताना माझ्यातील हा बुजरेपणा पुढे यथावकाश दूर होत गेला. नंतर नंतर मी त्यांच्याशी मोकळेपणाने बोलू शकत होतो, कारण ते माझे म्हणणे ऐकून घेतात, हा विश्वास मला आला होता. मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्या पर्वात त्यांनी मराठवाडा ग्रामीण बँक स्थापनेचा निर्णय घेतला, तेव्हा मी सर्व औपचारिक संकेत बाजूला ठेवून त्यांना अभिनंदनाचा फोन केला. परवानगी न घेताच केलेला तो फोन ऑपरेटरने साहेबांनी परवानगी दिल्यामुळे जोडला गेला. मराठवाड्याच्या आर्थिक प्रगतीसाठी हा किती योग्य निर्णय आहे, याचे मी केलेले विश्लेषण त्यांनी शांतपणे ऐकून घेतले, याचे मलाही समाधान मिळाले.

पक्षसंघटना, संघटनेचे पदाधिकारी आणि सत्तेवर असलेले पक्षाचेच मंत्री यांच्यात अनेकदा गैरसमजातून दुरावा येऊ शकतो. ही मानवी प्रवृत्ती आहे. पदाधिकाऱ्यांना वाटते की, आपलाच पक्ष सत्तेवर आहे, तेव्हा आपलेच काम प्राधान्यक्रमाने व्हायला पाहिजे, तर सत्तेवर असलेल्या नेत्याला प्रत्येक कामाची व्यवहार्यता तपासावी लागते. तो शिस्तीचा भाग असतो. यातूनच अनेकदा विसंवाद सुरू होतो. स्व. चव्हाण यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीचा आढावा घेताना त्यांचे जास्त ममत्व मराठवाड्याविषयी होते. मात्र हे ममत्व, फक्त गुणवत्तेच्या आधारावरच होते. त्यांचे हे ममत्त्व पक्षपाती नव्हते.

ऊर्जामंत्री म्हणून ठसा

महाराष्ट्राचे ऊर्जामंत्री असताना कोराडी, पारस, चंद्रपूर ही औष्णिक वीजकेंद्रे शंकररावांच्या काळात उभी राहिली. महाराष्ट्राच्या आजच्या विकासाच्या नकाशात वसंतराव नाईक मुख्यमंत्री आणि शंकरराव चव्हाण पाटबंधारे, वीजमंत्री यांचे योगदान फार मोठे होते. असे हे शंकरराव सलग ५० वर्षे राजकारणात होते. सत्तेची अनेक पदे त्यांना मिळाली त्यांचा गैरवापर न करता सचोटी आणि चारित्र्य यांना त्यांनी आपल्या जीवनामध्ये प्राधान्य दिले. हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट लोकांच्या कायम स्मरणात आहे.

मी पक्षसंघटनेत पश्चिम महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतो, हे त्यांना माहीत होतेच. तेव्हाच्या काँग्रेस संघटनेची एक तगडी शाखा मानल्या गेलेल्या युवक काँग्रेसच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांमध्ये मराठवाड्यातील युवकांचा समावेश व्हावा, असे त्यांना वाटणे साहजिक होते, पण त्यांनी एखाद्या विशिष्ट व्यक्तीची शिफारस नेटाने लावून धरली किंवा त्यालाच लाभाची पदे मिळवून दिली, असे अनुभव ना राज्यातील पदाधिकाऱ्यांना कधी आले किंवा दिल्लीतील श्रेष्ठींनाही कधी आले नाहीत. त्यांचा हा तटस्थ व संयमी गुण आणि गुणग्राहकतेचा स्वभाव सर्वांना ज्ञात होता. गांधी घराण्याशी त्यांची अव्यभिचारी निष्ठा निर्विवादपणे 'निष्ठावंत' म्हणून अधोरेखित होती. पी.व्ही.नरसिंहराव यांच्यासोबतचा त्यांचा दाट मैत्रभाव आम्हा काँग्रेसजनांना माहीत होताच.

ही त्यांची सिद्ध झालेली पार्श्वभूमी आणि त्यांचा प्रचंड अभ्यासू स्वभाव, धार्मिकवृत्ती, सकारात्मक जीवनशैली, कौटुंबिक सद्गृहस्थ म्हणून त्यांचे स्वच्छ व्यक्तिमत्त्व असल्याने त्यांच्या शब्दाला दिल्लीत, महाराष्ट्रातील इतर नेत्यांपेक्षा थोडे अधिक वजन होते.

आपल्या देशासाठी, राज्यासाठी त्यांचे अनमोल योगदान होते. त्याची फलश्रुती ही माझ्यासारख्या कार्यकर्त्याने आजच्या परिस्थितीतही आठवणे हे महत्त्वाचे आहे.

वेगळेपणा

शंकररावजी व्यक्तिगत जीवनात असे निर्व्याज क्षण जपत असतानाच सार्वजनिक जीवनात फार दक्षतेने स्वतःचे स्वत्व जपत असत. त्यांच्या अशा काटेकोरपणाची आठवण सांगताना मला पश्चिम महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाच्या कार्यालयाच्या उद्घाटनाचा प्रसंग आठवतो. हा कार्यक्रम तसा छोटेखानी होता. या कार्यालयासाठी ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले, त्यांचा सत्कार शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते व्हावा, असे नियोजन कार्यक्रम पत्रिकेत होते. पुण्यातील एक बिल्डर त्यातील एक सत्कारमूर्ती होते. शंकररावांनी तो एकमेव सत्कार मला करायला लावला. यातून त्यांचा वेगळेपणा मला त्या क्षणीच जाणवला. राजकीय क्षेत्रात असूनही प्रसिद्धीलोलुपतेचा दुर्गुण त्यांना कधीच चिटकला नाही. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भव्य प्रकल्पांचा शुभारंभ, भूमिपूजन त्यांच्या हस्ते झाले आहे, हे मराठवाड्यातही अनेकांना माहीत नसेल.

पुण्यातील मराठवाडा मित्र मंडळ या संस्थेच्या स्थापनेतील आणि विकासातील त्यांचे योगदान अतुलनीय म्हणावे लागेल. शेती हा अतिशय आवडता प्रांत असल्यामुळे शेती विकास महामंडळाच्या वास्तूचे उद्घाटन त्यांनी आवर्जून वेळ देऊन केले होते.

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

द्रष्टेपण

शंकररावांचे द्रष्टेपण सांगायचे झाले, तर त्यांना प्रत्येक बाबीचे तपशीलवार नियोजन हवे असायचे. नियोजनबद्ध आराखडा असला, तर त्यातून भविष्यातील आव्हानांचा नेमका वेध घेता येतो, हा दृढविश्वास ते बाळगत. त्यांच्या ह्या द्रष्टेपणाची प्रचिती जायकवाडी, विष्णुपुरी, पूर्णा, पैनगंगा, अप्पर मांजरा या प्रकल्पांच्या पूर्णत्वानंतर झालेल्या फायद्यांतून दिसून येते. ही धरणे किमान मराठवाड्यातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहलींच्या माध्यमातून दाखवून शंकररावांनी विकासाचे जे चिरस्थायी ठसे सोडले आहेत, त्याची जाणीव करून द्यायला हवी.

'शंकरराव' म्हणजे पाटबंधारे ही त्यांची उज्ज्वल प्रतिमा राज्यस्तरावर कालही होती, आजही आहे आणि भविष्यातही असणार आहे! ती काळालाही मिटवता येणार नाही. त्या काळात त्यांच्या आठमाही पाणीवाटप धोरणावर मोठा गदारोळ झाला होता. सर्वाधिक गदारोळ एका विशिष्ट प्रदेशात झाला होता. मात्र आज तेच धोरण काळाच्या कसोटीवर योग्य होते. सार्वजनिक विकासाबाबत जागरूक असणाऱ्या शंकररावांनी असाच अभिप्राय जेव्हा सहकार क्षेत्रातील अनागोंदीबाबत व्यक्त केला होता, तेव्हा तर मोठा रोष व्यक्त झाला होता. हे सगळे तेव्हा घडून गेले. मात्र त्यानंतरच्या काळात शंकररावांची ध्येयधोरणेच सत्य ठरत गेली, हाही इतिहास नोंदवावाच लागतो.

साधेपणाचे संस्कार

शंकरराव चव्हाण यांचे व्यक्तिगत आयुष्यही अतिशय काटेकोर आणि नियोजनबद्ध असेच होते. त्यांच्या व्यक्तिगत गरजाही अतिशय मर्यादित होत्या. तिथे चंगळवादाला थारा नव्हता. प्रसिद्धीची हौसही त्यांनी कधी बाळगली नाही. लहानपणापासून त्यांच्यावर जे साधेपणाचे संस्कार झाले, त्यातून त्यांचा अनासक्त स्वभाव घडत गेला असावा. त्यांनी अंगीकारलेली जीवनमूल्ये आजही प्रेरक आणि चिरस्थायी अशी आहेत. आपले स्वतःचे काय आणि गरज काय, याचे त्यांना पक्के भान होते. संगीतप्रेमी शंकररावजी तालमणी शंकरबापू आपेगावकरांचा सदैव सन्मान करत असत. ते आपलेच आहेत, ही भावना त्यांनी कधी सोडली नाही. नाथराव नेरळकर, भगवंत देशमुख, गो.रा.म्हैसेकर, डॉ.स.रा.गाडगीळ, स.मा.गर्गे या मराठवाडी मंडळींना शंकररावांनी 'आप्त' म्हणून दिलेला दर्जा सदैव जपला, हे साऱ्या महाराष्ट्राला माहीत होते. धृपद गायकीतील सर्वोत्तम मानले गेलेले डागर बंधू दिल्लीत शंकररावांच्या जवळ जाऊ शकले, ते अशा आप्तांमुळेच. आपेगावकर यांनी हे घडवून आणले आणि डागरबंधूंना संगीतरसिक असलेल्या शंकररावांचा स्नेह लाभला.

पंढरपूरला जो भव्य दर्शनमंडप उभा आहे, त्याचे भूमिपूजन तत्कालीन राष्ट्रपती शंकरदयाल शर्मा आणि शंकरराव चव्हाण यांनी केले.

चांगले काम छोटे आहे, की मोठे या तपशिलात न पडता शंकररावांनी त्यामागचा शुद्ध हेतू बघून वेळ आणि बळ दिल्याचा प्रसंगही मी त्यांच्यासोबत अनेकदा अनुभवला आहे. एक अनुभव पुण्यातील वनिता समाज या संस्थेतला आहे. पर्वतीलगतच्या या संस्थेत मी त्यापूर्वी कधीच गेलो नव्हतो. एकदा शंकररावजी पुण्यात आले आणि मला सोबत तिथे घेऊन गेले. परांजपेताई या त्या महिला मंडळाच्या अध्यक्षा होत्या. अनाथ आणि परित्यक्ता यांच्यासाठी समर्पित जीवन जगणारे असे ते जोडपे आहे, ही माहिती मला शंकररावजींमुळे तेव्हा समजली.

देहू आळंदी परिसराचा विकास व्हावा यासाठी धुंडामहाराज, साखरे महाराज, शंकरबापू आपेगावकर, बाळासाहेब भारदे, वि.दा.कराड अशी वारकरी संप्रदायातील मातब्बर मंडळी प्रयत्न करत होती. या सगळ्यांसोबत मीही होतो. त्या कामासाठी, तळमळीच्या माणसांसाठी शंकररावजी पुण्यात आले. मलाही त्यांच्यासोबत जाता आले. इंद्रायणी घाटावर त्या दिवशी अतिशय दुर्मीळ मंडळी उपस्थित होती. वसंतदादा पाटीलही सगळे औपचारिक संकेत पाळत शंकररावांच्या आधी पाच मिनिटे घाटावर उपस्थित राहिले होते. पुढे तो घाट तसा लोकवर्गणीतून विकसित झाला. शासनाचे अंशतः काही योगदान त्यात लाभले.

या अशा आठवणींतून शंकररावांची बहुजनहिताय वृत्ती मला पुन्हा आठवून द्यायची होती.

कर्ता माणूस एकदा थांबला किंवा थकला की, त्याच्या जगण्यातील भव्यता पुढच्या पिढीला स्पष्टपणे दाखवून देणे हे आमच्यासारख्या सामाजिक क्षेत्रातील लोकांचे कर्तव्य ठरते. शंकरराव चव्हाण यांच्यासारख्या लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाची राष्ट्रभक्ती वेगवेगळ्या अंगातून समकालीनांना दाखवणे हेसुद्धा मोलाचे काम असते.

सामाजिक बांधिलकी

शंकररावजींच्या सामाजिक बांधिलकी विषयी एक हृद्य आठवण नोंदवताना मला अभिमान वाटतो, कारण ती घटना घडवायला मी कारणीभूत ठरलो होतो. नंतर संपूर्ण महाराष्ट्रात त्यावर सकारात्मक चर्चा घडून आली होती. इतकेच नव्हे तर लोकसत्ताचे तत्कालीन संपादक माधव गडकरी यांनी त्यांच्या 'चौफेर' या सदरातून माझ्या धाडसामुळे घडलेल्या त्या घटनेचे काँग्रेससाठी किती दूरगामी चांगले परिणाम होतील, याचे विश्लेषण केले होते.

शंकररावजी तेव्हा मुख्यमंत्री होते आणि त्या दिवशी एका कार्यक्रमानिमित्त पुण्यात होते. नेमकी त्याच दिवशी लक्ष्मण माने यांनी काढलेली व महाराष्ट्रभर गाजत असलेली भटक्या विमुक्तांची शोधयात्रा पुण्यात प्रवेश करणार होती. त्या यात्रेच्या स्वागतासाठी सकाळी हडपसर येथे बाबा आढाव, नानासाहेब गोरे, शंकरराव खरात

ही मंडळी जशी उपस्थित होती, तसा मीही पक्षाचा पदाधिकारी म्हणून उपस्थित होतो.

या शोधयात्रेची सांगता शनिवारवाड्याच्या पटांगणावर होणार होती. हे मला माहीत असल्याने मी तडक तेथून शंकररावांकडे गेलो. शिस्तप्रिय असलेल्या शंकररावांच्या समोर या यात्रेचे सामाजिक महत्त्व लक्षात घेऊन थोडेसे दडपण घेऊनच बोललो की, जरी लक्ष्मण माने यांनी सांगता सोहळ्याला मुख्यमंत्र्यांना बोलावले नसले, तरी आपण तिथे जाणे औचित्याचे ठरेल. यातून मुख्यमंत्री आणि काँग्रेस पक्ष सामाजिक बांधिलकी जपतात, भटक्या आणि विमुक्तांच्या समस्या जाणून घेतात, हा संदेश जनतेत जाईल. तेव्हा निर्णय आपण घ्यावा, असे नम्रपणे सुचवले.

कोणताही औपचारिक संकेत न बाळगता, राजशिष्टाचार बाजूला ठेवून शंकररावजी त्या दिवशी शनिवारवाड्यावर आले. मी स्वतः हारतुरे सोबत ठेवूनच होतो. त्यामुळे शंकरराव चव्हाण यांच्या हातून लक्ष्मण मानेचा सत्कार करण्याचे माझे नियोजन यशस्वी ठरले. केवढा हा मनाचा मोठेपणा!

हे सगळेच अवाक करणारे होते. मुख्यमंत्री या नात्याने शंकररावांनी जो शब्द तिथे दिला, त्यानुसार पुढे त्यांनी कार्यवाही करण्याबाबत आदेशही दिले. हे पुढे घडत गेले. दुसऱ्या दिवशी या घटनेच्या ठळक बातम्या सर्व वर्तमानपत्रांत छापून आल्या. भटक्या-विमुक्तांविषयी कणव बाळगणारे मुख्यमंत्री शंकररावजी चव्हाण त्या दिवशी मला जवळून अनुभवता आले.

शंकररावांची अशी संवेदनशीलता त्यांनी मुख्यमंत्रिपदावरून घेतलेल्या निर्णयांमधून आजही जाणवते. बळजोरीने बळकावलेल्या आदिवासींच्या जमिनी सावकारांच्या घशातून काढून त्यांना परत करण्याचा निर्णय राज्यात त्यांच्याच काळात झालेला होता. बेघरांना शासकीय योजनेतून घरे बांधून देण्याची योजना त्यांनीच सुरू केली होती.

राज्यस्तरापासून राष्ट्रीय पातळीपर्यंत शंकररावजी जे काही करत गेले ते सारे रचनात्मक होते, कल्याणकारी होते. आमदारांना प्रशिक्षण देण्याची योजना सुरू करणारे शंकररावजी म्हणजे सुजाण नागरिकांचा भारत घडवण्यासाठीचे एक संप्रेरक होते, असे म्हणायला हरकत नाही.

शेतीशी आणि शेतकऱ्यांशी त्यांची नाळ किती घट्ट होती याची प्रचिती त्यांच्या जलसाधनेतून मिळते.

संगीत, नाटक, संस्कृती, साहित्य याबाबतची त्यांची निष्ठा आणि धार्मिक वृत्ती, श्रद्धाळू स्वभाव, साधी जीवनशैली, पक्षनिष्ठा आणि आपल्या नेत्यांविषयी अभेद्य निष्ठा अशी जीवनमूल्ये घेऊन जगलेल्या शंकररावांचे जीवन म्हणजे समाजजीवनातील एक शुभत्व राखणारा नंदादीप होय.

जलतत्त्वाचे सर्वोत्तम साधक असलेल्या शंकररावजींचा अमृतमहोत्सवी सत्कार मी पुण्यात बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित केला होता. तो सोहळा पुण्यात असूनही तुडुंब गर्दीचा पूर आला होता. त्या दिवशी मी प्रास्ताविकही करू शकलो आणि पसायदानही म्हटले.

राजकीय क्षेत्रात राहूनही समाजासाठी माझ्या हातून चांगले काम होऊ दे, असे ईश्वराकडे मागणे मागणाऱ्या शंकररावांसमोर मी पसायदान म्हणू शकलो, हा योगायोग सांगत त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त संस्मरण करताना आज मला कृतार्थ वाटते आहे.

शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेताना मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण.

भाषांवर प्रभुत्व

शंकरराव चव्हाण यांचे मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू या भाषांवर प्रभुत्व होते. मुद्देसूद आणि नेमके बोलणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. जीवनाच्या वाटचालीत अध्यात्माची अनामिक बैठक होती. नीतिमूल्ये, ज्ञानभक्ती, श्रद्धेची बैठक होती. १४ जुलै हा त्यांचा वाढदिवस ते अत्यंत साधेपणाने साजरा करायचे. नवीन पिढीला राजकारण, समाजकारण करायचे आहे त्यांना शंकररावांचे जीवन मार्गदर्शक, प्रेरणादायी व बरेच काही शिकवून जाणारे आहे. त्यांच्या जीवनशैलीतून हे गुण कसे आत्मसात करता येतील, ही प्रेरणा घेणे हीच त्यांना कृतिशील आदरांजली होईल, असे मला वाटते.

(लेखक विधान परिषदेचे माजी सदस्य आहेत.)

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

ज्येष्ठ नेते शंकरराव चव्हाण यांच्याबरोबर मला जवळून काम करण्याचा योग आला. प्रथम ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना, मुख्यमंत्र्यांचा सचिव तसेच प्रधान वित्तसचिव म्हणून आणि त्यानंतर ते केंद्र शासनात गृहमंत्री असताना केंद्रीय गृहसचिव म्हणून. शंकरराव चव्हाण यांची प्रतिमा एक कणखर, सचोटीचा व करारी प्रशासक अशी होती आणि ती आजवरही कायम आहे, असे म्हणावे लागेल. सरदार पटेल यांना राज्यघटना तयार करताना जे राजकीय नेतृत्व अभिप्रेत होते तेच शंकररावांच्या रूपाने आपण पाहिले.

कणखर आणि करारी

माधव गोडबोले

स्वातंत्र्योत्तर काळात देशाची प्रशासकीय व्यवस्था कशी असावी याबाबत सरदार पटेल यांची काही मते होती. त्यांना अभिप्रेत असलेली प्रशासकीय व्यवस्था अशी होती. ती स्वतंत्र व स्वायत्त असावी, तिची बांधिलकी फक्त राज्यघटनेला व त्यातील तत्त्वांना असावी; प्रशासकीय अधिकारी कोणत्याही राजकीय पक्षाशी व त्याच्या विचारसरणीशी संलग्न असू नयेत व त्यांना निर्भीडपणे, मोकळेपणाने आणि वस्तुनिष्ठपणे राज्यकर्त्यांना सल्ला देण्याचे स्वातंत्र्य असावे. तसेच त्यांच्या सर्व कारभारात पारदर्शकता असावी व आपल्या निर्णयांची जबाबदारी घेण्याची त्यांची तयारी असावी.

राज्यघटनेला अभिप्रेत असलेल्या या प्रशासकीय व्यवस्थेनुसार प्रशासन हे दरबारातील खुशमस्कऱ्यांचे नसावे, ते केवळ दरबारी कानडा राग आळवणारे नसावे, तर प्रशासकीय अधिकाऱ्यांनी निर्भीडपणे राज्यकर्त्यांना सल्ला द्यावा, कायद्याचे राज्य ही संकल्पना दृढ करावी अशी कल्पना होती. स्वातंत्र्यानंतरच्या काळात प्रशासनाबाबतची प्रतिमा बदलत गेली. सुरुवातीला प्रशासन हा एक घोडा आहे, अशी समजूत होती आणि त्यामुळे मंत्र्याची या घोड्यावरील मांड कशी आहे यावर प्रशासन कसे चालेल हे अवलंबून असेल, असे म्हटले जायचे. त्यानंतरच्या काळात मंत्र्यांच्या हातात चाबूक असल्याशिवाय या घोड्यावर नियंत्रण ठेवता येणार नाही असाही समज प्रचलित होता. आता तर कारकुनांपासून ते मुख्य सचिवांपर्यंत सर्वांनाच उपहासाने 'बाबू' म्हणून संबोधले जाते. अगदी प्रसिद्धी माध्यमांचाही त्याला अपवाद नाही.

मराठवाडा विकास महामंडळ कार्यालयाच्या कोनशिलेचे अनावरण करताना शंकरराव चव्हाण.

लोकशाहीचा मुलाधार

ही पार्श्वभूमी मुद्दामच मी काहीशा विस्ताराने नमूद करीत आहे, कारण शंकरराव चव्हाण यांनी प्रशासनाकडे या दृष्टीने कधीच पाहिले नाही. कोणत्याही विषयावर दुमत असणे यात काहीच गैर नाही. परंतु, अखेरचा निर्णय हा एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण करून घेणे हा लोकशाहीचा मूलाधार आहे, असे मी मानतो आणि त्या दृष्टीने शंकररावांची महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील कामगिरी लक्षणीय होती यात शंका नाही. किंबहुना प्रशासनाला बरोबर घेऊनच चालले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता.

या ठिकाणी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. त्यांनीही महाराष्ट्रात व केंद्र शासनात आपली कारकीर्द गाजवली, त्यांच्याही कामाची ही उल्लेखनीय बाब होती. सुदैवाने मला या दोन्ही नेत्यांसोबत जवळून काम करण्याची संधी मिळाली.

यशवंतराव चव्हाणांचा स्वीय सचिव म्हणून मी साडेतीन वर्षांहून अधिक काळ ते केंद्रीय गृहमंत्री व केंद्रीय वित्तमंत्री असताना काम केले. या दोन्ही नेत्यांमध्ये काही मतभेद होते, हे सांगण्याची आवश्यकता नाही आणि म्हणूनच त्या दोघांच्याही बरोबर इतक्या जवळून काम केलेला महाराष्ट्रातील मी एकमेव अधिकारी असल्याचा मला रास्त अभिमान आहे.

योग्य तेच केले

शंकरराव चव्हाणांनी घेतलेले अनेक निर्णय हे लोकांच्या सहजी पचनी पडण्याजोगे नव्हते. त्यात प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे तो म्हणजे शून्याधारित अर्थसंकल्पनेचा. याचा पुरस्कार प्रधानमंत्री राजीव गांधी यांनी केला होता, पण देशात ते कार्यान्वित करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य होते. हा निर्णय सर्व मंत्र्यांनी व सचिवांनी मोकळ्या मनाने मानावा व कार्यान्वित करावा यासाठी त्यांनी प्रथमच पुण्यातील यशदा या संस्थेत वर्ग भरवून, सचिवांना व मंत्र्यांना अगदी विद्यार्थ्यांसारखे बाकावर बसवून, त्यांना ही कल्पना त्या विषयातील जाणकारांमार्फत समजावून दिली आणि त्यानुसार प्रत्येक मंत्र्याने आपल्या विभागाचा बारकाईने आढावा घेऊन ही संकल्पना कशी यशस्वी करता येईल हे पाहण्याचे त्यांना निर्देश दिले. कदाचित त्यामुळेच त्यांना 'हेडमास्तर' हे नामाभिधान मिळाले.

शून्याधारित अर्थसंकल्पनेचा हा उपक्रम केवळ मंत्र्यांनाच नव्हे, तर अधिकाऱ्यांनाही नकोसा झाला होता. कारण अर्थसंकल्प तयार करताना त्यांना असा प्रश्न विचारला जाणार होता की तुमच्या खात्याला येत्या वर्षात काहीच आर्थिक तरतूद केली नाही तर काय होईल? कित्येकांसाठी असा विचार करणेही गर्भगळित करणारे होते. त्या वेळी मी प्रधान वित्त सचिव असल्याने माझे नावही बदलून, 'डॉक्टर नो' करण्यात आले होते. ३५-४० वर्षे उलटून गेल्यानंतरही आजही महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री उपहासाने असा उल्लेख करण्यास विसरत नाहीत पण मी मात्र, हा माझा गौरव समजतो. शासनातील गैरकारभाराला वित्तीय शिस्त लावण्यासाठी हा उपक्रम आजही आवश्यक आहे.

विकास मंडळाबाबत दूरदृष्टी

राज्यघटनेच्या कलम ३७१ नुसार विभागीय विकास मंडळे स्थापन करण्यास शंकररावांनी विचारपूर्वक विरोध केला होता. असे करण्याने लोकनिर्वाचित सरकारचे अधिकार राज्यपालांकडे सुपुर्द करणे हे लोकशाहीला धरून होणार नाही हा त्यांचा मुद्दा योग्यच होता. पण अखेर लोकाग्रहास्तव ही मंडळे स्थापन झाली. शंकररावांनी केलेला विरोध रास्त होता, असे मानणारे अनेक लोक आजही दिसून येतात. त्यापैकी मी एक आहे.

नागरिक प्रथम

आज महाराष्ट्र शासनात ५ दिवसांचा आठवडा झाल्याबद्दल आनंदोत्सव साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर हे मुद्दाम नमूद केले पाहिजे की, शंकरराव चव्हाणांचा असा आग्रह होता की, भारतासारख्या विकसनशील देशात सर्व सरकारी कर्मचाऱ्यांनी आठवड्यातील ६ दिवस काम करावे. तसेच महाराष्ट्रात फक्त तीनच सुट्या असाव्यात - २६ जानेवारी, १५ ऑगस्ट आणि १ मे. कर्मचाऱ्यांना त्या वेळी दरवर्षी मिळणाऱ्या १७-१८ नैमित्तिक सुट्यांपैकी कोणतेही ८ दिवसच सुटी घेता येणार होती. महाविद्यालयीन व विद्यापीठातील शिक्षकांना त्या वेळच्या वर्षातील १२ आठवड्यांऐवजी ६ आठवडेच सुटी जाहीर करण्यात आली. मुंबईतील बसची व लोकलची गर्दी टाळण्यासाठी शासकीय तसेच इतर सरकारी व निमसरकारी कार्यालयांच्या वेळात बदल करून ते निरनिराळे करण्यात आले. नुकत्याच मंत्र्यांना दालने वाटप करण्याबाबतच्या बातम्या वाचनात आल्या. शंकररावांनी त्या काळी असा निर्णय केला की, सर्व मंत्र्यांची कार्यालये मंत्रालयाच्या ५ व्या व ६ व्या मजल्यावर ठेवण्याऐवजी ती त्यांच्याकडील विभाग ज्या मजल्यावर असेल, त्या मजल्यावरच असावीत. आपण कल्पना करू शकाल की हे व असे अनेक निर्णय पटण्यासारखे नव्हते आणि त्यामुळे सरकार बदलल्यानंतर लगेचच ते बदलण्यात आले. पण असे झाले तरी शंकरराव त्यांचा ठसा शासनावर व जनमानसावर उमटवून गेले यात शंका नाही.

सचिवालयाचे झाले 'मंत्रालय'

शंकररावांच्या कारकिर्दीतच सचिवालयाचे नाव बदलून ते मंत्रालय करण्यात आले. कारण राज्याचे अधिष्ठान हे सचिव बसतात ते नसून मंत्री काम करतात ते असावे अशी त्यांची धारणा होती. त्या वेळी महाराष्ट्राला विजेच्या कमतरतेने कमालीचे ग्रासले होते. त्यामुळे शंकररावांनी एक मोठा निर्णय घेऊन दर वर्षीच्या योजना निधीतून ३० टक्के रक्कम वीजक्षेत्रासाठी राखून ठेवावी असे ठरवले. त्या वेळी मी महाराष्ट्र वीजमंडळाचा अध्यक्ष होतो. त्यामुळेच महाराष्ट्रातील वीज उत्पादन व वहन प्रकल्पांना मोठी गती मिळाली. त्याबरोबरच त्या काळी विशेष मानला गेलेला आणखी एक निर्णय त्यांनी घेतला आणि तो म्हणजे खासगी क्षेत्रातील वीज उत्पादनाला दिलेले प्रोत्साहन.

आदेश लेखीच...

शंकरराव चव्हाणांच्या कार्यपद्धतीबद्दल सांगितले पाहिजे. त्यांनी त्यांचे सर्व आदेश लेखी दिले, तोंडी आदेश देऊन त्यांनी अधिकाऱ्यांना अडचणीत टाकले नाही. त्यांच्या कोणत्याही निर्णयाचा फेरविचार करण्याची त्यांची तयारी असे. आणि तशी विनंती केल्यास ते कधीच गैर मानत नसत. कोणत्याही कायद्यातून वा नियमातून पळवाट काढण्याचा आग्रह त्यांनी अधिकाऱ्यांना कधी केला नाही. कोणतेही प्रकरण कायद्यात बसवा, त्यातून मार्ग काढा असे सांगण्याचा त्यांचा स्वभावच नव्हता. मंत्र्यांनी वा अधिकाऱ्यांनी घेतलेले निर्णय योग्य आहेत, अशी त्यांची खात्री पटली तर ते त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत असत. त्याबरोबरच कोठे भ्रष्टाचार दिसून आला तर त्याचाही ते कणखरपणे पाठपुरावा करीत. उदाहरणार्थ,

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या सुरुवातीच्या काळात, त्या वेळच्या महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या अध्यक्षांविरुद्ध भ्रष्टाचाराचे मोठे आरोप होते. हा प्रश्न विधान परिषदेत व विधान सभेतही निकराने मांडण्यात आला होता. शंकरराव चव्हाण यांनी त्यांच्या पक्षांतर्गत मोठा राजकीय विरोध असतानाही, मंडळाच्या अध्यक्षांना निलंबित केले व त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाईही केली. त्या काळातील हे एक मोठेच गाजलेले प्रकरण होते म्हणून मी त्याचा मुद्दाम उल्लेख करीत आहे.

शंकररावांना सिंचनाच्या प्रश्नांची खोलवर जाण होती आणि त्यामुळे त्या खात्याच्या जाणकार अधिकाऱ्यांमध्येही त्यांच्याबद्दल आदरयुक्त दरारा होता. एकूणच फाईलींचा अभ्यास करण्याचा त्यांचा कटाक्ष होता त्यामुळे फाईल वरवर पाहणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांची जरब वाटे. आणि असे अधिकारी काही कमी नव्हते हे नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही.

त्यांचे ऐकले असते तर...

शंकरराव केंद्रीय गृहमंत्री असतानाची सर्वात मोठी घटना म्हणजे अयोध्यातील बाबरी मशिदीचे प्रकरण. गृह मंत्रालयाने पुन्हापुन्हा तत्कालीन प्रधानमंत्री नरसिंह राव यांना परिस्थितीची जाणीव करून दिली होती. कोणत्याही स्थितीत अघटित घडायचे नसेल तर कल्याणसिंग यांचे उत्तर प्रदेशातील सरकार बरखास्त करावे लागेल. हा अतिशय संवेदनशील प्रश्न असल्याने शंकररावांनी अनेकदा याबाबतीत प्रधानमंत्र्यांशी चर्चा करून लवकर निर्णय करावा, अशी विनंती केली होती, परंतु शेवटपर्यंत प्रधानमंत्र्यांनी निर्णय घेणे टाळले आणि उर्वरित इतिहास सर्वांना ज्ञात आहे. आणखी एका बाबीचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे आणि तो म्हणजे काश्मीरबाबतच्या धोरणाचा. १९९१-९२ या काळात काश्मीर मोठ्या दहशतवादाचा सामना करीत होता. कणखर उपाययोजना केल्याशिवाय त्यावर मात करता येणार नाही असा सल्ला शंकररावांनी प्रधानमंत्र्यांना दिला होता. पण तोही मान्य झाला नाही.

मॉर्निंग मीटिंग

दिल्लीत असताना शंकररावांनी आणखी एक प्रथा सुरू केली होती. ती होती दररोज सकाळच्या त्यांच्या मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीची. त्यात मंत्रालयाचे सचिव व वरिष्ठ पोलीस व गुप्तहेर विभागाचे अधिकारी हजर असत व सर्व महत्त्वांच्या प्रश्नांवर मनमोकळी चर्चा होत असे. त्यामुळे निर्णयप्रक्रिया सोपी व पारदर्शक होण्यास मोठी मदत होत असे.

आणखी एका बाबीचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. महाराष्ट्रातून दिल्लीला जाणाऱ्या अनेक मंत्र्यांना इंग्रजी व हिंदीत लिहिण्याचा व बोलण्याचा सराव नसल्याने अडचण येते. पण शंकररावांना ही अडचण कधीच आली नाही. वरील दोन भाषाच नव्हे तर उर्दूचीही त्यांना जाण असल्याने त्यांची संसदेतील भाषणे प्रभावी होत.

अशा या प्रभावशाली प्रशासकाला खरी श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी मला एक सुचवावेसे वाटते की, सुशासन (गुड गव्हर्नन्स) हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार झाला पाहिजे. या शताब्दी महोत्सवाचा पाठपुरावा म्हणून मी असे आग्रहाने सुचवेन की, केंद्र शासनाला अशी विनंती करावी की, घटनेत दुरुस्ती करून हा मूलभूत अधिकार मान्य करावा. हीच शंकरराव चव्हाणांना दिलेली खरी श्रद्धांजली ठरेल.

(लेखक हे निवृत्त केंद्रीय गृह सचिव आहेत.)

ऑस्ट्रेलियाच्या संसदेचे उपाध्यक्ष हेन्री जेन्कीन्स् यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळासोबत गृहमंत्री शंकरराव चव्हाण.
(सौजन्य : संसदीय संग्रहालय तथा अभिलेखागार, लोकसभा सचिवालय, नवी दिल्ली)

साहेबांचे आयुष्य हे असंच रणरणत्या उन्हासारखं. त्यांनी स्वीकारलेली वाट. काट्याकुट्यांची नि अनिश्चिततेची पण त्या वाटेने त्यांचेबरोबर चालत असताना त्या उन्हाची झळ त्यांनी आम्हाला लागू दिली नाही की पायात कधी काटा बोचू दिला नाही. स्वत: उन्हं सोसून समाजसेवेचे व्रत घेतलेला तो महावृक्ष आम्हा सगळ्यांवर मायाभरली छायाच धरत राहिला...

कृतार्थ !

कुसुम शंकरराव चव्हाण

काळ अखंड धावत असतो. त्याच्या पावलांचा आवाज कधीच येत नाही. त्याच्या समोरचा मार्गदेखील कधी संपत नाही. या मार्गावर नात्यांची, संबंधांची, मायेची, आपुलकीची, नुसत्या परिचयाची अन् अतूट सहजीवनाची मोठी अजब सरमिसळ असते. माणसांची आयुष्ये त्या मार्गाच्या दोन्ही बाजूंना असतात. काळ त्यांना कधी भेटवतो तर कधी अलगद बाजूला ढकलतो.

पण काळानं बाजूला करूनही 'सहजीवनाची' शपथ निरंतन असते कारण ती घेतलेली असते मनांनी अन् स्वीकारलेली असते भावनांनी.

माझ्या अन् साहेबांच्या जीवनाची रेशीमगाठ बांधली गेली, तो क्षण... त्यांच्या कर्तृत्वाची छाया माझ्या जीवनावर पडली तो प्रसंग.. त्यांच्या विचारांशी मी नकळत बांधली गेले, ती वेळ... त्यांच्या अन् माझ्या निष्ठा एक झाल्या ती मानसिक अवस्था एकमेकांच्या साथीनं भोगलेली दु:खं अन् उपभोगलेली सुखं...सोसलेले गरिबीचे चटके अन् मिरविलेले वैभवाचे अलंकार... अस्थिरतेचे ऊन आणि स्थैर्याची, लौकिकाची छत्रछाया...

असे कितीतरी शिंपले.. आठवणींचे - काळजात खोलवर जपून ठेवलेले...अन् त्यातले सोनक्षणांचे 'अस्सल मोती'!! कधीतरी मी एकटी असते, तेव्हा पूर्वीचे ते दिवस भोवताली जमतात, बोलावतात, नकळत फेर धरतात, मग मी त्यात रमून जाते साहेबांचं बोलणं, वागणं, विचार करणं, निर्णय घेणं..त्यांच्या ओळखी... स्नेहसंबंध...आजूबाजूची माणसं... टोचलेलं, वेचलेलं अन् रंगलेले राजकारण, यश-अपयशाचे चढ-उतर... त्यात आपलं स्थान...आम्हा दोघांचं घर...फुललेला हसरा संसार..त्यातल्या कडू-गोड घटना हे अन् असं कितीतरी, मनाच्या अंगणात प्राजक्त फुलांसारखं टपटपतं...

सहप्रवासाला सुरूवात

आठवतं, मराठवाड्यातल्या एका साध्या-भाबड्या शेतकरी कुटुंबातली एक अजाण पोर... लाडा-कौतुकात वाढलेली. कर्तव्याची जाण घेतलेली, वडीलधाऱ्यांच्या धाका-शिस्तीत मोठी होणारी. तिच्या आयुष्यात तिला भेटलेला दिगंत कीर्तीचा अन् आभाळाएवढ्या कर्तृत्वाचा सहप्रवासी. ती पोर त्या महान व्यक्तित्वाशी एकरूप झाली. मनी अतीव आदर बाळगीत प्रभावित होऊन सावलीसारखी चालत राहिली. त्या व्यक्तिमत्त्वानं तिला नुसतं सौभाग्याचं कुंकूच दिलं नाही तर भाळावर कृतार्थतेची भाग्यरेषा दिली. प्रत्येक पावलाला सांभाळून घेत, जपत, आत्मविश्वास देत सहप्रवासाची चाल सतत सुरू राहिली...

पाटबंधारे प्रकल्पाची पाहणी करताना शंकररावजी.

खरं सांगू? कितीतरी वेळा अगदी मनापासून वाटायचं, हे सारं कोणाला तरी सांगावं, भाग्याने दिलेल्या या सुखाच्या वर्षावात कुणाला तरी साथीदार करून घ्यावं, भरभरून बोलावं, माझ्या साहेबांच्या थोरवीविषयीचं वर्णन करावं....पण सांगितलं ना, मी त्या मानानं अगदीच

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

साधीसुधी, शब्दांशी खेळण्याची किमया माझ्यात नाही. मोठमोठे शब्द वेचण्याऐवजी साहेबांच्या जवळ असलेल्या मोठमोठ्या माणसांच्या सहवासातच मी जास्त राहिले. त्यामुळे स्वत:च्या भावना शब्दांत बांधण्याचं कौशल्य माझ्याकडं नाही. पण, अर्थ पेलणाऱ्या शब्दापेक्षा जीवनाला अर्थ देणाऱ्या भावना जास्त मोलाच्या असतात, यावर विश्वास ठेवणारी मी एक साधीसुधी गृहिणी आहे. त्यामुळे रेशीमगाठीत बांधलेल्या आमच्या सहजीवनातल्या आठवणींची शिदोरी हळुवारपणे सोडण्याचा हा माझा प्रामाणिक प्रयत्न...!

आमचे साहेब श्रीमान शंकररावजी चव्हाण हे आज स्वतंत्र भारताचे अत्यंत कर्तृत्ववान गृहमंत्री. देशाच्या राजकारणात क्रमांक दोनच्या पदावरील व्यक्तिमत्त्व असाच काहीसा त्यांचा गौरव. मला राजकारण नि राजकारणाची भाषा नीटशी समजत नाही. कानावर पडतं ते जमेल तेवढं साठविण्याचा प्रयत्न करते; बस्सं... तर सांगायचा मुद्दा असा की, राजकारणाच्या अलीकडं आमचं एक सुंदरसं जग होतं ते राजकारणाच्या पलीकडंदेखील आम्ही जपलंय! आम्ही म्हणजे आम्ही दोघांनीही...!

आमचं छानसं कुटुंब आहे. लेकी, सुना, जावई, नातवंड असा भरलेला, घरपण लाभलेला गोंडस परिवार आहे. या छानशा कुटुंबाकडं, भरल्या घराकडं पाहिलं की मनावर अगदी कृतार्थतेचा वर्षाव होतो.

कठोरपणातून समृद्धी

राजकारणात त्यांना 'हेडमास्तर' म्हटलं जातं ते त्यांच्या अंगी बाणलेल्या कडक शिस्तीमुळेच अशाच शिस्तीची ते साऱ्यांकडून अपेक्षा करत असतात. कधीकधी त्या बाबतीत कठोरही होतात. पण कठोरपणात त्यांना भविष्यातली समृद्धी दिसत असते. माणसाबाहेर येऊन कर्तव्यबुद्धीने राबवलेली शिस्त आणि प्रशासन हेच विद्यार्थ्यांना शिस्तीच्या मार्गाकडून उन्नतीच्या दिशेने घेऊन जातात आणि हेच 'हेडमास्तरांचे' गुण आहेत.

अशा हेडमास्तरांच्या, एका कर्तृत्ववान पुरुषाच्या, ध्येयपूर्तीची महत्त्वाकांक्षा असणाऱ्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या, सुख-दु:खात, ऊनपावसात भागीदार असलेली नि गेल्या ५१ वर्षांच्या अखंड साथीची मी सहचारिणी आहे. उभ्या महाराष्ट्राला आपल्या आगळ्यावेगळ्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवणाऱ्या साहेबांना मी जवळून निरखलंय.. पारखलंय...! म्हणूनच हे अनुभव कथन करणारा माझ्याइतका जिवंत साक्षीदार दुसरा कोण असू शकेल? कृतार्थ सहजीवनाच्या वाटेवरील एक साथीदार याच भूमिकेतून मी हे सारं काही बोलतेय...

जीवनात उमललेल्या या अपूर्व योगाचं औचित्य साधून उचंबळलेल्या हृदयातून एक-एक आठवण सांगण्यासाठी नि आपल्याच लोकांशी मनमोकळी बातचीत करायची एवढ्यासाठीच हा सारा 'शब्दप्रपंच'...

(महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या अर्धांगिनी कुसुम शंकरराव चव्हाण यांनी 'कुसुमांजली' या पुस्तकाद्वारे आपले एकूण सहजीवन उलगडले आहे. त्यांच्या या पुस्तकातील त्यांनी व्यक्त केलेल्या भावनांचा संपादित भाग..)

अपूर्व योग

खरंच आहे ते, जीवन अगदी गतिमान झालंय ! हां हां म्हणता वर्षामागून वर्षे निघून गेली. आठवणीतल्या नाना गोष्टी काळाच्या पडद्याआड अदृश्य झाल्या. काहीतरी देऊन, काहीतरी शिकवून पण आनंद देऊन... हे १९९४ चं वर्ष...! माझ्या आयुष्यात नि:संशय त्रिवेणी संगमाचं नि अपूर्व योगायोगांचं ! साहेबांची पंचाहत्तरी... माझी पासष्टी... अन् शिवाय आमच्या सहजीवनाच्या सुवर्णमहोत्सवाची वाटचाल.... हा अपूर्व योग लाभल्यावर मी स्वत:ला भाग्यशालीच म्हणायला हवं नाही का ?

गोदातीर ते यमुनातीर या माझ्या अखंड प्रवासात मी जीवनाच्या रंगभूमीवर कन्या, पत्नी, सून, आई नि आजी अशी पंचरंगी भूमिका बजावली. प्रत्येक भूमिकेत माझ्या ओंजळीत परमेश्वराने भरभरून यश दिलंय! वैवाहिक जीवनातील एक तृप्त स्त्री म्हणून खरोखरीच मला सारं काही मिळालंय! साहेबांच्या सहवासात दिवस सतत सुख-दु:खाच्या हिंदोळ्यावर झोके घेत राहिले. पण सुखात कधी डुंबून राहायचं नाही आणि दु:खाने कधी हताश व्हायचं नाही, हे साहेबांच्या जीवनाकडं पाहत मी शिकत राहिले!

मी तशी फारशी शिकलेली नाही. साहेबांपासून नातवंडांपर्यंत मात्र आमचं कुटुंब चांगलंच शिकलं नि अजूनही शिकतंय. माणसानं सतत शिकलंच पाहिजे, शिक्षणासाठी धडपडलं पाहिजे हा साहेबांचा मनोमन आग्रह. शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांचे हाल साहेबांना कधीच बघवले नाहीत. म्हणूनच शिकणाऱ्यांसाठी काहीतरी करावं हे त्यांचं स्वप्न आणि शिस्तीत शिकत राहा, असं मनापासूनचं सांगणं. ज्ञानातूनच विकासाचा महामार्ग जात असतो यावर त्यांची निष्ठा आहे आणि तीच कल्याणाची दिशा अवघ्या बांधवांनी स्वीकारावी आणि त्यांच्याही जीवनात समृद्धीचे आनंदपर्व सुरू व्हावे, याचा त्यांना सतत ध्यास असतो.

साहेब मला नि माझ्या कुटुंबाला हिमालयासारखे वाटतात. त्यांच्या सावलीत आम्ही अगदी सुरक्षित आहोत. या क्षणी मला आठवतात त्या बहिणाबाईंच्या ओळी...!

माय भिमाई माऊली, जशी आंब्याची सावली !
आम्हाईलं केलं गार, स्वत: उन्हात तापली !!

शंकरराव चव्हाण यांनी प्रवाहाच्या विरुद्ध पोहून ५० वर्षे राजकारणातील आपली जागा टिकवली. या जागेचे मूल्य अबाधित ठेवून सार्वजनिक जीवनातील स्वच्छ राजकारणाचा आग्रह धरताना त्यांनी जे सोसले ते फारच थोड्यांच्या वाट्याला आले असेल. एकीकडे भरपूर सत्तापदे वाट्याला आली असतानाच अनेक वेळा त्यांना ज्या उपेक्षा सहन कराव्या लागल्या, त्यातल्या अनेक घटना हृदयाला जखम करणाऱ्या आहेत. महाराष्ट्राच्या राजकीय नभोमंडळातील स्वच्छ चारित्र्याचा हा तारा २६ फेब्रुवारी २००४ रोजी निखळून पडला.

स्वच्छ चारित्र्याचा तारा

मधुकर भावे

शंकरराव चव्हाण हे एक आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व होते. निझामी राजवटीतील मराठवाड्यातील एका खेड्यात शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या शंकरराव यांनी देशाच्या राजकारणातही आपले निर्विवाद नेतृत्व निर्माण केले. मुख्यमंत्री, नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष, केंद्रीय अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, गृहमंत्री अशा श्रेष्ठ पदावर काम करताना शंकररावांची विवेकबुद्धी कमालीची जागृत होती म्हणून सामान्य माणसाच्या हिताच्या बाजूने त्यांनी सत्ता वापरली. त्यांची एक नव्हे तर शंभर उदाहरणे दाखवता येतील. त्यांच्या ५० वर्षाच्या राजकीय आयुष्यामध्ये या नेत्याने एका खोलीत आपला संसार हैदराबादला सुरू केला होता, हे खरे वाटणार नाही. १९७७ साली मुख्यमंत्री पदावरून पायउतार झाल्यावर मुंबईच्या आमदार निवासात एका खोलीत संसार थाटून जुन्या विधानमंडळात चालत जाणारे हे माजी मुख्यमंत्री होते. हे आज कोणालाही खरे वाटणार नाही.

कठीण परिस्थितीशी सामना

निझामी राजवटीत शंकरराव वाढले. वडील शेतकरी होते. शिक्षण घेणे सोपे नव्हते. शिकवण्या करून त्यांनी उच्च शिक्षण घेतले. हैदराबादच्या सिटी कॉलेजमधून पहिल्या श्रेणीत ते मॅट्रिक झाले आणि त्यामुळेच गुणवत्तेवर निझाम कॉलेजमध्ये त्यांना प्रवेश मिळाला. उस्मानिया विद्यापिठातून एलएलबी झाल्यानंतर शंकररावांनी निझामी राजवटीविरोधात हैदराबादच्या बार असोशिएशनमधील वकिलांना संघटित केले. न्यायाधीशांवर बहिष्कार घातला. निझामी राजवटीच्या विरोधात शंकरराव चव्हाण यांनी यवतमाळ जिल्ह्याच्या उमरखेड येथे राहून कॅम्प उभा केला. विद्यार्थिदशेत असतानाच त्यांना खूप कठीण परिस्थितीशी सामना करावा लागला. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहांची सोय नसेल तर काय हाल होतात, याची कल्पना असल्यामुळेच सत्ता हातात आल्यावर त्यांनी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे बांधली. नांदेडचे शारदा भवन, औरंगाबाद, पुणे व मुंबईची वसतिगृहे किंवा शिक्षण संस्था या शंकररावजी जे भोगले त्यातून उभ्या राहिल्या आहेत.

विष्णुपुरी उपसा जलसिंचन प्रकल्पाच्या नवीन कामाचे पूजन करताना शंकरराव व कुसुमताई.

हेडमास्तर

१९५२ साली नांदेड नगरपरिषदेचे अध्यक्ष झालेले शंकरराव चव्हाण यांच्या जीवनात एक किस्सा असा घडला की, नांदेड शहरातील एका व्यक्तीचे काम करण्यासाठी त्या व्यक्तीने एक हजार रुपयांची लाच देण्याचा प्रयत्न केला. शंकररावांच्या घरात टेलिफोनही नव्हता, त्या व्यक्तीला घरातच बसवून समोरच्या दुकानात जाऊन त्यांनी पोलिसांकडे तक्रारीचा टेलिफोन केला आणि जिल्हाधिकारी भूजंगराव कुलकर्णी, पोलीस अधीक्षक त्र्यंबकराव पातुरकर यांच्या

ताब्यात त्या चलनी नोटा आणि ती व्यक्ती दिली. त्या घटनेनंतर शंकररावांच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना साऱ्या महाराष्ट्राला आली असावी, त्यामुळे या शिस्तप्रिय, स्वच्छ राजकीय नेत्याला ते मुख्यमंत्री झाल्यावर त्यांच्या विरोधकांनी हेडमास्तर म्हटले, पण चुकीचे काम सांगायला कुणी धजावले नाही.

निर्भीड व्यक्तिमत्त्व

शंकररावांनी सत्तेचा उपयोग सामान्य माणसासाठीच केला. महाराष्ट्रात शेतजमिनीच्या कमाल मर्यादेबाबत आणि अतिरिक्त जमीन घोषित करण्यासाठी आलेला कायदा याचा पुरावा ठरेल. हा कायदा करताना संयुक्त भांडवल कंपन्यांच्या जमिनीला अतिरिक्त जमीन घोषित न करण्याला परवानगी दिली गेली होती. शंकरराव चव्हाण यांना ही गोष्ट खटकली. यशवंतराव चव्हाण त्या वेळी मुख्यमंत्री होते. त्यांच्याशी शंकररावांचा वाद झाला. यशवंतराव म्हणाले की, हा नियोजन आयोगाचा निर्णय आहे. मग शंकरराव चव्हाण महाराष्ट्राचे एक मंत्री म्हणून नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष गुलझारीलाल नंदा यांच्यासमोर उभे राहिले. त्यांनी विषयाची बाजू मांडली. नंदा यांनी प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांचेकडे शंकररावांना जायला सांगितले. या निर्भय मंत्र्यांनी पंडित नेहरूंची भेट घेतली आणि त्यांना स्पष्ट सांगितले की, भांडवलदारी कंपन्यांना अतिरिक्त जमिनीची सूट देणे हे पंडितजींच्या जनमानसात प्रभावी ठरणाऱ्या समाजवादी व्यक्तिमत्त्वाशी विसंगत ठरेल... पंडित नेहरू अवाक होऊन बघत राहिले आणि शेवटी त्या कायद्यातून ही परवानगी नाकारण्यात आली.

जायकवाडीची उभारणी

मराठवाड्यातला 'जायकवाडी प्रकल्प' हा शंकरराव चव्हाण यांचे खऱ्या अर्थाने स्मारकच म्हटला पाहिजे. नऊ लाख जमीन ओलिताखाली आणणारा महाराष्ट्रातला हा एक मोठा पाटबंधारे प्रकल्प आहे. या संपूर्ण प्रकल्प क्षेत्रात अभ्यास, नियोजन आणि अहवाल तयार करून शंकररावांनी हा प्रकल्प मंजूर करून घेतला. कॉ. दत्ता देशमुख, कॉ. भाई साठे, कॉ. भापकर या लढाऊ नेत्यांनी या प्रकल्पाला असलेला विरोध सोडून देताना असे स्पष्ट केले की, शंकररावजींनी प्रकल्पाचा जो अभ्यास केला आहे आणि प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होईल, असा शब्द दिला आहे. (आणि पुढे तो पाळला) प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या त्या शेतकऱ्यांना लाभक्षेत्रातील जमिनी देण्याची तयारीसुद्धा शंकररावांनी दाखवली. तेव्हा या प्रकल्पाला विरोध करणारे कॉम्रेड दत्ता देशमुख यांनी संगमनेरच्या जाहीर सभेत या प्रकल्पाचे समर्थन करणारे भाषण केले. त्या वेळचे केंद्रीय पाटबंधारे मंत्री डॉ.के.एन. राव यांनी या प्रकल्पाचा अहवाल वाचून महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री शंकररावजी चव्हाण यांचे अभिनंदन केले.

गिरणी कामगारांचे पाहिले हित

महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून शंकररावांची कामगिरी गरिबांच्या बाजूचीच राहिली. आज मुंबईच्या गिरणगावात गिरणी कामगार उद्ध्वस्त झालेला दिसतो. तेथे काचेचे महाल उभे राहिले आहेत. गिरणीच्या जमिनी विकासाला विरोध करून शंकररावांनी किमान २५ वर्षे तरी मुंबईच्या कामगाराला मातीत घालण्याचे धोरण लांबवले, असाच इतिहासाला निर्वाळा द्यावा लागेल. आ. कृष्णा देसाई यांच्या प्रचाराच्या व्यासपीठावर हंगामी मुख्यमंत्री म्हणून भाषण करायला शंकरराव कचरले नाहीत.

अभ्यासू मंत्री ; अभ्यासू सचिव

कृष्णा आणि गोदावरी खोऱ्याच्या पाणी वाटपाच्या प्रश्नांवर पुण्यात जे चर्चासत्र आयोजित केले गेले होते, त्या चर्चासत्रात शंकररावांनी या खोऱ्यांवर दीड तास अभ्यासपूर्ण भाषण केले होते. त्यांना डॉ. के. एल. राव यांना सांगावे लागले की, हा संपूर्ण विषय एखाद्या निष्णात अभियंत्यापेक्षा पाटबंधारे मंत्र्यानीच स्पष्ट केलेला आहे.

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

महाराष्ट्रात नंतर ते अर्थमंत्री झाले तेव्हा स.गो. बर्वे हे शंकरराव चव्हाण यांचे पाटबंधारे सचिव होते. अभ्यासू मंत्री आणि अभ्यासू सचिव अशी जोडी पुन्हा महाराष्ट्रात दिसणे कठीण आहे. विदर्भातल्या अप्पर पैनगंगा नदीवर प्रकल्प, नांदेडचे विष्णुपुरी धरण, विसापूर धरण आणि सोलापूर जिल्ह्यातले भीमा नदीचे धरण हीसुद्धा शंकररावांची स्मारके आहेत.

कणखर गृहमंत्री

केंद्रीय गृहमंत्री म्हणून शंकरराव चव्हाण यांच्याबरोबर काश्मीर आणि पंजाबमध्ये फिरण्याची संधी मला मिळाली आहे. त्या काळात पेटलेला पंजाब, शंकरराव चव्हाण यांनी किती कणखरपणे आटोक्यात आणला हे पाहता आले, दिल्लीत असताना गृहमंत्र्यांबरोबर भारताच्या पंजाबकडील सीमारेषेचे शेवटचे गाव डेराबाबा येथे गेलो होतो. आपल्या सरहद्दीच्या खालीच पंजाब हद्दीत गुरुद्वारा आहे. तेथेच अतिरेक्यांना प्रशिक्षण दिले जाते आणि तारेच्या कुंपणातून रात्री घुसखोरी होते, असे सांगितल्यावर या तारेच्या कुंपणातून विद्युत प्रवाह सोडण्याची सूचना शंकररावांनी लगेच दिली आणि ती अमलात आणली गेली. पंजाब आणि काश्मीरमध्ये निवडणुका घेण्याचा निर्णय शंकररावांच्या कणखर निर्णयातून झाला. तेथे लोकप्रतिनिधी सरकार शंकररावांमुळे आले. शंकरराव गेल्यामुळे स्वच्छ राजकरण पोरके झाले.

(लोकराज्यच्या एप्रिल-मे २००४
या अंकातून पुनर्मुद्रित)

लेखक : ज्येष्ठ पत्रकार, मुंबई

स्मृतिस्मारके

जायकवाडी धरण, पैठण, जि. औरंगाबाद

माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी सिंचनासाठी अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प उभारून राज्यात मोठी सिंचनक्षमता निर्माण केली. राज्याच्या मंत्रिमंडळात संधी मिळाल्यानंतर त्यांनी पाटबंधारे विभागाची प्रामुख्याने निवड केली. १९७५ मध्ये मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी पाटबंधारे खाते आपल्याकडेच ठेवले. १९६० ते १९८० या कालावधीत ते सुमारे १४ वर्ष पाटबंधारे विभागाचे मंत्री होते. त्यांनी आपल्या कार्यकाळात भीमा, गोदावरी, चंद्रभागा या नद्यांवर मोठमोठ्या धरणांची निर्मिती केली. कोयना, जायकवाडी, विष्णुपुरी, कळम्मावडी, भीमा प्रकल्प, अप्पर वर्धा प्रकल्प, येलदरी धरण, अरुणावती, लेंडी धरण, बाभळी, सिद्धेश्वर आदी धरणे बांधून त्यांनी राज्यात हरितक्रांती घडवून आणली. त्याचबरोबर पारस, कोराडी, चंद्रपूर, परळी आदी ठिकाणी वीज निर्मिती केंद्रे सुरू करण्यावर त्यांचा भर राहिला. पाणी व वीज मुबलक उपलब्ध झाल्याने त्याचा लाखो शेतकऱ्यांना फायदा झाला. हे प्रकल्प म्हणजे श्री. चव्हाण यांची स्मृतिस्मारकेच. यांच्या कार्यकाळात उभे राहिलेले काही प्रातिनिधिक प्रकल्प.

अप्पर वर्धा धरण, जि. अमरावती



औष्णिक वीज केंद्र, कोराडी, जि. नागपूर

औष्णिक वीज केंद्र, पारस, जि. अकोला

डॉ शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प, जि. नांदेड

येलदरी धरण, जि. परभणी

सिद्धेश्वर धरण, जि. हिंगोली

विद्युत निर्मिती केंद्र, जि. चंद्रपूर

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर राज्याचा सकल विकास डोळ्यासमोर ठेवून पाया रचणाऱ्या द्रष्ट्या नेत्यांमध्ये शंकरराव चव्हाण यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. विशेषतः पाणीप्रश्नाच्या सोडवणुकीसाठी त्यांनी केलेले कार्य निश्चितच महत्त्वपूर्ण आणि महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारे ठरले. प्रकल्प उभारण्याचे निर्णय घेणे आणि त्याची अंमलबजावणी होईपर्यंत पाठपुरावा करणे हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य होते.



उजनी धरण

प्रकल्पांचे शिल्पकार

डॉ. सुधीर भोंगळे

देशातील वाढत्या अन्नधान्याच्या तुटवड्यामुळे जी बिकट व चिंताजनक परिस्थिती निर्माण होत होती, त्यावर मात करण्यासाठी मोठ्या पाटबंधारे योजनांशिवाय गत्यंतर नाही असे मत स्वातंत्र्यांनंतर देशातील सर्व जाणकारांचे बनल्यामुळे पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच मोठी धरणे उभारण्याकडे आपला कल राहिला. महाराष्ट्रातील शेती तर पूर्णपणे पावसावरच अवलंबून असल्यामुळे चार महिने पडणारे पाणी मोठ्या प्रकल्पांमध्ये अडवून ते पुढे वर्षभर वापरण्याशिवाय अन्य पर्याय उपलब्ध नव्हता. विशेषतः अन्नधान्याच्या बाबतीत राज्य स्वयंपूर्ण होण्याकरिता मोठ्या क्षेत्राला हमखास व विश्वासार्ह पाणीपुरवठ्याची सोय करणे अगत्याचे असल्यामुळे पाटबंधाऱ्यांच्या योजना अखंडपणे व निकडीने चालू ठेवाव्या लागल्या. मोठ्या पाटबंधारे योजनांमुळे होणारा पाणीपुरवठा अधिक व खात्रीचा असतो आणि त्यातून दूरवरच्या व मोठ्या क्षेत्रास बारमाही पाणी मिळते व स्वस्त दराने मिळते. त्यांच्या व्यवस्था ठेवणे सुलभ असून, चालू खर्चाच्या दृष्टीने काटकसरीचे असते. एवढेच नव्हे तर अशा मोठ्या योजनांमुळे पावसाळ्यात येणाऱ्या पुरांचे नियंत्रण करणे, शहरी व ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे, मुख्य बंधाऱ्याखाली व नदीस पुढे उतार असल्यास तेथे वीजनिर्मितीचे केंद्र स्थापन करणे वगैरे अप्रत्यक्ष फायदे मिळू शकतात.

दूरचा विचार

अन्नधान्याचा प्रश्न सोडवण्यासाठी मोठ्या योजना एकाच वेळी अनेक ठिकाणी सुरू कराव्या लागतात कारण त्या योजना पुऱ्या होण्यास बराच कालावधी लागतो. या सर्व प्रश्नांची जाणीव असल्यामुळेच पाटबंधारे मंत्री झाल्याबरोबर शंकरराव चव्हाण यांनी जसा जायकवाडी प्रकल्पाला हात घातला त्याचप्रमाणे पूर्णेवरच्या सिद्धेश्वर आणि येलदरी, भीमेवरच्या उजनी, कोकणातील भातसा, नागपूरमधील पेंच, जळगावजवळच्या हातनूर, लातूरजवळील मांजरा, अमरावतीजवळच्या अप्परवर्धा, वारणेवरील खुजगाव, प्रवरेवरील नळवंडे तसेच आज नगर जिल्ह्याला वरदान ठरलेल्या मुळा या मोठ्या योजनांना प्राधान्य देऊन कुणाच्याही विरोधाला न जुमानता या धरणांची कामे सुरू करण्याकडे लक्ष केंद्रित केले. त्यामुळे पुढे खूप उशिरा ही धरणे पूर्ण झाली असली तरी या धरणाचे खरे जन्मदाते आणि शिल्पकार म्हणून शंकरराव चव्हाण यांचाच उल्लेख करावा लागेल.

मोठी धरणे आवश्यक

वास्तविक शंकरराव हे कायद्याचे

पदवीधर. इंजिनिअरिंगशी तसा त्यांचा थेट काहीच संबंध नव्हता किंवा त्याबाबतचे शिक्षण किंवा पदवीही त्यांनी कधी घेतली नव्हती. परंतु कंटूरमॅप व मास्टर प्लॅन बघितला की, धरण कुठे आणि किती क्षमतेचे बांधले पाहिजे हे त्यांच्या पटकन लक्षात येत असे. लवादाने आपल्या वाट्याला दिलेले पाणी पूर्णपणे अडवले गेले पाहिजे आणि वापरलेही गेले पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. त्यामुळे जाणीवपूर्वक नदीत जेवढ्या क्षमतेचा साठा आहे तो लक्षात घेऊन जास्तीत जास्त पाणी कसे अडवता येईल, असा विचार करून त्यांनी मोठ्या क्षमतेची धरणे बांधणे अधिक पसंत केले आणि त्या धोरणाचा पाठपुरावा केला.

जितके जमेल तेवढे पाणी महाराष्ट्राने अडवून साठवले पाहिजे, अशी शंकरराव चव्हाणांची कृष्णा-गोदावरी तंट्याच्या निमित्ताने किंवा मराठवाड्यात मोठ्या साठ्याची धरणे असावीत या दृष्टीने धारणा झाली होती. उजनीच्या संदर्भातही त्यांची भूमिका याच तऱ्हेची राहिली. मला दिलेल्या एका मुलाखतीत उजनीच्या धरणात डेड वॉटरचा साठा जास्त राहील, तरीसुद्धा अन्य महत्त्वाच्या कारणांकरिता आपण खूप मोठा साठा होणाऱ्या जागेचीच निवड केली, असे त्यांनी सांगितले होते.

मुळा धरण

अहमदनगर जिल्ह्यातील मुळा धरणाच्या बाबतीत असाच मोठा वाद सुरुवातीला उभा करण्यात आला. हा वाद श्री. चव्हाण यांनी कुशलतेने सोडवला. याबाबत माहिती देताना ते म्हणाले, अहमदनगर जिल्ह्यातील मुळा धरणाबाबत सुरुवातीला वाद उभा करण्यात आला. तिथे धरणाला जागाच नाही असे काही लोक म्हणत होते. मुळा धरणाच्या भागात बारीक वाळू (क्विक सँड) असल्यामुळे तिथे धरणे कसे व कशाचे बांधावे हे निश्चित करण्यासाठी मी इजिप्तला जाऊन त्यांचा अनुभव विचारात घेण्याचे ठरवले. मुळा धरणात आम्ही नवीन तंत्र वापरले. सिमेंट आणि केमिकल यांचे मिश्रण करून डायफ्राम (थिग्झोट्रॉफिक कॉंक्रिट) केले. सुरुवातीला चार-पाच वर्षे मला सारखी धाकधूक वाटत होती. पण ड्रायफ्रामचा प्रयोग यशस्वी झाला. हे नवीन तंत्रज्ञान वापरण्याकरिता एका अभियंत्याला मी फ्रान्स आणि इजिप्तला पाठवले. इतकेच नव्हे तर फ्रान्समधून ए. मायर या फ्रेंच तज्ज्ञालाही बोलवण्यात आले. मुळा (जि. अहमदनगर) धरणाच्या मातीच्या बांधाखाली शंभर फूट वाळू व मातीचे थर आहेत. त्यामधून पाण्याचा झिरपा होणार म्हणून त्या शंभर फुटात बांधाखाली अभेद्य पडदा कसा निर्माण करायचा ही समस्या होती. फ्रेंच तज्ज्ञ मायर, त्यांच्या तंत्राचा वापर करून हे धरण उभारण्याचा दोन वर्षे प्रयत्न करीत होते. परंतु समस्या सुटत नव्हती. अखेरीस डॉ. माधवराव चितळे यांची या

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

धरणावर तंत्रज्ञ म्हणून नेमणूक झाल्यावर त्यांनी पूर्णपणे भारतीय तंत्रज्ञान वापरून बांधाखाली शंभर फूट उंचीचा पडदा यशस्वीपणे उभा केला. म्हणूनच हे धरण पूर्ण करता आले. त्यांनी बांधाखाली चर खोदून त्यात काळी चिकणमाती, सिमेंट, वाळू आणि खडी यांचे असे मिश्रण शोधून काढले की, ज्यात पुरेशी ताकद राहील आणि पाण्याच्या दबावामुळे एखादी भेग किंवा तडा गेला तरी तो माणसाच्या हाडाप्रमाणे आपोआप जुळून येईल. त्यासाठी मातीमध्ये लवचीकता आणि जुळवून घेण्याची नैसर्गिक क्षमता पाहिजे. चिकण मातीत हा गुण आहे. त्याशिवाय सौराष्ट्रातून पिवळसर रंगाची माती आणून या मिश्रणात मिसळली. प्रयोगशाळेत संशोधन करून या दोन गुणांचे मिश्रण आपण शोधून काढले. स्वतः संशोधन केल्यानंतर मिळालेल्या यशाचे आदर्श उदाहरण म्हणजे हे मुळा धरण. असे नवनवीन तंत्रज्ञान शोधून काढून धरणे पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.

म्हाळसादेवी प्रकल्पाला हिरवा कंदील

अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरेवरच्या म्हाळसादेवी प्रकल्पाला १९७० मध्ये शासकीय मान्यता मिळाल्यानंतर हा प्रकल्प केंद्र सरकारकडे त्याच वर्षी मंजुरीसाठी पाठवून देण्यात आला. या कामी गोदावरी व कृष्णा या नद्यांच्या संदर्भात जे आंतरराज्यीय वाद चालू होते त्यांचा अडथळा येण्याचा संभव होता. तेव्हा या संदर्भात मुख्यमंत्री असलेले शंकरराव चव्हाण आणि तेव्हाचे पाटबंधारे मंत्री भिकाजी जिजाबा खताळ यांना काही राजकीय पावले उचलावी लागली असे दिसते. शंकरराव चव्हाण हे महाराष्ट्रातील सर्व राजकीय नेत्यांच्या तुलनेत इंदिरा गांधींच्या अधिक विश्वासातले व जवळचे नेते म्हणून गणले जात होते. त्यामुळे म्हाळसादेवी प्रकल्पाला केंद्राची मान्यता मिळण्यास फार अडचण आलेली दिसत नाही. मला २८ मे, १९८६ रोजी दिलेल्या मुलाखतीत श्री. खताळ असे म्हणाले की, १९७६ साली मी आणि शंकरराव चव्हाण यांनी प्रधानमंत्री इंदिरा गांधी आणि पाटबंधारेमंत्री जगजीवनराम यांच्याशी चर्चा करून गोदावरीवर पाणीतंटा नाही, जो काही तंटा आहे तो कृष्णेत आहे, असे सांगून म्हाळसादेवी प्रकल्पातील आडकाठी दूर करावी, अशी भूमिका मांडली.

आंध्र प्रदेशाच्या मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा केल्यानंतर त्यांनाही हा विषय पटला. याच वेळी प्रादेशिक असमतोल निर्माण होऊ नये म्हणून विदर्भातील अप्परवर्धा, मराठवाड्यातील विष्णुपुरी, पश्चिम महाराष्ट्रातील चासकमान, वरसगाव, दूधगंगा-वेदगंगा, नांदोली-चांदोली हे प्रकल्पही केंद्र सरकारकडून आम्ही मंजूर करून घेतले. त्यानंतर म्हाळसादेवीसह या सर्व धरणांची भूमिपूजने मी व शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते ठरली आणि ८ ऑक्टोबर, १९७६ रोजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते म्हाळसादेवी धरणाचे भूमिपूजन झाले.

पुनर्वसनासाठी प्रयत्न

निळवंडे धरणाच्या पुनर्वसनाचा प्रश्न सुटावा म्हणून त्यांनी मुख्यमंत्री असताना मंत्रालयात वारंवार बैठका घेऊन हा प्रश्न धसाला लावण्याचा प्रयत्न केला. तरी देखील अद्याप निळवंडे धरणाचा प्रश्न सुटू शकला नाही, धरण मार्गी लागलेले नाही. नगर जिल्ह्यातील व विशेषत: प्रवरा खोऱ्यातील पाण्याविषयी होणारी ओढाताण नगर जिल्ह्याच्या ऐतिहासिक आर्थिक विकासानुसार आपली रूपे पालटत गेली. त्याचे प्रतिबिंब निळवंडे-म्हाळसादेवी वादात भाग घेतलेल्या सर्वच हितसंबंधी गट, जनसमूह, तालुके व गावे, विविध पातळ्यांवरील लोकप्रतिनिधी आणि मातब्बर राजकीय नेते यांच्या बदलत गेलेल्या भूमिकेतून व्यक्त होत जाते हे आपल्याला अभ्यासाने लक्षात येते. पाणी कसे, कुठे, कशाकरिता, का व केव्हा साठवायचे व वाटायचे? याबद्दल नियोजनाच्या युगाला सुरुवात केलेल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून आपण सर्वमान्य व शास्त्रशुद्ध तत्त्वे ठरवण्याच्या बाबतीत परिणामकारक पावले न टाकल्याने जिल्ह्या-जिल्ह्यांत व तालुक्या-तालुक्यांमध्ये पाणी कसे, कुठे साठवायचे व वाटायचे याबद्दल साहजिकच विकास क्रमानुसार जी ओढाताण होते तिला काही आळा म्हणा किंवा चौकट म्हणा किंवा मर्यादा म्हणा म्हणून पडत नाही. याचे एक ज्वलंत उदाहरण म्हणजे निळवंडे-म्हाळसादेवी प्रकल्पाच्या रेंगाळलेल्या वादाकडे पाहता येईल. सुदैवाने मराठवाड्यात शंकरराव चव्हाण यांच्यासारखा खंबीर जाणता नेता, भरभक्कम पायावर मजबुतीने सुरुवातीपासून उभा राहिल्याने येथला कोणताही प्रकल्प फारसा रेंगाळला नाही, हे मराठवाड्याचे भाग्यच म्हटले पाहिजे!

१४ मार्च १९८६ रोजी शंकरराव चव्हाण दुसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. विशेष म्हणजे त्यांनी पाटबंधारे खाते स्वत:कडेच ठेवले. ज्या दिवशी त्यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली त्याच दिवशी अहमदनगरच्या दैनिक सार्वमतने निळवंडे मार्गी लागेल असा अग्रलेख लिहिला. सांगली - साताऱ्याचा विकास जलद गतीने होऊ शकतो. अहमदनगर जिल्ह्याचा का होऊ नये? दक्षिण महाराष्ट्रातील धरण योजनांसाठी पैसे उपलब्ध झाले. अहमदनगर जिल्ह्याला मात्र पैसेच मिळाले नाही, असे का? सरकारवर दबाव आणण्यात जिल्ह्यातील नेतृत्व कुठेतरी कमी पडले. आता शंकररावांशी जिल्ह्याचा जवळचा संपर्क प्रस्थापित झाला आहे. शंकरराव मुख्यमंत्री झाले आहेत. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्यातील जनतेला आनंद झाला आहे, असे त्या अग्रलेखात नमूद केले होते.

कठोर कारवाई

श्री. शंकरराव चव्हाण यांचा कायमच अहमदनगर जिल्ह्यात खासदार बाळासाहेब विखे व संगमनेरचे भिकाजी जिजाबा खताळ यांना पाठिंबा राहिला. राजकारणातील मैत्री व प्रेमापोटी श्री. चव्हाण यांनी कायम श्री. विखे यांच्या प्रवरानगर येथील पद्मश्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याला ऊस आणि भंडारदऱ्याचे पाणी कसे उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न केले. ९ फेब्रुवारी १९८८ रोजी प्रवरा नदीतील अनधिकृत उपसा सिंचन योजनाची विद्युत कनेक्शन तोडण्यात आली. ही कारवाई मुख्यत्वे संगमनेर तालुक्यातील चाळीस अश्वशक्तीच्यावरील तीस योजनांच्या बाबतीत एकाच रात्रीत करण्याचे ठरले होते. पण त्या दिवशी एकूण १८ योजनांच्या बाबतीतच कारवाई झाली. संगमनेर ते ओझर या दरम्यान डाव्या तीरावर काम करणाऱ्या ३ गटांनी (ओझर, जोर्वे व रहिमतपूर येथील लोकांनी) संघटितरीत्या तीव्र विरोध केल्याने व संरक्षण देण्यात पोलीस कुमक कमी पडल्याने ८ योजनांच्या बाबतीत काहीही कारवाई होऊ शकली नाही. या कारवाईमुळे सारा अहमदनगर जिल्ह्याच नव्हे तर पश्चिम महाराष्ट्रही राजकीयदृष्ट्या हादरला. अकोले व संगमनेर तालुक्यात अनधिकृत अशा एकूण ३८७ उपसा जलसिंचन योजना झाल्या होत्या आणि ५९११ एवढी मोठी अश्वशक्ती बारमाही पद्धतीने वापरून नदीच्या वरच्या भागात बेकायदेशीर पद्धतीने पाण्याचा उपसा चालू होता. खरेतर शासनाचे धोरण ११ जुलै १९८४ च्या आदेशानुसार विनापरवाना उपसा सिंचन योजनांना फक्त खरीप व रब्बी हंगामात भुसार व भाजीपाला पिकास मंजुरी देण्याचे होते. पण प्रत्यक्षात सर्रास ऊस लावला जात होता. या सर्व विनापरवाना उपसा सिंचन योजनांच्याविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे धाडस मुख्यमंत्री या नात्याने शंकरराव चव्हाण यांनी दाखवले. त्या वेळेला श्री. चव्हाण यांच्यावर बाळासाहेब विखे यांना मदत करतात म्हणून टीका झाली, परंतु शंकरराव डगमगले नाहीत.

(शंकरराव चव्हाण यांच्या कार्यकाळात मुहूर्तमेढ रोवलेल्या प्रकल्पांचा आढावा डॉ. सुधीर भोंगळे यांनी आपल्या 'पाणीदार' पुस्तकात घेतला आहे. त्याचा हा संपादित भाग...)

मुळा धरण

स्वातंत्र्यपूर्वकाळात सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या शंकरराव चव्हाण यांचा उच्च शिक्षणापर्यंतचा प्रवास खडतर आणि परिश्रमाचा होता. अन्यायी राजवटीविरोधात आवाज उठवायचा असेल तर शिक्षणासारखे हत्यार आपल्या हातात असले पाहिजे, या ध्येयाने त्यांनी शिक्षण घेतले. पडेल ते कष्ट केले. शिकवण्या घेऊन शुल्क भरले पण हार मानली नाही. त्यांच्या पुढील प्रवासाचा पाया त्यांच्या या कष्टाने निर्माण केला. त्यामुळेच शिक्षण घेणाऱ्या गरीब मुलांप्रति ते नेहमीच कनवाळू राहिले.

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

ध्येयप्राप्तीसाठी परिश्रम

डॉ. सुरेश सावंत

शंकरराव चव्हाण यांचे वडील पैठणच्या जहागिरीत शिक्षक होते. परंतु संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी एकट्याने सांभाळत असताना होणारी आर्थिक ओढाताण सुसह्य करण्यासाठी त्यांनी शिक्षकी पेशाबरोबरच पैठणमध्ये कापडाचा व्यवसाय सुरू केला होता. भाऊराव चव्हाण आणि लक्ष्मीबाई या दाम्पत्याला एकूण सात अपत्ये झाली. गोपाळराव हे ज्येष्ठ पुत्र. त्यानंतर नारायणराव आणि हरिभाऊ, शंकरराव हे चव्हाण दाम्पत्याचे चौथ्या क्रमांकाचे अपत्य. केशवराव हे शंकररावांचे धाकटे बंधू. शंकररावांना सुंदराबाई आणि शांताबाई या दोन बहिणी होत्या.

शंकररावांच्या मातोश्री लक्ष्मीबाई या लौकिक अर्थाने अशिक्षित असल्या तरी त्यांची जीवनाविषयीची जाण अतिशय प्रगल्भ होती. प्रेमळ स्वभावाच्या, संयमीवृत्तीच्या आणि कष्टाळू लक्ष्मीबाईंनी बालपणी शंकररावांवर सुसंस्कार केले.

संतांचा सहवास

गोरठा येथील संत दासगणू महाराज यांचा सहवास भाऊराव चव्हाणांना काही काळ लाभला. दासगणू महाराजांच्या आध्यात्मिक विचारांचा खोल प्रभाव भाऊराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वावर उमटला होता. त्यामुळे ते एक सरळमार्गी, प्रयत्नांवर अढळ विश्वास ठेवणारे आणि देवावर नितांत श्रद्धा असणारे असे सत्त्वशील गृहस्थ होते. निजाम राजवटीत उर्दू भाषेचा प्रभाव असतानासुद्धा आणि घरची आर्थिक स्थिती बेताची असताना भाऊरावांनी सातवीची परीक्षा प्रथमश्रेणीत उत्तीर्ण केली.

वडिलांची शिकवण

भाऊराव चव्हाण शिक्षणाचे महत्त्व ओळखून होते. आपली मुले उच्च विद्याविभूषित झाली पाहिजेत, असा त्यांचा कटाक्ष होता. भाऊरावांनी आणि लक्ष्मीबाईंनी आपल्या मुलांवर बालपणापासून साधेपणा, सचोटी आणि शिस्तीचे संस्कार बिंबवले.

शंकरराव बालपणी खोडकरवृत्तीचे होते. सवंगड्यांना चिडवणे, मुलांसोबत मारामाऱ्या करणे यात ते आघाडीवर असायचे. अर्थात अभ्यासातसुद्धा त्यांनी आपला पहिला क्रमांक कधी सोडला नाही. एक चांगला गायक अशी बालपणी त्यांची कीर्ती होती. पैठणमध्ये गणपती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असे. गणपती उत्सवात शंकररावांचे मित्र भगवंतराव देशमुख हे व्याख्याने देत असत; तर शंकरराव राष्ट्रभक्तिपर स्फूर्तिगीते समाजात राष्ट्रीय विचारांचे वातावरण निर्माण करीत.

भीमासिंचाई प्रकल्प उजनी धरणाचे भूमिपूजन प्रसंगी यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण आणि त्यांचा हातात हात धरलेले अशोक चव्हाण.

सुखाने जाऊ स्वर्गाला
सांगतो कोण तुम्हाला
बोलणे वाटते छोटे
मग हृदय का थरथरा कापे
सुखाने जाऊ स्वर्गाला
सुखाने जाऊ स्वर्गाला

हे शंकररावांचे बालपणीचे अत्यंत आवडते गाणे. बालसुलभवृत्तीनुसार

आपल्या बालमित्रांसोबत गोट्या खेळणे, पतंग उडविणे, विटी-दांडू खेळणे तसेच संध्याकाळी गोदावरीच्या पात्रात पसरलेल्या वाळूत हुतुतू आणि सुरपाट्या असे देशी खेळ खेळण्यात त्यांचे व्यक्तिमत्त्व आकाराला येत होते.

आवडीचा विषय गणित

ग्रामीण विद्यार्थ्यांच्या मनात इंग्रजीप्रमाणेच गणित या विषयाबद्दल अनामिक भीती निर्माण झालेली असते. परंतु शंकररावांनी या दोन्ही विषयांचा कधी बाऊ केला नाही. उलट ते पाचवीपासून दहावीपर्यंत गणिताच्या पेपरमध्ये १०० पैकी ९७/९८ गुण मिळवून या विषयातील पहिला क्रमांक हमखास कायम ठेवत असत.

बालपणीचा खोडकरपणा हा त्या वयाचाच एक अविभाज्य भाग असतो. त्या वेळी केलेल्या खोड्यांचे कौतुक होत असते. इतरांच्या नकला करणे हा शंकररावांचा एक आवडता छंद होता. त्यांच्या शाळेतील एक शिक्षक सदैव तपकीर ओढत असत. त्यांच्या तपकीर ओढण्याच्या शैलीची, त्यांच्या चालण्या-बोलण्याच्या लकबींची शंकरराव अगदी हुबेहूब नक्कल करीत. शंकररावांच्या अशा नक्कलखोर स्वभावाला त्यांचे बालमित्र भगवंत देशमुख, अच्युतराव जोशी, बाजीराव दहीहंडे, कचरू गेणुजी पगारे, देवीदास गुरव, विश्वनाथ पोहेकर या समवयस्क मित्रांकडून उदंड दाद मिळत असे. परंतु शंकररावांनी अशा थट्टेखोरपणाचा कधी अतिरेक होऊ दिला नाही. एखाद्या शिक्षकाची ते नक्कल करीत, याचा अर्थ असा नव्हे की, त्यांच्या मनात शिक्षकांबद्दल आदराची भावना नव्हती. उलट शिक्षकांविषयी आदराची भावना बाळगूनच त्यांचे विद्याध्ययन निष्ठेने चालले होते.

शंकररावांची संगीताची व नाटकाची आवड सर्वश्रुत आहे. या आवडीचे बीजारोपणसुद्धा बालपणीच झाल्याचे दिसते. त्यांनी बालपणीच गायन व तबलावादनाची कला आत्मसात केली. गणपती उत्सवाच्या कार्यक्रमात गायन व तबलावादन करून जनसंघटन व राष्ट्रीय जागृती करण्याचे काम त्यांनी फारसा गाजावाजा न करता केले.

खडतर परिश्रम

शंकररावांनी १९३५ मध्ये पैठण येथून इयत्ता सातवीची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. त्याबरोबर त्यांचे गावातील शिक्षणही पूर्ण झाले. कारण पुढील शिक्षणाची सोय गावात नव्हती. त्यापुढील शिक्षण घेण्याची त्यांची उत्कट इच्छा होती. आपल्या मुलाने भरपूर शिकावे, असे भाऊराव चव्हाण यांना वाटत असे. परंतु पुढील शिक्षणासाठी आवश्यक असणारा खर्च करण्याची सोय त्यांच्याकडे नव्हती. पुढील शिक्षण घेण्यासाठी शंकररावांचे मन हैदराबादकडे धाव घेत होते, परंतु आर्थिक प्रश्न 'आ' वासून समोर उभा होता. त्याच्यावर मात करणे जितके आवश्यक होते, तितकेच ते अवघड होते. त्यातल्यात्यात जमेची बाजू अशी की, शंकररावांचे थोरले बंधू नारायणराव शिकवण्या घेऊन हैदराबाद येथे आपले वकिलीचे शिक्षण पूर्ण करत होते. शंकररावांना आणि भाऊरावांना तेवढा एक आशेचा किरण दिसत होता. त्याच आशेवर शंकररावांनी हैदराबाद गाठले. हैदराबादच्या सिटी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. सतत तीन वर्षे शिकवण्या घेऊन, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी आपले माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. या काळात त्यांची प्रचंड आबाळ झाली. १९३९ मध्ये हैदराबादच्या सिटी कॉलेजातून ते मॅट्रिकची परीक्षा प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झाले.

पदवीच्या शिक्षणासाठी हैदराबादच्या निजाम कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याची शंकररावांची उत्कट इच्छा होती. परंतु तिथे त्यांना प्रवेश मिळणे दुरपास्त होते. कारण त्या कॉलेजचे शैक्षणिक शुल्क जास्त होते. परंतु म्हणतात ना, जो धडपडतो त्याच्या मदतीला दैव धावून येते. तसाच काहीसा प्रकार शंकररावांच्या बाबतीत घडला.

त्या काळी निजाम कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते, टर्नर स्कॉटिश. ज्ञानलालसेपोटी शंकररावांनी जाऊन स्कॉटिश साहेबांची भेट घेतली. टर्नर स्कॉटिश हा मोठा उमदा माणूस! ते शंकररावांना म्हणाले, 'आमच्या कॉलेजची एक चाचणी परीक्षा असते. त्या परीक्षेत तू चांगल्या मार्कांनी पास झालास, तर तुला आमच्या कॉलेजमध्ये प्रवेश तर

बालपणीच चळवळीत

प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर कोरले गेलेले संस्कार त्याच्या व्यक्तिमत्त्वात दीर्घकाळ टिकून असतात. सुदैवाने शंकररावांना पैठणच्या शाळेत शिक्षण घेत असताना चांगले शिक्षक लाभले. श्री. तुळजापूरकर नावाचे त्यांचे एक शिक्षक होते. ते राष्ट्रीय वृत्तीचे आणि पुरोगामी विचारांचे होते. त्यांच्या राष्ट्रीय विचारांचा गडद ठसा शंकररावांच्या संस्कारक्षम बालमनावर उमटला. वास्तविक श्री. तुळजापूरकर यांना त्यांच्या राष्ट्रीय विचारांमुळे आणि विचारानुरूप चळवळीमुळे निजाम सरकारने संस्थानातून हद्दपार केले होते. पैठणपासून जवळच असलेल्या टाकळी या गावी येऊन ते निजाम संस्थानविरोधी जनजागृती करत आणि मुलामाणसांच्या मनात स्वातंत्र्याची बीजे पेरत होते. श्री. तुळजापूरकर गुरुजी टाकळी या गावी आल्याचे समजताच शंकरराव आपल्या बालमित्रांना घेऊन तेथे जात. त्यांचे विचार ऐकत. त्यांच्याशी चर्चा करत. एकदा ही बातमी निजामाच्या पोलिसांना समजली. पोलिसांनी भाऊराव चव्हाणांकडे त्याबाबत चौकशी केली. शंकररावांनी पोलिसांच्या धमकीला भीक घातली नाही. उलट श्री. तुळजापूरकर गुरुजींच्या सहवासात आपल्या राष्ट्रीय विचारांची बैठक अधिकच पक्की केली. शंकररावांचे आणखी एक आवडते शिक्षक होते. कमालुद्दीन अहमद हे त्यांचे नाव. आचाराने आणि विचाराने ते एक आदर्श शिक्षक होते. अशा ध्येयवेड्या आणि निष्णात शिक्षकांच्या सान्निध्यात शंकररावांच्या व्यक्तिमत्त्वाचे रोपटे विकसित झाले.

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

मिळेलच, शिवाय शुल्क माफीची सवलतही मिळेल. आणखी वरून आम्ही तुला शिष्यवृत्ती देऊ.'

शंकररावांनी स्कॉटिश साहेबांचे आव्हान स्वीकारले. सर्व तयारीनिशी प्रवेशासाठीची चाचणी परीक्षा दिली. परीक्षेच्या निकालात शंकररावांना 'अपवादात्मक बुद्धिमान विद्यार्थी' असा शेरा मिळाला. त्याचबरोबर शंकररावांचा निजाम कॉलेजात प्रवेश निश्चित झाला. शिवाय गुणवत्ता शिष्यवृत्तीही! पण निर्वाहाचा खरा प्रश्न पुढेच होता.

या काळात शंकररावांना त्यांचे ज्येष्ठ बंधू नारायणराव यांचा खूप आधार झाला. त्या काळी नारायणराव हैदराबाद येथे ज्या सुंदरबागेत राहत होते, तेथे नवाबांची वस्ती होती. नारायणरावांनी शंकररावांना नवाबाच्या मुलांच्या खासगी शिकवण्या घेण्याचे काम मिळवून दिले. एका शिकवणीसाठी शंकररावांना महिन्याकाठी सुमारे पंधरा रुपये मिळत असत. अशा तीन शिकवण्यांतून महिन्याकाठी ४५ रुपयांची कमाई होत असे. काटकसर करून शंकरराव आपला शिक्षणाचा खर्च भागवीत. घराकडून आर्थिक मदत न मागता किंवा गरिबीचे भांडवल करून शिक्षणाकडे पाठ न फिरवता शंकररावांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले. १९४३ मध्ये शंकररावांनी बी.ए.ची परीक्षा विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण केली.

नेतृत्वगुण

'वंदे मातरम्' चळवळीच्या माध्यमातून शंकररावांनी विद्यार्थिवर्गाचे कुशल संघटन केले. प्रत्यक्ष सक्रिय राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी शंकरराव स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र परिषदेच्या प्रत्येक अधिवेशनाला आवर्जून उपस्थित राहत आणि स्वयंसेवक म्हणून भूमिका बजावत असत. अशा प्रकारे स्वामीजींच्या तालमीत शंकररावांच्या समाजशील व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत होती. स्वामीजींनी वकिलांना न्यायालयावर बहिष्कार टाकण्याचा आदेश दिला. 'क्विट कोर्ट' या आंदोलनाचा भाग म्हणून शंकररावांनी राष्ट्रकार्यासाठी वकिलीचा व्यवसाय सोडून दिला. काही काळ अज्ञातवास पत्करला आणि अखेर स्वामीजींच्या आदेशानुसार त्यांनी हैदराबाद सोडायचे ठरवले.

१९४७ साली शंकररावजींनी आपला मुक्काम उमरखेड कॅम्पला हलवला. त्या काळी उमरखेड कॅम्प हे निजामविरोधी चळवळीचे केंद्र बनले होते. उमरखेड कॅम्पवरील शंकरराव चव्हाण यांच्या आयुष्यातील दिवस अक्षरशः मंतरलेले दिवस होते.

सर्वसामान्यांचे प्रश्न आत्मीयतेने ऐकून घेऊन त्यावर उचित कार्यवाही करणारे नेतृत्व.

उच्च शिक्षणाचा ध्यास

बी.ए.ची. पदवी हातात पडल्यावर पदवीधर झाल्याच्या आनंदात धन्यता न मानता कायद्याचे शिक्षण घेण्याचा ध्यास शंकररावांनी घेतला. हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठात एल.एल.बी.साठी प्रवेश घेतला. शंकररावांनी बी.ए.ची. परीक्षा विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण केली असल्यामुळे निजाम सरकारने त्यांना विशेष गुणवत्ता शिष्यवृत्ती जाहीर केली. त्यामुळे शंकररावांच्या शैक्षणिक शिक्षणाला हातभार लागला.

१९४३ मध्ये लग्नानंतर लगेच नवविवाहित शंकरराव आणि सौ. कुसुमताई यांनी हैदराबाद येथे राहायचे निश्चित केले. कारण शंकररावांना कायद्याचे पुढील शिक्षण चालू ठेवायचे होते. हैदराबादेत सुंदरबन जामबागेतील सुप्रसिद्ध वकील वसंतराव मुखेडकर यांच्या वाड्यातील एका खोलीमध्ये चव्हाण दाम्पत्याने आपले बिऱ्हाड थाटले. शंकररावांनी आपला दिनक्रम ठरवून घेतला. दररोज सकाळी सहा वाजता तयार होऊन ते घराबाहेर पडत असत. दोन-तीन ठिकाणच्या खासगी शिकवण्या घेत असत, कारण त्याशिवाय पर्याय नव्हता. शिकवण्या झाल्यानंतर परस्पर कॉलेजला जायचे. दिवसभर कॉलेज करायचे. मन लावून अभ्यास करायचा. कॉलेज संपल्यानंतर घरी यायचे. सायंकाळी सहा ते रात्री अकरा वाजेपर्यंत अभ्यास करायचा. अशी कठोर दिनचर्या कायद्याची पदवी पदरात पडेपर्यंत शंकररावांनी व्रतस्थपणे चालवली.

१९४३ पासून १९४७ पर्यंत चव्हाण दाम्पत्याचे वास्तव्य हैदराबाद येथे होते. या काळात शंकररावजींनी मोठ्या कष्टाने कायद्याची पदवी संपादन केली. १९३७-३८पासूनच स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली हैदराबाद संस्थानातील तरुण संघटित होत होते. सविनय कायदेभंगाची चळवळ, विद्यार्थी आंदोलन आणि 'वंदे मातरम्' चळवळीने अत्याचारी निजामाच्या अन्यायाधिष्ठित सिंहासनाला पहिला जबर धक्का दिला.

नांदेडमधून कार्याला सुरुवात करणाऱ्या शंकरराव चव्हाण यांनी राज्य आणि देशपातळीवर आपल्या कार्याचा ठसा उमटविला. विकासकामात कोणताही दुजाभाव न करणाऱ्या शंकरराव चव्हाण यांच्या मनाच्या कोपऱ्यात नांदेडविषयी नेहमीच एक हळवा कोपरा राहिला आहे. येथील सर्वसामान्य विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी त्यांनी जशी काळजी घेतली तशीच येथील शेतकरी, व्यापारी आणि मजुरांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सातत्याने प्रयत्न केले.

सर्वसामान्य हाच केंद्रबिंदू

कमलाकर जोशी

हैदराबाद मुक्तिसंग्रामातील थोर सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या सूचनेनुसार शंकरराव चव्हाण हे या चळवळीत सहभागी होण्यासाठी नांदेडला आले. हैदराबाद मुक्तिसंग्रामानंतर १९४८ मध्ये वकिली सोडून ते हैदराबादला जाण्यासाठी निघाले होते. तेव्हा ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक श्यामराव बोधनकर यांनी त्यांना थांबवून घेतले. स्वामीजींनी त्यांना 'राजकारणात जा आणि लोकसेवा करा' असा सल्ला दिला होता. याच वेळी नांदेड नगरपालिकेची पहिली निवडणूक नुकतीच घोषित झाली होती. जुन्या नांदेडमधील चौफाळा वार्डातून १९५२ मध्ये ते निवडून आले आणि नगराध्यक्ष झाले. नांदेड शहराचे नगराध्यक्ष होण्याचा मान त्यांनी मिळवला. गरीब माणूस हा केंद्रबिंदू मानून त्यांनी राजकारणाला सुरुवात केली. तेव्हापासून नांदेड ही त्यांची कर्मभूमी राहिली. नांदेडचे नगराध्यक्ष म्हणून शहरात विविध विकासकामे केली. नगरपालिकेत स्वतंत्र कर लावून गरीब मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून प्राथमिक शाळा सुरू केल्या. शहर सुसंस्कृत व्हावे म्हणून १९५३ मध्ये मराठवाड्यातील पहिले वाचनालय नांदेड येथे सुरू केले. पालिकेतर्फे तंत्रशिक्षण महाविद्यालयासाठी जमीन उपलब्ध करून दिली. त्यांना चारित्र्याचे बाळकडू आणि नीतिमत्तेचे धडे वडिलांकडून मिळाले होते. त्यामुळे त्यांना भ्रष्टाचाराची चीड होती. ते तीन वर्षे नांदेडच्या नगराध्यक्षपदी राहिले. पालिकेतील विरोधी पक्षाने त्यांच्या विरोधात अविश्वासाचा ठराव आणला, मात्र तो बारगळा. या घटनेने ते व्यथित झाले. त्यांनी स्वतःहून नगराध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप समारंभाप्रसंगी उपराष्ट्रपती डॉ. शंकरदयाल शर्मा, प्रधानमंत्री पी. व्ही. नरसिंहराव आणि गृहमंत्री शंकरराव चव्हाण.
(सौजन्य : संसदीय संग्रहालय तथा अभिलेखागार, लोकसभा सचिवालय,नवी दिल्ली)

प्रथम विधानसभेवर

१९५२ च्या पहिल्या विधानसभा निवडणुकीत हदगाव मतदारसंघातून त्यांनी निवडणूक लढवली. यात त्यांचा पराभव झाला. मात्र ते खचले नाहीत. त्यांचे मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेवर प्रभुत्व होते तसेच त्यांना उर्दू भाषाही अवगत होती. द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी शंकरराव चव्हाण यांना संधी देत महसूल विभागाचे उपमंत्री केले. त्यांनी १९५७ मध्ये विधानसभा निवडणुकीसाठी धर्माबाद मतदारसंघ निवडला. या वेळी ते विजयी होऊन प्रथमच विधानसभेवर गेले. यानंतर ते सतत निवडून येत राहिले. त्यांना पद्मश्री श्यामराव कदम, साहेबराव देशमुख बारडकर यांच्यासारखे सहकारी मित्र मिळाले.

डॉ. शंकरराव चव्हाण

जन्मशताब्दी वर्ष

मराठवाड्याकडे नेतृत्व

महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करण्याची संधी पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भाला मिळाली. तेव्हा 'मराठवाड्याची बारी' असे म्हणत विचारवंत गो. रा. म्हैसेकर यांनी मराठवाड्याला मुख्यमंत्रिपद मिळावे अशी मागणी पुढे केली. तसेच या मागणीसाठी पक्षपातळीवर त्यांनी दबावगट निर्माण केला. इतकेच नव्हे, तत्कालीन प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांना शिष्टमंडळ भेटले होते. त्या वेळी श्रीमती गांधी यांनी शिष्टमंडळाला शब्द दिला. त्यानुसार १९७५ मध्ये पक्षश्रेष्ठींनी चव्हाणांना राज्याचे नेतृत्व करण्याची संधी दिली. मराठवाड्याच्या या नेत्याला राज्याचा मुख्यमंत्री होण्याचा पहिला मान मिळाला. तेव्हा नांदेडकरांनी त्यांचे 'न भूतो न भविष्यती' असे स्वागत केले.

लोकसभेवर

लोकसभेची १९८० आणि १९८४ ची निवडणूक त्यांच्यासाठी राजकीय कसोटीची होती. यातूनच विरोधी पक्षांनी त्यांच्या विरोधात एकच उमेदवार देण्याची व्यूहरचना केली. या दोन्ही निवडणुकांत चव्हाणांच्या सहकारी मित्रांनी साथ सोडली. त्यांच्या विरोधात मोठी राजकीय फळी तयार झाली. यात चव्हाण हे पराभूत होणार असे वातावरण तयार केले गेले. चव्हाणांच्या प्रचारसभेत सामान्य गरीब माणूस पाच - सहा फुलांच्या हाराने सुद्धा त्यांचे स्वागत करताना मी पाहिले. साहेब निवडून आले पाहिजे, असे ते बोलून दाखवत असत. नेत्यांचे भल्या मोठ्या पुष्पहाराने स्वागत करणाऱ्यांचा बऱ्याचदा वैयक्तिक स्वार्थ दडलेला असतो; पण गरीब माणसाची साहेबांबद्दल आत्मीयता व सहानुभूती दिसून आली. अखेर या दोन्ही निवडणुकांत ते विजयी झाले. त्यामुळेच ते खऱ्या अर्थाने 'लोकनेते' ठरले.

नांदेड-मुंबई-दिल्ली

१९८० पासून ते केंद्रातील राजकारणात रमले. राज्याचे मंत्री, दोन वेळेस मुख्यमंत्री तर केंद्रात शिक्षण, नियोजन, अर्थ, गृह, परराष्ट्र आदी विभागांमध्ये काम करताना आपल्या कर्तृत्वाचा वेगळा ठसा त्यांनी उमटविला. नांदेड ते मुंबई आणि दिल्ली असा त्यांचा पन्नास वर्षे राजकीय प्रवास झाला. दिल्लीच्या राजकारणात 'एस. बी. चव्हाण नांदेड के' अशीच ओळख झालेली होती. नांदेड जिल्ह्याचे नेतृत्व व विकासाची जबाबदारी त्यांच्यावर आली. त्यांना 'नांदेडचे साहेब' असे म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांच्या कार्याचा सुगंध आजही नांदेडच नव्हे, तर मराठवाड्यात दरवळतोय. केवळ नांदेडचा विकास व्हावा, अशी त्यांची संकुचित वृत्ती नव्हती. तर मराठवाड्याचा, राज्याचा व देशाचा सर्वांगीण विकास हाच त्यांच्या चिंतनाचा विषय होता. त्यासाठी ते सतत कार्यशील व कृतिप्रवण राहिले. यातच मराठवाडा आणि नांदेडचे भवितव्य बांधले गेले आहे.

सिंचन हा त्यांचा आवडता विषय. मराठवाड्यात सिंचन प्रकल्प उभारून सिंचनक्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढवले. म्हणूनच त्यांना 'मराठवाड्याचे भगीरथ', 'मराठवाड्याचे शिल्पकार' असे म्हटले जाते. चव्हाणांनी सत्तेचा उपयोग समाजकारणासाठी केला, स्वत:साठी कधीच नाही. ते वैयक्तिक कामापेक्षा सामाजिक कामांना जास्त प्राधान्य देत असत. त्यामुळे त्यांच्याकडे सहसा वैयक्तिक काम घेऊन जाण्याचे कोणी धाडस करत नसत. त्यांचा एक वेगळा दरारा होता. त्यांना भेटताना, बोलताना पक्षातील नेते सावधगिरी बाळगत असत. ते वेळेचे पक्के होते. एखाद्या कार्यक्रमाला वेळेच्या आत जायचे, त्यामुळे आयोजकांची धावपळ उडायची. तसेच अनेकदा आयोजकांची फजितीही व्हायची. जनहितासाठी त्यांनी तत्त्वनिष्ठेशी कधीच तडजोड केली नाही. त्यासाठी सत्तेतील पद गेले तरी बेहत्तर, असे त्यांचे तत्त्व होते.

नांदेडची तहान मिटवली

नांदेड पाटबंधारे मंडळांतर्गत हिंगोली, परभणी, नांदेड आणि यवतमाळ हा भाग येतो. यातील आज दोन मोठे, ८ मध्यम, १०४ लघू असे एकूण ११४ प्रकल्पांची कामे कार्यान्वित आहेत. यातील ४२ प्रकल्पांचे काम प्रगतिपथावर आहे. या विभागात आता ३ लाख १० हजार ७३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. नांदेड जिल्ह्यात एकूण २ लाख १६९६ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण झाले आहे. नांदेड दौऱ्यात चव्हाण हे विष्णुपुरी प्रकल्पाची पाहणी नेहमी करीत असत. या प्रकल्पाचा निधी इतरत्र वळवला गेल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी राज्य सरकारला धारेवर धरण्यास मागेपुढे पाहिले नाही. शेवटी शासनाला या प्रकल्पासाठी निधी द्यावा लागला. आज हा प्रकल्प पूर्ण झाला; पण तो मूळ आराखड्यानुसार झालेला नाही, याची खंत आहे. आज या प्रकल्पामुळे नांदेड शहराची तहान भागवली जात आहे. देगलूर तालुक्यातील लेंडी या आंतरराज्यीय प्रकल्पाला मान्यता मिळाली. यातून आंध्र प्रदेश व महाराष्ट्र सीमेला जोडणारा येसगी नदीवर मोठा पूल उभारला गेला. या पुलाचे उद्घाटन आंध्र प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री एन.टी.रामाराव व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी संयुक्तपणे केले. तसेच विदर्भातील उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे पाणी १४० कि.मी. लांबीच्या उजव्या कालव्याद्वारे नांदेडकडे वळवले. भाटेगावजवळ (वारंगा) चार कि.मी.च्या बोगद्यातून कालवा काढण्यात आला. त्यामुळे जिल्ह्यातील अर्धापूर, मुदखेड, भोकर, उमरी, धर्माबाद या तालुक्यांतील ८९ हजार ६०५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. या प्रकल्पाच्या मुख्य कालव्याचे काम झाले असले तरीही वितरिकेचे काम अजूनही प्रगतिपथावर आहे.

शिक्षणासाठी कार्य

मराठवाड्यातील तरुणांची शिक्षणासाठी हेळसांड होऊ नये म्हणून, शंकरराव चव्हाण यांनी नांदेड, दिल्ली मराठा मित्रमंडळ तर पुणे मराठवाडा मित्रमंडळातर्फे वसतिगृह व महाविद्यालय उभारले. नांदेड येथे शारदा भवन शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या शाळा तसेच यशवंत महाविद्यालय, विधी महाविद्यालय सुरू करण्यात आले. त्याचप्रमाणे नांदेड येथील शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय, श्रीगुरुगोविंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालय, शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय यासाठी सचखंड गुरुद्वारा बोर्डाने मोठे योगदान दिले आहे. नांदेडात शिक्षणाचे मोठे जाळे झाले आहे. नांदेड येथे दक्षिण मध्य रेल्वे विभागीय कार्यालय तर मुदखेड येथे केंद्रीय राखीव दलाचे प्रशिक्षण केंद्र उभारले गेले. नांदेड जिल्ह्यात चव्हाणांनी अनेक शासकीय कार्यालये, विभागीय कार्यालये, प्रकल्पांना मान्यता दिली याची यादी फार मोठी आहे. शेतकऱ्यांना सहजरीत्या कर्ज मिळावे म्हणून त्यांच्याच सहकार्यामुळे नांदेड मराठवाडा ग्रामीण बँकेची सुरुवात झाली. आता या बँकेचे 'महाराष्ट्र बँक' असे नामकरण झाले आहे. नांदेडच्या कापडाला आंतरराष्ट्रीय बाजारात मोठी मागणी होती. त्यामुळे त्यांनी नांदेडात टेक्सकॉम, नांदेड टेक्सटाईल मिल आदी कापड उद्योगांना पाठबळ दिले. त्याचबरोबर नांदेड सूतगिरणी, दूध संस्था, हातमाग सहकारी संस्थांना प्रोत्साहन दिले. नांदेड जिल्ह्यात दोन दशके सहकार चळवळीची मोठी भरभराट झाली ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

दूरदृष्टीतून विकास

दिल्लीत १९९४ मध्ये चव्हाणांचा अमृतमहोत्सव साजरा करण्यात आला. त्या वेळी विरोधी पक्षनेते अटलबिहारी वाजपेयी म्हणाले होते की, 'नैतिकता हा मराठवाड्याचा गुण आहे. चव्हाणांसारखी स्वच्छ, चारित्र्यवान माणसे राजकारणात दुर्मीळ होत चालली आहेत.'

शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती करायची असेल तर सिंचनक्षेत्र वाढवले पाहिजे, या धोरणाला त्यांनी प्राधान्य दिले. यातून राज्यात अनेक पाटबंधारे प्रकल्प उभारले गेले. त्यांनी १९७५ मध्ये आंध्र प्रदेश व महाराष्ट्र शासनात गोदावरी पाणी वाटपाचा करार केला. त्या करारानुसार महाराष्ट्राच्या वाट्याला ६० टी.एम.सी. पाणी आले. यातून चव्हाणांच्या दूरदृष्टी, कल्पक नियोजनामुळे नांदेडचे सिंचन प्रकल्प मार्गी लागले. त्यांनी देशात प्रथमच १९६० मध्ये 'राज्य सिंचन आयोगा'ची स्थापना केली. आशिया खंडातील सर्वात मोठ्या उपसा जलसिंचन विष्णुपुरी प्रकल्पाची कल्पना त्यांचीच होती. एखाद्या निष्णात अभियंत्याला लाजवेल एवढा पाटबंधारे विषयावर त्यांचा अभ्यास होता. विष्णुपुरी प्रकल्पाची १९७८ मध्ये किंमत केवळ ३२ कोटी २४ लाख इतकी होती. मात्र या प्रकल्पाच्या उभारणीत मोठ्या आर्थिक अडचणी आल्या. या प्रकल्पावर २०१९ अखेर २५३७ कोटी ७ लाख खर्च झाला असून यातून २७ हजार ४११ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे.

कलांचा आदर

चव्हाणांच्या अंगी प्रशासकीय कार्यक्षमता, अभ्यासू वृत्ती, दूरदृष्टी आणि संकटाला सामोरे जाण्याची क्षमता, स्पष्टवक्तेपणा हे गुण होते. त्यांना प्रशासकीय निर्णयाचा, धोरणांचा दांडगा अनुभव होता. जिल्हा नियोजन विकास मंडळाच्या बैठकीत त्यांच्याशी अधिकारी दबक्या आवाजात बोलत असत, ते अधिकाऱ्यांना कधीच अपशब्द वापरत नसत; पण आपणाला नवीन निर्णय, बदल झालेला माहीत नाही का? असे प्रश्न विचारून त्यांना निरुत्तर करत असत. अधिकाऱ्याने गंभीर चूक केली असेल तर ते जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्तांना नोंद घेण्याचे सूचित करत असत. यातून अनेक अधिकाऱ्यांना चौकशीलाही सामोरे जावे लागले.

चव्हाणांना शास्त्रीय संगीत व वाचनाची आवड होती. १९६५ मध्ये त्यांच्या पुढाकाराने अखिल भारतीय नाट्यसंमेलन नांदेडमध्ये घेण्यात आले. त्या वेळी राज्याचे ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण, प्रसिद्ध साहित्यिक पु.ल. देशपांडे, आचार्य अत्रे आदी नामवंत साहित्यिक नांदेडला आले होते. संगीतमहर्षी अण्णासाहेब गुंजकर यांच्या संगीत मैफलीस, संगीत नाटकास ते आवर्जून उपस्थित राहत. आंध्र प्रदेशचे तत्कालीन मंत्री नांदेडचे शंकरराव देव, नरहर कुरुंदकर, गो. रा. म्हैसेकर, इतिहासकार तात्यासाहेब कानोले, स. रा. गाडगीळ आदी विचारवंतांसोबत ते सल्लामसलत आणि चर्चा करत असत. राजकीय क्षेत्रात त्यांचे पद्मश्री श्यामराव कदम, बाळासाहेब विखे-पाटील, रायभान जाधव, विलासराव देशमुख, मधुकरराव घाटे, गोविंदराव पाटील चिखलीकर, लक्ष्मणराव हस्सेकर, झरीकर हे विश्वासू सहकारी होते. राजकारण म्हटले की, संकटे आलीच. त्यांच्या कारकिर्दीत अनेक राजकीय वादळे आली आणि गेले मात्र ते कधीही विचलित झाले नाहीत. त्यांचे राजकीय नेत्यांसोबत वैचारिक मतभेद होते; पण त्यांना शत्रू कधीच मानले नाही. राज्यातील पत्रकारांशी नेहमी ते संवाद साधत असत. राजकीय क्षितिजावरील शंकरराव चव्हाण नावाचा चमकणारा तारा २००४ मध्ये निखळला. नांदेडकरांना चव्हाण साहेबांचे स्मरण कायम राहावे, म्हणून शंकरराव चव्हाण यांचा भव्य पुतळा व स्मृतिस्मारक उभारले आहे. नांदेड महानगरपालिकेचे प्रेक्षागृह तसेच विष्णुपुरी प्रकल्पाला त्यांचे नाव देण्यात आले आहे. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची आता नवीन भव्य वास्तू उभारली गेली आहे. महाराष्ट्रात साहित्य क्षेत्रात नरहर कुरुंदकरांनी तर राजकीय क्षेत्रात शंकरराव चव्हाण यांनी नांदेडचे वैभव वाढवले ते आजही कायम आहे.

(लेखक नांदेड येथील ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

सिंचनातून सामाजिक न्याय प्रस्थापित करू इच्छिणाऱ्या आणि त्यासाठी मुख्यमंत्रिपद पणाला लावणाऱ्या शंकरराव चव्हाण यांची पाण्याच्या वापराविषयीची धोरणे आजच्या पिढीला समजणे आवश्यक आहे. दूरदृष्टीने निर्णय घेणे आणि आपण घेतलेल्या निर्णयावर ठाम असणे ही शंकरराव चव्हाण यांची वैशिष्ट्ये आत्मसात करण्यासारखी आहेत.

नम्र आणि खंबीर व्यक्तिमत्त्व

डॉ. दि. मा. मोरे

लातूरहून फेब्रुवारी १९९१ मध्ये उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या कामासाठी नांदेडला आलो. शंकररावजींच्या रूपाने एका शांत, अभ्यासू व तत्त्वनिष्ठ व्यक्तीचा सहवास लाभण्याची ध्यानीमनी नसताना मला संधी मिळाली. शासकीय नोकरीतील बदली अनेकांना अनेकवेळा वरदान ठरते. माझ्या बाबतीत हे खरे ठरले. नांदेडला येण्याचा माझा सर्वात मोठा फायदा म्हणजे भारतासारख्या एका खंडप्राय देशाचे गृहमंत्रिपद भूषवित असलेल्या, सिंचनातून सामाजिक न्याय प्रस्थापित करू इच्छिणाऱ्या आणि त्यासाठी मुख्यमंत्रिपद पणाला लावणाऱ्या थोर विचारवंतांच्या सान्निध्यात मला मनमोकळेपणाने वावरण्याची संधी मिळाली. अभियांत्रिकी क्षेत्रातील माझा आत्मविश्वास वाढला आणि भावी जीवनात कठोर प्रसंगाच्या वेळी विचलित न होण्याचे धारिष्ट्य प्राप्त झाले.

समन्यायी पाणी वाटप

शंकररावजींनी १९६० पासून १९७२ पर्यंत महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली. पुढे महाराष्ट्राचे दोन वेळा (१९७४ ते ७७ व १९८६ ते ८८) मुख्यमंत्रिपद भूषवले. १९६० ला महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. राज्याच्या विकासाची पायाभरणी करावयाची होती. शेजारची राज्ये, विशेषत: आंध्र प्रदेश गोदावरी व कृष्णा या सामायिक नद्यातील पाणी वापरात अग्रेसर होती. महाराष्ट्राची या क्षेत्रातील पुढची विकासाची दिशा ठरवण्यासंबंधी

प्रकल्पांची पाहणी आणि अधिकारी यांच्याकडून माहिती घेताना.

विष्णुपुरीची पायाभरणी

अधिकाऱ्याचे म्हणणे शांतपणे ऐकणे, हा शंकररावजींचा फार मोठा गुण होता. सात-आठ वर्षांच्या त्यांच्या सान्निध्यात अनेक वेळा मला स्वतःला त्याचा अनुभव आला आहे. नांदेडच्या खालच्या भागातील गोदावरी नदीवरील शासनाने मंजुरी दिलेल्या तीन कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याऐवजी महाराष्ट्र व तेलंगणाच्या सरहद्दीवर बाभळी येथे विष्णुपुरीसारखा उंच पातळीचा बंधारा (बॅरेज) प्रस्तावित केलेला होता. या प्रकल्पास काही मिनिटांच्या चर्चेत शंकररावजींनी संमती दर्शवली. उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे पाणी भाटेगाव कालवा शाखेतून, पूर्णा प्रकल्पाच्या कालव्याच्या शेवटच्या मालेगाव भागातील अनधिकृत केळी पिकाला देऊन चुकीचा पायंडा पाडून भविष्यकाळासाठी प्रश्न न निर्माण करण्याच्या प्रस्तावाचे शंकररावजींनी खुल्या मनाने समर्थन केल्याचे मला आठवते. आयुष्यातील त्यांचा प्रदीर्घ काळ पाण्याच्या क्षेत्राशी निगडित राहिला. अनुभवाने आणि चिंतनातून विषय आत्मसात करण्याच्या कौशल्यामुळे ते सिंचन या विषयातील गाढे जाणकार होते. १९८६-८७ च्या दुष्काळात लातूर जिल्ह्यातील निम्नतेरणा प्रकल्पाच्या रोजगार हमी योजनेखाली हाती घेतलेल्या कामाला मुख्यमंत्री म्हणून त्यांनी दिलेली भेट माझ्या आठवणीत राहिली. नदीवर कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याची मालिका उपलब्ध असताना नदीच्या दोन्ही बाजूला सिंचनासाठी कालवे काढण्याची घाई कशासाठी, असा खडा प्रश्न त्यांनी केला होता. कालव्याला अस्तरीकरण करण्याची गरज नाही, असेही मत त्यांनी व्यक्त केले. निष्णात अभियंत्यांना विचार करण्यास लावणारे हे प्रश्न होते. राज्यामध्ये अनेक सिंचन प्रकल्पावर, कालव्यातून वाहणारे पाणी विपुल असताना मोहापोटी नदीवर बंधारे बांधून जमिनी क्षारपड केलेली उदाहरणे आहेत.

शिफारशी करण्यासाठी १९६० मध्येच स. गो. बर्वे या तत्कालीन उद्योगमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सिंचन आयोगाची स्थापना केली. १९६२ मध्ये आयोगाचा अहवाल प्राप्त करून घेऊन त्यातील शिफारशींवर अंमलबजावणी करण्यात शंकररावजींची भूमिका मोलाची ठरली.

राज्याच्या शेतीचा व उद्योगाचा विकास घडविण्यासाठी वेगवेगळ्या प्रदेशातील पेंच, वर्धा, हतनूर, मूळा, निळवंडे, गंगापूर, बिंदूसरा, तेरणा, जायकवाडी, सिद्धेश्वर-येलदरी, पैनगंगा, मनार, मांजरा, उजनी, वारणा, धोम, भातसा, कोयना लहान-मोठ्या अनेक सिंचन प्रकल्पांना त्यांनी वेग दिला. देशात स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मोठे उद्योग, संशोधन संस्था, भाक्रा-नांगल, नागार्जून सागर, हिराकुंड, उकाईसारख्या अनेक मोठ्या प्रकल्पांची कामे हाती घेऊन त्यांना पूर्णत्वाकडे नेण्याची धडाडी पं.जवाहरलाल नेहरूंनी दाखवली होती. या दोन कृतिशील व्यक्तींच्या कामातील भरारी आवर्जून आठवते.

पाटबंधारे विभागातील अभियांत्रिकी मनुष्यबळाला सशक्त बनवण्यासाठी महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), सेंट्रल डिझाईन्स ऑर्गनायझेशन (सिडिओ), स्टाफ कॉलेज इ. संस्थांना शंकररावजींच्या काळात पाठबळ मिळाले व या संस्थांना देशामध्ये प्रतिष्ठा प्राप्त झाली.

राज्यातून वाहणाऱ्या कृष्णा, गोदावरी, तापी, नर्मदा व कोकणातील उत्तर व दक्षिण टोकाकडील पश्चिमवाहिनी नद्या आंतरराज्यीय नद्या आहेत. या नद्यांमधील पाण्याचा जास्तीत जास्त फायदा करून घेण्यासाठी राज्याचा पाण्याचा हिस्सा निश्चित होणे महत्त्वाचे होते. शेजारच्या राज्यातील पाणी वापराच्या हव्यासाबद्दल शंकररावजींना कल्पना होती. यावर वेळीच लगाम घालण्यासाठी पाणी वाटपासाठी लवाद नेमून घेण्यामध्ये त्यांनी पुढाकार घेतला व पुढे चालून त्याचे निकाल हाती आले आणि राज्यातला पाणी साठा वाढविता आला. शंकररावजींची जलविकासाच्या क्षेत्रातील धडाडी महाराष्ट्र राज्याच्या विकासासाठी होती.

गाढे अभ्यासक

शंकररावांचा कृष्णा-गोदावरी पाणी तंट्याचा अभ्यास दांडगा असल्याचे त्यांच्या भाषणातून, मुलाखतीतून स्पष्ट होते. राज्या-राज्यातील या दोन नद्यांवरील पाणी वाटपाचा तंटा रीतसर लवादाकडे सोपवण्याअगोदर भारत सरकारने मे १९६१ मध्ये प्राध्यापक एन.डी.गुलाटी यांच्या अध्यक्षतेखाली एका तज्ज्ञ मंडळाची नेमणूक केली होती. या मंडळाने ऑगस्ट १९६२ मध्ये केंद्र सरकारला अहवाल सादर केला. के.जी. कमिशन म्हणून हे मंडळ ओळखले गेले.

आठमाही आवश्यकच

राज्यामध्ये अवर्षणप्रवण प्रदेशातील येऊ घातलेल्या नवीन सिंचन प्रकल्पावर आठमाही सिंचनाचे धोरण राबवण्याबद्दल शंकररावजी फार संवेदनशील व आग्रही

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

भूगोलावरही मात

शंकररावजींचे नाव जायकवाडी प्रकल्पाच्या निर्मितीशी व आठमाही सिंचन धोरणाशी जास्त जोडले जाते. गोदावरीसाठी नेमलेल्या लवादाच्या निर्णयानुसार गोदावरी खोऱ्यातील पैठणपर्यंतचे सर्व पाणी (२०० टी.एम.सी.पेक्षा जास्त) महाराष्ट्राच्या पदरात पडले होते आणि पैठण ते नांदेड पर्यंतच्या जवळपास २०० कि.मी. लांबीच्या अवर्षणप्रवण पट्ट्यात शेतीला सिंचनाचा आधार देण्यासाठी दुसरा पर्याय नव्हता. पैठणच्या आसपास गोदावरीवर जवळपास १०० टी.एम.सी.पाण्याचा वापर करणारे धरण बांधणे अपरिहार्य होते. सह्याद्री पर्वताच्या पोटात भूगोल अनुकूल असल्यामुळे भंडारदरा, पानशेत, कोयना यांसारखी धरणे बांधण्यासाठी आदर्श जागा मिळाल्या. तशा जागा पठारी, सखल भागात जायकवाडी, उजनी, मांजरा यांसारखी धरणे बांधण्यासाठी मिळण्याची शक्यता कमी असते. म्हणून धरण बांधून पाण्याचा साठा करावयाचा नाही हे त्याला उत्तर होऊ शकत नाही. निसर्गाशी तडजोड करून त्यातल्या त्यात चांगली जागा निवडून जलाशये निर्माण केली जातात. राज्यात, देशात, किंबहुना जगात सर्वत्र जवळपास असेच घडते.

या पार्श्वभूमीवर जायकवाडी धरणावर टीका करणे अनाठायी ठरते. १९६५ मध्ये या धरणाची पायाभरणी झाली आणि १९७६ च्या आसपास धरण पूर्ण झाले. शंकररावजींनी या प्रकल्पासाठी खूप श्रम घेतले, टीका सहन केल्या. केंद्र सरकारकडून मंजुऱ्या मिळवल्या. राज्यातीलच काही ज्येष्ठ अभियंत्याच्या विरोधाला त्यांना सामोरे जावे लागले. काळाच्या ओघात त्यांच्या शंकाचे निरसन झाले. पण शंकररावजींना मनस्ताप सहन करावा लागला. जायकवाडी प्रकल्पाबाबत शंकररावजी निश्चयी होते.

होते. राज्यातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना न्याय देणाऱ्या निर्णयांची बीजे त्यांच्या मनात १९७४ ते ७७ या कालावधीत पहिल्या मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीतच रुजली होती. या धोरणाची शासन आदेशाकरवी (फेब्रुवारी १९८७) अंमलबजावणी त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या दुसऱ्या (१९८६-८८) कारकिर्दीत झाली. शंकररावजींनी घेतलेला हा चाकोरी बाहेरचा क्रांतिकारी निर्णय राज्याच्या सिंचन प्रवासात मैलाचा दगड ठरला. आठमाहीचा निर्णय घेऊन राबवण्यासाठीच नियतीने त्यांना दुसऱ्या वेळेस मुख्यमंत्रिपदावर बसवले असे म्हणणे जास्त यथार्थ ठरेल.

या धोरणामुळे प्रकल्पाचे कालवे दरवर्षी आठ महिनेच (जुलै ते फेब्रुवारी) चालणार आहेत. उन्हाळ्यातील चार महिन्यात शेतकऱ्यांना फळबाग, ऊसासारखे बारमाही पीक भूजलावर विहिरीद्वारे घेण्याची मुभा आहे. हा निर्णय नवीन सिंचन प्रकल्पांनाच लागू केला आणि जुन्या प्रकल्पात काही बदल केला नाही. पाण्याची चणचण असणाऱ्या दुष्काळी प्रदेशाला हा निर्णय लागू केला

पुर्णा प्रकल्पातील कामांचा शुभारंभ.

गेला. राज्यातील ज्या भागात पुरेसा पाऊस पडतो व मुबलक पाणी आहे त्याला लागू केला नाही. पाण्यातील गरिबी सर्वांनी वाटून घेण्याचा हा निर्णय आहे. गरीब, लहान शेतकऱ्यांना न्याय देताना श्रीमंत शेतकऱ्यांवर अन्याय केला नाही.

राज्यात व देशात पण जवळपास अर्धे क्षेत्र दुष्काळप्रवण आहे. राष्ट्रीय धोरण म्हणून अशा प्रदेशात सिंचनाचे कालवे केवळ आठ महिनेच चालवावयास हवेत. यामुळे पाणी वाटपात सुसूत्रता येईल. बाष्पीभवन व पाझराचा ऱ्हास कमी होईल. कालवे व वितरण व्यवस्था सुस्थितीत ठेवता येईल. सिंचनाचे क्षेत्र वाढेल व लाभधारकांची संख्या वाढेल. समन्यायी पाणी वाटपाबरोबरच सिंचनाची कार्यक्षमता वाढेल व पाण्याच्या उत्पादकतेत वृद्धी होईल. गेल्या शंभर वर्षात सिंचन प्रकल्प निर्मितीमध्ये, पीक पद्धती ठरवण्यामध्ये, गाळपेर जमिनीचा लाभ घेण्यामध्ये काहीही बदल झाला नाही. महाराष्ट्राचा जवळपास ७५ टक्के भाग हा आठमाही सिंचनाचा आहे. उर्वरित भाग बारमाही पीक पद्धतीला अनुकूल आहे. पाणीवापर संस्थांच्या माध्यमातून दोन्ही पाणी (भूपृष्ठावरील व भूजल) हिश्श्याप्रमाणे मोजून वाटप करून आठमाही धोरणाचा अवलंब करून कृषी क्षेत्राला उर्जितावस्था आणून, दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण घटवता येते, पण त्यांचे हे धोरण शंभर टक्के अमलात आले असते तर चित्र वेगळे दिसले असते.

(लेखक जलसंपदा विभागाचे माजी महासंचालक आहेत.)

शंकरराव चव्हाणांच्या राजकीय आलेखाची कमान चढती राहिली ती त्यांच्या सडेतोडपणामुळे, स्पष्ट भूमिकेमुळे व पारदर्शी राजकारणामुळे. छक्केपंजे खेळण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता व सत्तेसाठी तडजोडी करणे त्यांना जमले नाही. कदाचित या गुणांमुळे ते दीर्घकाळ सत्तेत राहिले तरी सत्तेच्या अंतस्थ वर्तुळात ते राहिले नाहीत, 'किंग मेकर' बनले नाहीत.

१९८९-९० चा केंद्रीय अर्थसंकल्प मांडण्यास जाताना वित्तमंत्री शंकरराव चव्हाण यांच्यासोबत राज्यमंत्री ऐडुआर्डो फलेरो आणि अजित पांजा.
(सौजन्य : संसदीय संग्रहालय तथा अभिलेखागार, लोकसभा सचिवालय,नवी दिल्ली)

अस्सल आणि सडेतोड

व्यंकटेश केसरी

शंकररावांचे राष्ट्रीय राजकारणातील शक्तिस्थान कोणते? संघटन कौशल्य, नेत्यावरील निष्ठा, दरबारी राजकारणातील उपयुक्तता की प्रशासकीय कौशल्य? याची अनेक उत्तरे असली तरी यशवंतराव चव्हाण यांच्या नंतरचे ते दुसरे मराठी नेते होते ज्यांना गृह, संरक्षण, अर्थ आदी महत्त्वाची खाती सांभाळण्याची संधी केंद्रीय पातळीवर मिळाली.

इंदिरा गांधी, राजीव गांधी व पी.व्ही. नरसिंहराव यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी महत्त्वाची खाती सांभाळली, काही काळ महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपदही सांभाळले पण नेत्याच्या 'ट्रबल शूटर्स'च्या भूमिकेत त्यांनी कधी रस घेतला नाही किंबहुना त्याचे कधी आकर्षणही त्यांना वाटले नाही. त्यांची खरी नाळ जुळली ती पी.व्ही. नरसिंहराव यांच्याशी. ते दोघेही स्वामी रामानंदतीर्थ यांचे शिष्य. त्यांच्या राजकीय व सार्वजनिक कार्याची सुरुवात झाली ती हैदराबाद संस्थानात व ती फोफाळली काँग्रेसमध्ये. ते कट्टर काँग्रेसी होते पण दरबारी कधी झाले नाहीत. सत्तेसाठी गट करणे, गटबाजी करणे, सोईस्कर भूमिका घेणे त्यांना कधी जमले नाही व त्यांचा तो पिंडही नव्हता. त्यांची ही प्रकृती पाहून काँग्रेसश्रेष्ठींनी त्यांना संघटनेत भले मोठी जबाबदारी दिली नसेल पण सरकारमध्ये मात्र भरपूर वाव दिला.

१९८० ते २००० या काळात त्यांना राष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी मिळाली. परंतु त्याला खरा, बहर आला तो १९८१ ते १९९६ या काळात. सलग पाच वर्षे त्यांनी देशाचे गृहमंत्री म्हणून काम केले व पंजाब, आसाम, जम्मू आणि काश्मीरमध्ये परिस्थिती नियंत्रणाखाली आणली. अयोध्येतील बाबरी मशिदीचा पाडाव ते रोखू शकले नाहीत याचे कारण या साऱ्या प्रकरणाची सूत्रे तेव्हा नरसिंहराव यांच्या हाती होती.

गृहमंत्रिपद हे एक प्रकारे 'थँकलेस' खाते असते. त्यांच्याकडून कामे करवून घेतली जातात पण चांगल्या कामाचे श्रेय नेहमी मिळतेच असे नाही, पण स्वातंत्र्योत्तर काळात नरसिंहराव हे पहिले प्रधानमंत्री होते ज्यांनी त्यांच्या कार्यकाळात गृहमंत्री व अर्थमंत्री बदलला नाही. शंकरराव चव्हाण व डॉ. मनमोहन सिंग यांना त्यांनी स्वातंत्र्य दिले, विश्वास टाकला ही बाब साधीसुधी नाही.

याच काळात दिल्लीतील विज्ञान भवनात शंकरराव चव्हाणांचा जाहीर सत्कार झाला होता. त्या वेळी बोलताना नरसिंहरावांनी आपण शंकररावांना कुसुमताईंपेक्षा जास्त ओळखतो असे सांगून त्यांच्या व शंकररावांच्या प्रदीर्घ मैत्रीचे, त्यातील धाग्याचे वीण उलगडून

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

दाखवले. समाजवादी नेते शरद यादव यांनी या वेळी बोलताना आणीबाणीच्या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शंकरराव किती उदार होते. याचा विशेष उल्लेख केला. आणीबाणीत इतर राज्यात राजकीय कार्यकर्त्यांवर जुलूम-जबरदस्ती झाली. पण महाराष्ट्र त्याला अपवाद होता. हे एकमेव कारण म्हणजे शंकरराव चव्हाण, त्यांची संवेदनशीलता.

शंकरराव चव्हाणांच्या नवी दिल्लीतील कृष्ण मेनन मार्गावरील त्यांच्या राहत्या घरी जुन्या गोष्टी निघाल्या, संदर्भ बाहेर आले. तेव्हा शंकरराव म्हणाले, मी इंदिराजींना म्हणालो एस.एम.जोशी व नानासाहेब गोरे यांना आणीबाणीत कसे हाताळायचे ते माझ्यावर सोडा. त्यांना बोलू द्या, टीका करू द्या पण आपण त्यांना अटक करायची नाही. माझ्यावर दिल्लीतून दडपण येत होते, पण मी त्यामुळे दबलो नाही. एसेम, नानासाहेब हे बाहेरच राहिले.

राजीव गांधींच्या हत्येनंतर म्हणजे १९९१ साली काँग्रेसचे अध्यक्षपद नरसिंहराव यांच्याकडे आले. पुढे ते प्रधानमंत्री झाले व दोन्ही पदे त्यांच्याकडे राहिली. त्यातील एका पदाचा नरसिंहराव यांनी त्याग करावा असे पक्षांतर्गत दडपण त्यांच्यावर १९९४-९५ च्या सुमारास आणण्यात येत होते. तेव्हा प्रधानमंत्रिपद सोडण्याचा प्रश्नच नव्हता. पण पक्षाचे अध्यक्षपद सोडले तर त्यावर शंकररावांची नियुक्ती करावी, ते पक्षाला न्याय देऊ शकतील. पक्ष वाढेल अशा चर्चा काँग्रेसच्या वर्तुळात सुरूही झाल्या होत्या. १९९६ च्या लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर नरसिंहराव यांच्यावर ज्या वेळी पक्षाध्यक्षपद सोडण्याचे दडपण वाढले तेव्हा सीताराम केसरी यांच्यासारख्या 'लाईट वेट' नेत्याच्या गळ्यात ही माळ घालण्यात आली. त्या वेळी शंकरराव चव्हाण अध्यक्ष झाले असते तर इतिहासाचा घटनाक्रम बदलला असता.

शंकररावांनी 'बेरजेचे राजकारण' करावे असा सल्ला देण्यात यायचा. पण बेरजेचे राजकारण की विकासाचे राजकारण करायचे? हा प्रश्न राहतोच. यशवंतराव चव्हाणांपासून ते शरद पवारांपर्यंत महाराष्ट्राचे जे मुख्यमंत्री झाले त्यांच्या कामाचा ठसा महाराष्ट्रावर उठला. प्रत्येकाचे वैशिष्ट्य होते, अग्रक्रम होता त्याचा लाभ महाराष्ट्राला मिळाला. शंकररावांचे नेतृत्व मराठवाड्यासारख्या अविकसित भागातून आले असले तरी त्याची जडणघडण हैदराबादेत झाली होती.

राजकारण कशासाठी करायचे? सत्तेसाठी, वैयक्तिक उत्कर्षासाठी, पाहुण्यांसाठी की विकासासाठी? याबाबत त्यांच्या मनात गोंधळ नव्हता. त्यामुळे त्यांच्याबाबत ज्यांच्या मनात गैरसमज होते ते जास्त काळ टिकले नाहीत. काँग्रेस अंतर्गत त्यांना त्यांच्या मनासारखी 'टीम' मिळाली नाही, बांधता आली नाही पण विरोधी पक्षात त्यांच्याविषयी आदराची भावना होती. राष्ट्रीय पातळीवर अटल बिहारी वाजपेयी असोत व इतर विरोधी पक्ष नेते त्यांनी शंकररावांना गांभीर्यानेच घेतले.

महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास वैधानिक विकास मंडळाबाबत त्यांनी घेतलेली भूमिका अनेकांना पटली होती पण यात राजकारण आणून त्याचे जे काही करायचे होते ते झाले. महाराष्ट्रातील मागास भागाच्या विकासाचे प्रश्न सोडवायचे असतील, विकासाचा अनुशेष दूर करायचा असेल तर वैधानिक मंडळ हे त्याचे उत्तर नाही, उपाय नाही व राज्यपालांना अधिकार देऊन ते साध्यही होणार नाही हे त्यांनी महाराष्ट्रातील राजकीय पक्ष, नेते, बुद्धिवंत यांना ठणकावून सांगितले. ज्या बड्या संपादकांनी विकास मंडळाच्या बाजूंनी लिहिले होते त्यांना घरी बोलावून अपुऱ्या माहितीवर तुम्ही भूमिका घेतल्याचे त्यांच्या लक्षात आणून दिले.

दिल्लीत राहून 'पॅलेस पॉलिटिक्स' करणारे, नेत्याच्या मागे-पुढे फिरणारे, सत्तेचा सौदा करणारे व त्यातून 'नेते' होणारे कमी नाहीत. त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अशा काळात आपले वेगळेपण जपणारे शंकरराव चव्हाण यांचे नाणे मात्र अस्सल राहिले.

ऑस्ट्रेलियाच्या संसदीय सदस्यांच्या शिष्टमंडळासोबत चर्चा करताना शिक्षणमंत्री शंकरराव चव्हाण.
(सौजन्य : संसदीय संग्रहालय तथा अभिलेखागार, लोकसभा सचिवालय, नवी दिल्ली)

(लेखक नवी दिल्ली येथे ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

चौफेर कर्तृत्व

शंकरराव भाऊराव चव्हाण
(१४ जुलै १९२० ते २६ फेब्रुवारी २००४)

जन्म - १४ जुलै १९२०, **जन्म स्थळ -** पैठण, वडिल भाऊराव चव्हाण, आई लक्ष्मीबाई, या दांपत्यांना पाच मुले आणि दोन मुली. शंकरराव हे चौथ्या क्रमांकाचे. चव्हाण कुटुंब हे मुळचे अहमदनगर जिल्ह्यातील मशिद रांजणगाव या गावचे. या गावी त्यांची शेती होती. पण ती खूप तुटपुंजी होती. त्यामुळे त्यांची आर्थिक कुचंबणा होऊ लागली. चव्हाण कुटुंबाने हे गाव सोडले आणि मराठवाड्यातील पैठण या गावी स्थलांतरित झाले.

शिक्षण - १९३९ मध्ये ते मॅट्रिक झाले. पुढील शिक्षण हैदराबाद येथे झाले. १९४३ साली ते बी.ए. झाले. १९४५ साली त्यांनी उस्मानिया विद्यापीठातून एल.एल.बी. पूर्ण केले. शिक्षण घेत असतानाच त्यांचा विवाह परभणी जिल्ह्यातील आखाडा बाळापूर येथील माधवराव पाटील यांची ज्येष्ठ कन्या कुसुमताई यांच्याशी झाला. लग्नानंतर काही काळ ते हैदराबादमध्येच सपत्नीक राहत होते. शंकरराव चव्हाण यांनी हैदराबादच्या स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली, स्वामी रामानंदतीर्थ यांच्याबरोबर ते काम करत. स्वामींनी त्यांना हैदराबाद स्टेटच्या काँग्रेसमध्ये सचिवपदी नेमले. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद मुक्तीचा लढा यशस्वी झाला. यानंतर ते नांदेड येथे स्थायिक होऊन वकिली करू लागले.

शंकरराव व कुसुमताई यांचे चिरंजीव अशोकराव हे शंकरराव चव्हाण यांच्याप्रमाणे राजकारणात आले. त्यांनीही राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची (८ डिसेंबर २००८ ते ८ नोव्हेंबर २००९ आणि ९ नोव्हेंबर २००९ ते १० नोव्हेंबर २०१० या कालावधीत) जबाबदारी सांभाळली. सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री म्हणून काम पाहत आहेत.

मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाल - शंकरराव चव्हाण हे २१ फेब्रुवारी १९७५ ते १७ मे १९७७ आणि १४ मार्च १९८६ ते २४ जून १९८८ असे दोन वेळा मुख्यमंत्रिपदावर विराजमान झाले होते.

भूषवलेली पदे

- **१९४९** नांदेड काँग्रेस चे सरचिटणीस.
- **१९५२** च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत हदगाव या विधानसभा मतदार संघातून त्यांनी निवडणूक लढवली पण ते पराभूत झाले.
- **१९५३** मध्ये नांदेड नगरपालिकेच्या निवडणुकीत विजयी होऊन नगराध्यक्ष झाले.
- **१९५६** मध्ये कोणत्याही विधिमंडळाचे सदस्य नसताना तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी द्विभाषिक मुंबई राज्याच्या मंत्रिमंडळात त्यांना महसूल खात्याचे उपमंत्री नेमले.
- **१९५६** ला विधान परिषदेवर सदस्य म्हणून निवड.
- **१९५७** च्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत धर्माबाद विधानसभा मतदारसंघातून विजयी.
- **१ मे १९६०** महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी शंकरराव चव्हाण यांच्याकडे पाटबंधारे आणि वीज खात्याचा कारभार दिला.
- **१९६२** मध्ये धर्माबाद विधानसभा मतदारसंघातून निवडून आले, ते पाटबंधारे, ऊर्जा व विद्युतनिर्मिती खात्याचे मंत्री झाले.
- **१९६७** मध्ये भोकर विधानसभा मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले, ते पाटबंधारे, ऊर्जा व विद्युतनिर्मिती खात्याचे मंत्री झाले.
- **१९६७** साली ते काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे उपनेते झाले.
- **१९७२** मधील विधानसभेच्या निवडणुकीत भोकर मतदारसंघातून त्यांची फेरनिवड झाली. मंत्रिमंडळातील कृषी, परिवहन व दुग्धविकास खात्यांचा कारभार त्यांना देण्यात आला.
- **२० फेब्रुवारी १९७५** रोजी वसंतराव नाईक यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देताच शंकरराव चव्हाण यांचे नाव मुख्यमंत्रिपदासाठी सुचवले गेले.
- **२१ फेब्रुवारी १९७५ ते १७ एप्रिल १९९७** रोजी ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री.

- **१९८०** मध्ये ते नांदेड लोकसभा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आले आणि तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात शिक्षणमंत्री झाले. शिक्षण, संरक्षण, नियोजन, अर्थ, गृह अशी खाती त्यांनी हाताळली.
- **१४ मार्च १९८६** ते **२४ जून १९८८** या काळात ते पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.
- **१९८६** साली विधान परिषदेवर सदस्य म्हणून निवड.
- **१९८९** मध्ये केंद्रीय गृहमंत्री झाले.
- **१९९७** पर्यंत ते राजसभेवर सदस्य होते.

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

कार्य – (मंत्री, मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्रिपदाच्या कालावधीतील विशेष कार्य)

- ६ मार्च १९६४ रोजी त्यांनी महाराष्ट्र व मध्यप्रदेश या दोन प्रांतात जलसिंचन व विद्युतनिर्मितीबाबत वाज पेंचकर बदा तापी प्रकल्प करार केला. या करारामुळे दोन्ही राज्यातील शेती विकासाला गती मिळाली.
- कृषी विद्यापीठ स्थापनेला चालना दिली. १९६८ साली दापोली येथे कृषी विद्यापीठ तर अकोला येथे १९६९ साली कृषी विद्यापीठ स्थापन झाले. सावदा येथे केळी संशोधन केंद्र स्थापन केले. पाटबंधारे खात्याचे मंत्री असताना अनेक पाटबंधारे योजनांना गती दिली. अप्पर वर्धा धरणाचे काम पूर्ण केले. पैठणला बहुउद्देशीय असा महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या जायकवाडी प्रकल्पाचे काम आणि विष्णुपुरी प्रकल्पाचे काम पूर्ण केले. येलदरी धरण आणि सिद्धेश्वर धरणाचे कामही त्यांच्याच कारकिर्दीत पूर्ण झाले.
- मुख्यमंत्री असताना पाटबंधारे खाते त्यांनी स्वत:कडे ठेवले. या काळात त्यांनी पूर्णा, पैनगंगा, अप्पर मांजरा या कालव्यांच्या कामांना गती दिली. त्यांच्या काळात महाराष्ट्रातील ओलिताखालील जमीन १३.४ टक्क्यांवर नेण्यात त्यांना यश आले.
- गोदावरी नदीच्या पाणी वाटपाविषयी महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि मध्य प्रदेश यांच्यामधील वाद ते मुख्यमंत्री असतानाच मिटला.
- सुकथनकर समितीने राज्यात पाण्याचा गैरवापर होतो हे दाखवून दिल्यानंतर त्यांनी पाणी वाटपाबाबत शास्त्रशुद्ध धोरण अवलंबले व बागायत पिकांना बारामाही पाणी योजनेऐवजी आठ महिने पाणी वाटपाचे धोरण स्वीकारले.
- एस.टी.कर्मचाऱ्यांकरिता गृहनिर्माण वसाहती, वैद्यकीय सुविधा, भविष्यनिर्वाह निधी आदी योजना लागू केल्या.
- मुख्यमंत्री कारकिर्दीत शून्याधारित अर्थसंकल्प सादर करण्यात आला. मानखुर्द-बेलापूर रेल्वे मार्गाला गती दिली. राज्यात उर्दू शाळा स्थापन करण्यास प्राधान्य दिले, उर्दू अकादमीची स्थापना केली.
- राज्यातील बहुसंख्य आदिवासी लोकांच्या जमिनी वेगवेगळ्या कारणांनी सावकारांनी ताब्यात घेतल्या होत्या; त्यांच्या जमिनी परत मिळाव्यात यासाठी त्यांनी कडक कायदा केला. या निर्णयामुळे आदिवासी लोकांना जमिनी परत मिळाल्या.

- २६ ऑगस्ट १९७६ रोजी त्यांच्या पुढाकाराने मराठवाडा ग्रामीण बँकेची स्थापना करण्यात आली.
- कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाची कडक अंमलबजावणी, कापूस एकाधिकार योजना, झोपडपट्टी निर्मूलन कार्यक्रम, भिकारी हटाव मोहीम म्हणजे भीक मागण्याची प्रथा बंद करण्यासाठी योजना, आदिवासी भागात आश्रमशाळा सुरू करणे, प्रशासनिक सुधारणा, महामंडळांची संख्या कमी करणे, केंद्र सरकारच्या तत्कालीन वीस कलमी कार्यक्रमांची अंमलबजावणी.
- केंद्र सरकारमध्ये मंत्री असताना १ एप्रिल १९८९ पासून देशपातळीवर जवाहर रोजगार योजना राबवली. ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार यांचा जवाहर रोजगार योजनेत समावेश केला.
- केंद्रीय गृहमंत्री असताना अतिरेकी आणि दहशतवादी कारवायांना ऊत आला होता. त्यांनी या कारवायांवर नियंत्रण मिळवण्यासाठी कठोर उपाययोजना केली, दहशतवाद नष्ट व्हावा याकरिता त्यांनी इंग्लंड, रशिया, फ्रान्स, बल्गेरिया, रुमानिया, जर्मनी आदी देशांबरोबर सहकार्य करार केले. मिझोरम, काश्मिर, पंजाब आणि बाबरी मशीद हे राष्ट्रीयस्तरावरील प्रश्न कुशलतेने हाताळले. त्यांच्या कारकिर्दीतील ऑपरेशन ब्ल्यूस्टार तसेच पंजाब व आसाम करार हे देशात शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले.
- तत्कालीन प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या नव्या शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करून नवोदय विद्यालयांची स्थापना केली.
- प्रधानमंत्री इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि पी.व्ही.नरसिंहराव यांच्या मंत्रिमंडळात काम केले.
- केंद्रीय नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष, तसेच संसदेच्या विविध समित्यांचे प्रमुख म्हणून मोलाचे योगदान दिले. त्यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय व सार्वजनिक जीवनामध्ये कणखर प्रशासक, अभ्यासू संसदपटू आणि स्वच्छ कारभार याद्वारे आपल्या कार्याचा ठसा देशपातळीवर उमटविला.
- २६ फेब्रुवारी २००४ रोजी निधन.

(संदर्भ ग्रंथ : १) यशवंतराव ते अशोकराव - डॉ. विश्वास मेहेंदळे
२) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री - सोपान गाडे ३) आमचे मुख्यमंत्री - डॉ.बाळकृष्ण रायरीकर आणि डॉ.श्रीनिवास वसंतराव सुरनीस
४) नेकदार मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण - चंद्रशेखर वाघ,
५) महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव चव्हाण - डॉ. सुरेश सावंत)

टीम लोकराज्य

शंकरराव चव्हाण हे उत्कृष्ट प्रशासक होते. जलतज्ज्ञ होते. अनेक भाषांवर त्यांचे प्रभूत्व होते. त्याचबरोबर कला, साहित्य, संस्कृती या क्षेत्रातही त्यांचा चौफेर वावर होता. मराठी कलावंत, साहित्यिकांना त्यांनी मोठे प्रोत्साहन दिले.

दिल्ली येथे 'महाराष्ट्र लोकरंग' कार्यक्रमातील कलावंतांसोबत शंकरराव चव्हाण, कुसुमताई आणि मान्यवर.

साहित्यप्रेमी

प्रा.जगदीश कदम

राजकारणात राहूनही साहित्य, संगीत, कला, संस्कृती अशा क्षेत्रांमध्ये स्वारस्य दाखवणे आणि आपला काही वेळ त्यासाठी राखून ठेवणे खूप कमी लोकांना जमले आहे. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे या संदर्भातील अग्रेसर नाव. त्यांच्याप्रमाणे शंकरराव चव्हाण यांनीसुद्धा रसिक, कलाप्रेमी म्हणून आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीत साहित्य आणि इतर कलांविषयींची अभिरुची टवटवीत ठेवलेली दिसते.

भाषा सजगता

मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी या भाषांवर सारखेच प्रभूत्व असल्यामुळे शंकररावजींचे वाचन चौफेर होते. राज्यात आणि केंद्रात मंत्री असताना खूप जबाबदारीची खाती त्यांच्याकडे होती. आपले म्हणणे जोरकसपणे व्यक्त करण्यासाठी भाषा हे अत्यंत प्रभावी साधन आहे. या साधनाचा नीटपणे वापर व्हायला हवा. भाषेचे सामर्थ्य आणि उपयोजन या बाबी आपण नीटपणे समजून घेतल्या पाहिजेत. मुलांवर बालवयात नीट भाषिक संस्कार झाले तर भाषेचा जपून आणि काळजीपूर्वक वापर करायला ते शिकतील, असे ते म्हणत असत. याच धारणेतून शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषेच्या संदर्भातील नियमावलीची पुस्तिका प्रत्येक शाळेपर्यंत पोहोचवण्याचा आदेश मुख्यमंत्री असताना शंकररावजींनी दिला होता. या पुस्तिकेला असलेली त्यांची प्रस्तावना

भाषेच्या संदर्भातील सजगता अधोरेखित करते.

अभ्यासोनी प्रकटावे

शंकरराव चव्हाण यांचे वाचन उत्तम होते. आपल्या व्यस्त दिनचर्येतून वेळ मिळाला म्हणजे ते मराठी तसेच इंग्रजीतील ग्रंथांचे वाचन करीत असत. त्यांचे वाचन खूप मन:पूर्वक असे. त्यामुळे संभाषण, चर्चेतून बारीकसारिक तपशील ते सहजपणे देत असत. साहित्य हे माणसाला जोडण्याचे काम करीत असते, किंबहुना साहित्याचे हेच काम असते अशी त्यांची साहित्यासंबंधीची धारणा होती. ते जेव्हा एखाद्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाला जात असत तेव्हा संपूर्ण पुस्तक चाळल्याशिवाय बोलत नसत. नांदेड ही त्यांची कर्मभूमी असल्यामुळे अशा प्रकारचे कार्यक्रम टाळणे त्यांना शक्य नसे.

'मराठी स्वराज्य'सारख्या एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याने सुरू केलेल्या साप्ताहिकाचे प्रकाशन असो, तरोड्यासारख्या छोट्याशा गावी आयोजित केलेले साहित्य संमेलन असो, पत्रकारांचे संमेलन असो अथवा गुणी छायाचित्रकारांच्या फोटो संग्रहाचा अल्बम असो, त्यासाठी आपला महत्त्वाचा वेळ खर्ची घालण्यात त्यांना कधीच गैर वाटत नसे.

१९६५ मध्ये नांदेडला अखिल भारतीय नाट्यसंमेलन झाले. तेव्हा ते राज्याच्या वीज व पाटबंधारे खात्याचे मंत्री होते. या संमेलनाला यशवंतराव चव्हाण, पु.ल.देशपांडे, प्र.के.अत्रे, पु.भा.भावे असे दिग्गज उपस्थित होते. या संमेलनातील धुळीच्या रस्त्यावरून केलेल्या प्रवासावरची अत्र्यांची कोपरखळी आणि त्यावर पुलंची'ज्यांनी आयुष्यभर लोकांना धूळ चारली, त्यांना धुळीची इतकी भीती का वाटावी? मराठवाडा ही संतांची भूमी आहे. इथल्या धुळीतून संतांचे दर्शन घडते.' अशी केलेली मार्मिक टिप्पणी सर्वश्रुत आहे. या नाट्यसंमेलनाच्या आयोजनाची धुरा शंकररावजींनी यशस्वीपणे सांभाळली.

कलारसिक

नांदेड येथील अण्णासाहेब गुंजकर यांच्या गायन वादन विद्यालयाच्या उभारणीत त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. या विद्यालयाच्या आर्थिक मदतीसाठी मुंबईच्या षण्मुखानंद हॉलमध्ये सुप्रसिद्ध अभिनेत्री श्रीमती हेमामालिनी यांच्या शास्त्रीय नृत्यगायनाचा कार्यक्रम त्यांच्या पुढाकारातून झाला.

संगीत, साहित्य, नाट्य अशा विविध कलांसाठी काम करणाऱ्या संस्था उत्तम रीतीने चालल्या पाहिजेत अशी तळमळ त्यांच्या वागण्या-बोलण्यातून जाणवत असे.

शंकरराव चव्हाण दिल्लीत असताना महाराष्ट्रातील कलावंतांच्या कार्यक्रमांना वेळ काढून जात. मराठीतील ज्येष्ठ समीक्षक डॉ.स.रा.गाडगीळ यांनी दिग्दर्शित केलेले 'संगीत मानापमान' हे नाटक पाहण्यासाठी दिल्लीतील साठे,गाडगीळ या मराठी भाषिक मंत्र्यांना सहकुटुंब घेऊन जातात आणि तीन-चार तास वेळ देतात यातून त्यांची नाट्य-संगीत कलेविषयीची रसिकवृत्ती दिसून येते.

महाराष्ट्रातून वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यासाठी दिल्लीत आलेल्या कलावंतांना यशवंतराव आणि शंकरराव चव्हाण ही हक्काची जागा वाटत असे. विशेषत: युवा कलावंतांना प्रोत्साहन देताना या दोघांनी कधीच हात आखडता घेतलेला नाही. सूरमणी श्याम गुंजकर यांनी बसवलेल्या 'महाराष्ट्र दर्शन लोकरंग'चे प्रयोग दिल्लीतील महाराष्ट्र रंगायन आणि लाल किल्ल्यावर सादर करण्याची संधी शंकरराव चव्हाण यांच्यामुळेच युवा कलावंतांना मिळाली. प्रदीप घोनशीकर यांनी या कार्यक्रमाचे निवेदन केले होते. त्यांनी सादर केलेला पोतराज आणि भुत्या पाहून 'महाराष्ट्रात खूप गुणी कलावंत असून लोककलांचा आविष्कार ते उत्तम रीतीने सादर करू शकतात' असे जाहीर कौतुक त्यांनी केले होते. याच कार्यक्रमात पुण्यातील आसावरी एकताटे-ठोंबरे यांच्या गायनाला रसिक-श्रोत्यांकडून उत्तम दाद मिळाली होती. दुसऱ्या दिवशी या युवा कलावंतांना संरक्षणमंत्री असलेल्या चव्हाणांनी आपल्या बंगल्यावर चहापानासाठी निमंत्रित केले. कलावंतांची गुणवत्ता हेरून त्याला प्रोत्साहन देण्याचे काम त्यांनी नेहमीच केले. संजय जोशींसारख्या गायकाची 'मानापमान' नाटकातील नांदी

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

भाषा विकासाचा ध्यास

मराठवाड्यासारख्या निजामी वर्चस्वाखाली राहिलेल्या प्रदेशाची सांस्कृतिक भूक खूप मोठी आहे. दडपल्या गेलेल्या मराठी भाषेला मोकळा श्वास घेता येऊ लागलेला आहे. त्यामुळे तिचे संगोपन आणि संवर्धन नीटपणे झाले पाहिजे, याकडे त्यांचा विशेष कटाक्ष असे. असे असले तरी इतर भाषांचा दुस्वास त्यांनी कधी केला नाही. उर्दू साहित्य अकादमीची स्थापना त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात झाली.

शंकरराव चव्हाण हे कलासक्त व्यक्तिमत्त्व होते. संगीताचे ते विशेष चाहते होते. अण्णासाहेब गुंजकर यांच्याकडे संगीत वर्गाचे धडे गिरवण्याचा प्रयत्न त्यांनी केला; परंतु राजकारणातील वेळेच्या गणितामुळे ते शक्य झाले नाही. विशेष म्हणजे त्यांच्यासोबत स्वामी रामानंद तीर्थ यांनीसुद्धा गुंजकरांकडे हजेरी लावली होती. आपल्या कार्यबाहुल्यातून वेळ काढून ते शास्त्रीय संगीत मैफिलीस हजेरी लावत.प्रभा अत्रे, परवीन सुलताना, नाथ नेरलकर यांच्या शास्त्रीय गायनाला त्यांनी भरभरून दाद दिली.

ऐकून ते विलक्षण प्रभावित झाले. स्वर आत्म्यातून आला म्हणजे संगीताचा अलंकार होतो असे त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे.

संमेलनाचे आश्रयदाते

नांदेड येथे १९८५ मध्ये संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आश्रयदाते म्हणून शंकरराव चव्हाण यांची भूमिका महत्त्वाची राहिली. त्यांच्या प्रोत्साहन आणि मार्गदर्शनामुळे ज्येष्ठ कथालेखक शंकर पाटील यांच्या अध्यक्षतेखालील हे संमेलन अविस्मरणीय ठरले.

नव्वदच्या दशकात नांदेडच्या यशवंत महाविद्यालयाच्यावतीने दहा दिवसीय महिला प्रबोधन शिबिर घेण्यात आले. या शिबिराचे उद्‌घाटन ज्येष्ठ विदुषी दुर्गा भागवत यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी शंकरराव चव्हाण होते.' राजकारणात सगळेच वाईट नसते. विचारवंतांनी राजकारणातील अपप्रवृतींवर जरूर बोट ठेवावे; परंतु चांगल्या बाबींचे मोकळ्या मनाने स्वागत करावे.' असे स्पष्टपणे सांगणाऱ्या शंकरराव चव्हाणांनी आपल्या वैयक्तिक जीवनात नैतिकतेला नेहमीच अग्रक्रम दिला. लिहिणाऱ्या, बोलणाऱ्या व्यक्तींनी आपल्या चारित्र्याकडे विशेष लक्ष द्यायला हवे, असे ते म्हणत असत.

साहित्य आणि कला या मानवी जीवनाला उन्नत करणाऱ्या गोष्टी आहेत. पोटाइतकीच मेंदुची भूकही महत्त्वाची असते. त्यासाठी आपण काही वेळ राखून ठेवला पाहिजे. या धारणेतून त्यांनी साहित्य आणि कलाविषयक धोरणाला शासनाच्या स्तरावर विशेष महत्त्व दिले.

साई सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून राज्यपातळीवरील एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यामागे त्यांचेच प्रोत्साहन होते. माजी राज्यमंत्री डी.पी.सावंत यांनी अनेक वर्ष ही एकांकिका स्पर्धा उत्तम रीतीने चालवली.

यशवंतराव चव्हाण जेव्हा नांदेडला येत तेव्हा त्यांच्यासाठी नंदगिरी किल्ल्यावर अण्णासाहेब गुंजकरांसारख्या शास्त्रीय गायकाची मैफिल आवर्जून ठेवली जात असे. अर्थात यामागे शंकररावजींचे कल्पक नियोजन असे. ग.ना.अंबेकर, देवीदास रसाळ, नरहर कुरुंदकर, स.रा.गाडगीळ, राम शेवाळकर, सुरेंद्र बारलिंगे, के.रं. शिरवाडकर अशा शहरातील साहित्यिक, पत्रकारांना कार्यक्रमाचे आवर्जून निमंत्रण असे. साहित्य, शास्त्र, कला, संगीत अशा सर्व विषयांवर येथे चौफेर चर्चा होत असे.

नांदेड येथील कलामंदिर येथे झालेल्या नाट्यसंमेलनाच्या समारंभात पु. ल. देशपांडे, व्यासपीठावर यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण, पद्मश्री शामराव कदम व इतर मान्यवर साहित्यिक.

शंकर साहित्य दरबार

पुण्याला जसा सवाई गंधर्व महोत्सव आयोजित केला जातो. त्याच धर्तीवर मराठवाड्यात महोत्सव आयोजित केला जावा, असे शंकररावजींचे स्वप्न होते. ही बाब २००४ मध्ये त्यांनी शारदा भवन एज्युकेशन सोसायटीतील आपल्या सहकाऱ्यांकडे बोलून दाखवली. नांदेडला अशा प्रकारचा संगीत महोत्सव आयोजित करण्याचे निश्चित झाले. परंतु याच काळात शंकररावजींचे देहावसान झाले. हे स्वप्न त्यांचे सुपुत्र महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी संगीत शंकर दरबाराच्या माध्यमातून पूर्ण केले आहे. आता या कार्यक्रमाला शंकर साहित्य दरबार अशी जोड मिळाली आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून मराठी माणसाची साहित्य आणि संगीतविषयक अभिरुची समृद्ध होत आहे. महाराष्ट्राचे सांस्कृतिक धोरण ठरवताना अशोक चव्हाण यांना आपल्या वडिलांनी केलेल्या साहित्य, कला व संस्कृती या संदर्भातील सूचना उपयुक्त ठरल्या.

कामाची शिस्त, अभ्यास, निष्कलंक चारित्र्य अशा गुणविशेषांनी सहज प्रभाव टाकणाऱ्या शंकरराव चव्हाण यांची साहित्य आणि संस्कृती याविषयीची जाण खूप खोल होती असेच म्हणावे लागेल.

शंकरराव चव्हाण हे स्वातंत्र्य चळवळ आणि हैदराबाद मुक्तिसंग्रामातून उभे राहिलेले नेतृत्व आहे. त्यामुळे त्यांच्या संपूर्ण वाटचालीत सर्वसामान्यांचे हित हेच केंद्रस्थानी राहिले.

डॉ. शंकरराव चव्हाण
जन्मशताब्दी वर्ष

निष्ठावंत सैनिक

प्रा. उत्तम सूर्यवंशी

संत एकनाथांचे हे एक भारूड आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे :

नाथांच्या घरची उलटीच खूण
पाण्याला मोठी लागली तहान
आत घागर बाहेर पाणी
अजि म्या एक नवल देखिले
वळचणीचे पाणी आढ्याला लागले
शेतकऱ्याने शेत पेरिले
राखणदाराला तेणे गिळले
हंडी खदिलं भात टाकिला
बकऱ्यापुढे देव कापिला
एका जनार्दनी मार्ग उलटा
जो जाणे तो गुरुचा बेटा

तब्बल पाचशे-साडेपाचशे वर्षांनंतर नाथाघरची उलटी खूण ज्यांनी मनोमन जाणली, ते डॉ. शंकरराव चव्हाण हेही पैठणचेच. हा नियतीचा योगायोग तर नव्हे ना? संत एकनाथ महाराज ज्या पैठण नगरीत होऊन गेले, त्याच पैठणचे सातवाहन घराणे होय. इ.स.पूर्व २३० ते इ.स. २३० या कालखंडात या घराण्याने दक्षिण भारतावर राज्य केले. त्या काळात पैठण ते उज्जैन असा मोठा व्यापार चालू होता. सातवाहनांचे आणि जलसंवर्धनाचे निकटचे नाते होते. सातवाहनकालीन शिलालेखामध्ये औद्योयांत्रिक या विशेष शब्दाची नोंद आहे. राष्ट्रकुट राजाने कंधार नगरीला पाणीपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केली होती. त्या उद्देशाने जलतुंग सागराची निर्मिती केली. तलावाच्या खालील ४०० एकर जमिनीला बारमाही पाण्याचा पुरवठा होत होता. इ.स. ९व्या शतकात निर्माण झालेली व्यवस्था आजही कार्यरत आहे. यादव काळात बारवांची संख्या मोठी होती. चालुक्य नृपती विक्रमादित्य ६वा यांच्या कारकिर्दीत सेनापती भीमनाथ याने लातूरजवळ गणेशवाडी या ठिकाणी भीमसागर तलाव उभारला होता. मराठवाड्यातील जलसंस्कृतीची ही पदचिन्हे समृद्ध वारसा सांगणारी आहेत.

संस्कार संचयातून जडणघडण

शंकररावजींचे वडील भाऊराव चव्हाण शिक्षक होते. त्यामुळे लहाणपणीच शिस्तीचे संस्कार झाले. कदाचित त्यामुळेच की काय, ते विविध क्षेत्रांमध्ये वावरत असताना हेडमास्तरच्या करड्या नजरेने जरब ठेवत असत. श्री. तुळजापूरकर गुरुजींनी राष्ट्रभक्तीचे धडे दिले. सातवीनंतर हैदराबादला शिक्षणासाठी गेले. १९३८ च्या 'वंदे मातरम्' चळवळीत भाग घेतला. त्यामुळे काही दिवस शाळेतून परागंदा व्हावे लागले. राष्ट्रभक्तीची किंमत मोजण्याचा सराव व्हायला लागला. ज्येष्ठ बंधू नारायणराव चव्हाण यांनी कमवा व शिका हा मूलमंत्र दिला. खासगी शिकवण्या करून मासिक ४५ ते ५० रुपयांची कमाई केली. त्यांची संपूर्ण शैक्षणिक कारकीर्द विशेष प्रावीण्यामुळे उंचावत केली.

मुक्ति आंदोलनाचे थिंक-टँक

हैदराबाद मुक्तिसंग्राम म्हणजे स्वातंत्र्य आणि सांसदीय लोकशाही प्रस्थापनेसाठी दिलेला अभूतपूर्व लोकलढा होता. १९४७ साली विदर्भातील उमरखेड कॅम्पवर शंकरराव एक स्वातंत्र्यसैनिक म्हणून दाखल झाले. ते उमरखेड कॅम्पचे थिंक टँक होते. निजामी सत्तेविरुद्ध गनिमीकाव्याने लढण्याचे नियोजन त्यांना करावे लागत असे. नियोजन आणि कृती यात समन्वय साधण्याची जोखीम पत्करावी लागे. त्यासाठी किंमत मोजावयाची तयारी होती. उमरखेड कॅम्पवरील एक हजार स्वातंत्र्यसैनिकांचे प्राण वाचवण्यासाठी पैनगंगेचे दुथडी भरलेले पात्र पोहत जाऊन ओलांडावे लागले. ही त्यांची ऐतिहासिक कामगिरी त्यांच्याविषयीचा आदर दुणावून जाते. स्वामी रामानंद तीर्थ यांनी त्यांचा एक निष्ठावंत सैनिक अशा शब्दांत गौरव केला.

वैभवशाली नेतृत्वाची मुहूर्तमेढ

शंकररावजी चव्हाण यांचे नेतृत्व एका रात्रीतून उदयाला आले नाही. अपार कष्ट उपसावे लागले. १९५२ साली ते नांदेडचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष झाले. स्वामी रामानंद तीर्थ यांनी जनसेवेचा कानमंत्र त्यांना दिला होता. स्वामीजींचा कानमंत्र आयुष्यभर जपला. नांदेड शहराला भ्रष्टाचारमुक्त व लोकाभिमुख प्रशासन दिले. नगराध्यक्ष असतानाही स्वत:ची सायकल नव्हती. सासऱ्यांनी त्यांना सायकल घेऊन दिली. एकदा हवालदाराने सायकलीला दिवा नाही म्हणून पकडले. त्यांनी सायकल तिथेच सोडली आणि घरी पायीच आले. एका गुत्तेदाराने लाच म्हणून शंभराच्या नोटांचे पाकीट नगराध्यक्षांच्या घरी पाठविले. शंकररावजींनी ताबडतोब जिल्हाधिकाऱ्यांना कळवले. मराठी मातीतील अस्सल कस पणाला लावला, पण चारित्र्यावर शिंतोडे उडू दिले नाहीत. मराठी मातीच्या वैभवशाली नेतृत्वाची इथेच मुहूर्तमेढ रोवली गेली.

सामंजस्य करार करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उद्योग मंत्री सुभाष देसाई, उद्योग राज्यमंत्री कु. आदिती तटकरे, माजी मुख्य सचिव अजोय मेहता, उद्योग विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी उपस्थित होते.

उद्योग विभागाच्यावतीने मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० (भाग दोन)चा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला. या वेळी विविध देशांचे वाणिज्यदूत, गुंतवणूकदार, उद्योगपती ऑनलाइन उपस्थित होते. विविध १२ देशांतील गुंतवणूकदारांसोबत १६ हजार ३० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले.

मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०

अमेरिका, चीन, दक्षिण कोरिया, सिंगापूर आदी देशांतील तसेच काही भारतीय गुंतवणूकदारांसोबत हे करार करण्यात आले. या वेळी उद्योगमंत्री सुभाष देसाई, उद्योग राज्यमंत्री कु.आदिती तटकरे, माजी मुख्य सचिव अजोय मेहता, प्रधान सचिव भूषण गगराणी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी व एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अनबलगन उपस्थित होते. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

कंपन्या आणि गुंतवणूक

- **एक्सॉन मोबिल (अमेरिका) ऑइल ॲण्ड गॅस** - इसाम्बे, रायगड ७६० कोटी
- **हेंगली (चीन) इंजिनिअरिंग** - तळेगाव टप्पा क्रमांक-२, पुणे २५० कोटी आणि १५० रोजगार
- **असेंडास (सिंगापूर) लॉजिस्टिक** - चाकण, तळेगाव, पुणे, भिवंडी, ठाणे ५६० कोटी
- **वरूण बेव्हरिजेस (भारत) अन्नप्रक्रिया** - सुपा, अहमदनगर ८२० कोटी
- **हिरानंदानी ग्रुप (भारत) लॉजिस्टिक** - भिवंडी, चाकण, तळेगाव १५० कोटी आणि २५०० रोजगार
- **एपिजी डिसी (सिंगापूर) डेटा सेंटर** - टीटीसी, ठाणे, महापे ११०० कोटी आणि २०० रोजगार
- **इस्टेक (दक्षिण कोरिया) इलेक्ट्रॉनिक्स सिस्टिम डिझाईन** - रांजणगाव, पुणे १२० कोटी आणि ११०० रोजगार
- **पीएमआय इलेक्ट्रो मोबिलिटी सोल्यूशन जेव्ही विथ फोटोन (चीन) ऑटो** - तळेगाव १००० कोटी रोजगार १५००
- **इसाम्बे लॉजिस्टिक (भारत) लॉजिस्टिक** - रायगड १५०० कोटी आणि रोजगार २५००
- **रॅकबँक (सिंगापूर) डेटा सेंटर** - ठाणे, हिंजेवाडी, पुणे १५०० कोटी
- **युपीएल(भारत) केमिकल** - शहापूर, रायगड ५००० कोटी आणि

करार सध्या जैसे थे...

हेंगली, पीएमआय इलेक्ट्रो मोबिलिटी सोल्युशन्स जेव्ही विथ फोटोन आणि ग्रेट वॉल मोटर्स या चीन येथील तीन कंपन्यांसमवेत महाराष्ट्र शासनाने १५ जून, २०२० रोजी केलेले सामंजस्य करार तूर्तास जैसे थे ठेवण्यात आले आहेत. याचा अर्थ ते रद्द केले असा नसून त्यावरील पुढील कार्यवाही प्रतीक्षाधीन आहे. हेंगली, पीएमआय इलेक्ट्रो मोबिलिटी सोल्युशन्स जेव्ही विथ फोटोन आणि ग्रेट वॉल मोटर्स या तीन कंपन्यांनी अनुक्रमे २५० कोटी, १ हजार कोटी आणि ३ हजार ७७० कोटी रुपयांची गुंतवणूक राज्यातील तळेगाव टप्पा-२ पुणेमध्ये करण्यासाठी सामंजस्य करार केलेला आहे. एकूण ५ हजार ०२० कोटी रुपयांच्या या प्रकल्पांसंदर्भात सध्याच्या वातावरणात केंद्र शासनाकडून स्पष्ट धोरण जाहीर होण्याची वाट पाहण्यात येईल.

- सुभाष देसाई, उद्योगमंत्री

रोजगार ३०००

- **ग्रेट वॉल मोटर्स (चीन) ऑटोमोबाईल** - तळेगाव, पुणे ३७७० कोटी आणि २०४२

वर्ल्ड असोसिएशन ऑफ इन्व्हेस्टमेंट प्रमोशन एजन्सीज (डब्ल्यूएआयपीए) आणि यूएस इंडिया पार्टनरशिप फोरम (यूएसआयएसपीएफ) सह द्विपक्षीय भागीदारी करारावर या वेळी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

खासगी गुंतवणूक संस्थांच्या (प्रायवेट ईक्विटी फर्म्स) प्रतिनिधींसोबत आणि राज्यातील प्रमुख उद्योजकांसोबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून चर्चा केली.

परवानग्यांची प्रक्रिया सोपी

कोरोना संकटानंतर राज्यात उद्योगांचे अर्थचक्र सुरू झाले आहे. राज्याने उद्योगस्नेही धोरणाचा अवलंब केलेला आहे. परवानग्यांची संख्या ७६ वरून २५ वर आणली आहे. भविष्यातही राज्यातील गुंतवणूक वाढीसाठी आलेल्या तज्ज्ञांच्या सर्व सूचनांचे स्वागत केले जाईल. खासगी गुंतवणूक संस्थांच्या प्रतिनिधींची एक समिती तयार करून राज्यातील उद्योगवाढीसाठी आवश्यक अशा सूचना या समितीच्या माध्यमातून मागवण्यात येतील.

मुंबईनजीकच मॉडेल फार्मा पार्क तयार करण्यात येत आहे. त्याचबरोबर नव्या तंत्रज्ञानावर आधारित इलेक्ट्रॉनिक पार्कही उभे राहत आहे. राज्यात ग्रीन इंडस्ट्रीला चालना देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ज्या उद्योगांना खूप परवानग्यांची गरज नाही आणि ज्यांची लगेच सुरुवात करता येईल, अशा उद्योगांना ग्रीन उद्योग झोनमधून तत्काळ कार्यरत करण्याची प्रक्रिया सुरू करता येईल. यासाठी सिंगल विंडो सिस्टिम त्यांना मदतीची ठरू शकेल.

केदारा कॅपिटलचे मनिष केजरीवाल, के.के. आर इंडियाचे संजय नायर, ब्लॅक स्टोनचे अमित दीक्षित, बेन कॅपिटलचे अमित चंद्रा, वॉरबर्ज पिंकअसचे विशाल महादेविया यांनी चर्चेत सहभाग घेतला. कोरोनानंतर अर्थचक्राला गती देत असतांना डिजिटल तसेच तंत्रज्ञान क्षेत्राबरोबरच राज्यात मॅन्युफॅक्चरिंग, औषध निर्मिती, पायाभूत सुविधा, गृहनिर्माण, ऊर्जा, बँकिंग यासारख्या अनेक क्षेत्रात गुंतवणुकीच्या संधी निर्माण होणार असल्याचे मत या वेळी या गुंतवणूक सल्लागारांनी व्यक्त केले.

उद्योग विभागाची घोडदौड

सुमारे एक हजार १७ कोटींचे सामजस्य करार करताना उद्योगमंत्री सुभाष देसाई, उद्योग विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.पी. अनबलगन आदी

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाची घोडदौड कायम आहे. उद्योग विभागाच्यावतीने सामंजस्य करार करण्यात आले होते त्यानंतर पुन्हा दोन महत्त्वाच्या उद्योगांसोबत सुमारे एक हजार १७ कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले. उद्योगमंत्री सुभाष देसाई, उद्योग विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अनबलगन तसेच संबंधिक कंपन्यांचे प्रतिनिधी या वेळी उपस्थित होते.

सुप्रसिद्ध डीबीजी इस्टेट कंपनीसोबत ९०० कोटी रुपयांचा गुंतवणूक करार करण्यात आला. याद्वारे २७०० नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत. ही कंपनी ॲमेझॉन, फ्लिपकार्ट आदी कंपन्यांसाठी लॉजिस्टिक पार्क तयार करणार आहे. ही कंपनी भिवंडी येथे लॉजिस्टिक क्षेत्रात काम करणार आहे. जपानच्या आयडियल केमी प्लास्ट कंपनीसोबत ११७ कोटींचा गुंतवणूक करार करण्यात आला आहे. ही कंपनी अहमदनगर जिल्ह्यातील सुपा येथे उद्योग सुरू करणार आहे. या ठिकाणी ८८ जणांना थेट रोजगार उपलब्ध होणार आहे. संबधित कंपनी या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणार आहेत.

मेड इन महाराष्ट्र

देशाच्या औद्योगिक प्रगतीत महाराष्ट्राला भरीव योगदान द्यायचे आहे. त्यामुळे राज्यातील उद्योजकांनी 'मेड इन महाराष्ट्र'चा दबदबा वाढवण्यासाठी जगात राज्याची नवी ओळख निर्माण करणारा नवा प्रकल्प सादर करावा, त्यासाठी लागणारे सर्व सहकार्य करण्यात येईल, अशा शब्दात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी उद्योजकांना विश्वास दिला. कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर औद्योगिक क्षेत्राला प्रोत्साहन देणारे सामंजस्य करार नुकतेच करण्यात आले आहेत. त्यानंतर या व्हिडिओ कॉन्फरन्समधील चर्चेमधून, उद्योजकांनी राज्यात गुंतवणूक करण्यासाठी विश्वास दाखवला आहे हे लक्षात येते. आपल्याकडे सगळ्या जगाची भूक भागवण्याची क्षमता आहे. त्यासाठी कृषी क्षेत्रात शीतसाखळी तयार करण्याची आवश्यकता आहे. बदलत्या गरजांनुसार बदलते व्यवसाय येणे आवश्यक आहेत. त्यानुसार जर उद्योजकांनी नवे प्रकल्प सादर केले तर त्यांना कोणत्याही अडचणीशिवाय चोवीस तासांच्या आत सर्व परवाने देऊन प्रकल्प सुरू करण्याची हमी देण्यात आली आहे.

टीम लोकराज्य

शासन हे विविध पातळ्यांवर काम करत असते. यामध्ये मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय महत्त्वपूर्ण असतात. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयांचा थोडक्यात आढावा.

मंत्रिमंडळात ठरले !

पर्यावरण व वातावरणीय विभाग

पर्यावरण विभागाच्या नावात बदल करून ते आता पर्यावरण व वातावरणीय विभाग असे करण्यास मान्यता देण्यात आली. पर्यावरण विभागामध्ये वातावरणातील बदलांशी निगडित कामे पार पाडण्यासाठी 'स्टेट नॉलेज मॅनेजमेंट सेंटर ऑन क्लायमेट चेंज' हा कक्ष मदत करत असून हा विषय पर्यावरण विभागाचा अविभाज्य घटक आहे. यातील कामाचा आवाका यापुढे वाढत जाणार असून जनमाणसांमध्येही जागरूकता वाढत असल्याने हा निर्णय घेण्यात आला.

पंचतारांकित पर्यटन केंद्र

वेंगुर्ला तालुक्यातील मौ. शिरोडा वेळागर येथे पंचतारांकित पर्यटन केंद्र उभारण्यासाठी ताज ग्रुपच्या मे.इंडियन हॉटेल्स कंपनीला ५४.४० हेक्टर जमीन ९० वर्षाच्या दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात पहिले पंचतारांकित पर्यटन केंद्र उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने भूसंपादित केलेली जमीन दीर्घ भाडेपट्ट्याने इंडियन हॉटेल्स कंपनीला देण्यात येईल. पर्यटन हा एक प्रमुख सेवा उद्योग असून राज्याच्या आर्थिक विकासाच्या वाढीसाठी महत्त्वाची भूमिका बजावतो. हे लक्षात घेऊन सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये असे पंचतारांकित पर्यटन केंद्र उभारण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

एमटीडीसीच्या जमिनी विकसित

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ताब्यातील शासकीय जमिनींचा आणि मालमत्तांचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्यासाठी खासगीकरणाच्या धोरणास तत्त्वतः मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. पहिल्या टप्प्यात गणपतीपुळे, माथेरान, महाबळेश्वर, हरिहरेश्वर, मिठबाव येथील महामंडळाचे रिसॉर्ट तसेच ताडोबा आणि फर्दापूर (औरंगाबाद) येथील मोकळ्या जमिनींचा विकास करण्यात येईल.

माहिती तंत्रज्ञान धोरणास मुदतवाढ

राज्याच्या माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहायभूत सेवा धोरण-२०१५ चा कालावधी नवीन धोरण अस्तित्वात येईपर्यंत वाढवण्यास मान्यता देण्यात आली. हे धोरण ३० जून रोजी संपुष्टात येणार आहे. नवीन धोरण तयार करण्याची प्रक्रिया ही कोविड विषाणुच्या महामारीमुळे थांबली आहे. तथापि, उद्योग विभागामार्फत सर्व सबंधित तज्ज्ञ व्यक्तींशी व्हिडिओ कॉन्फरन्स व वेबिनारच्या माध्यमातून संपर्क साधण्यात येत असून लवकरच या नवीन धोरणाची आखणी करण्यात येणार आहे. २०१५ रोजी माहिती तंत्रज्ञान धोरण आखण्यात आले होते त्याची मुदत पाच वर्षांची होती.

अधिनियमात सुधारणा

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियमामध्ये सुधारणा करून महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (द्वितीय सुधारणा) अध्यादेश, काढण्यास मान्यता देण्यात आली. यानुसार मत्स्य आहारावरील वस्तू व सेवा करामध्ये १ जुलै २०१७ ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीतील विक्रीवर करआकारणीतून सूट देण्यात आलेली आहे. बिगरशेती अवजाराकरिता लागणारे पुली, चाके व इतर भागावरील वस्तू व सेवा कराचा दर १ जुलै २०१७ ते ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत १४% वरून ६% एवढा करण्यासाठी मान्यता देण्यात आली

आठ सागरी किनाऱ्यांवर 'बीच शॅक्स'

राज्यातील समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटन वाढवण्यासाठी 'बीच शॅक्स' (चौपाटी कुटी) उभारण्या संदर्भातील धोरणास मान्यता देण्यात आली. या कुट्या तात्पुरत्या हंगामी स्वरूपाच्या असतील. सध्या पायलट प्रोजेक्ट म्हणून रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, आरेवारे; सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुणकेश्वर, तारकर्ली; रायगड जिल्ह्यातील वर्सोली, दिवेआगार आणि पालघर जिल्ह्यातील केळवा व बोर्डी या ८ किनाऱ्यांवर बीच शॅक्स उभारण्यात येतील. या संदर्भातील अर्ज

www.maharashtratourism.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पुढील वर्षीपासून इतर चौपाट्यांवरदेखील या धोरणाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी होईल. महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या सहमतीने पर्यटन संचालनालयाने निश्चित केलेल्या जागेवरच तात्पुरती चौपाटी कुटी उभी करण्यासाठी परवाना देण्यात येईल. एका चौपाटीवर कमाल १० कुटी उभारता येतील. स्थानिकांना ते उभारण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल.

आहे. करदात्यांच्या सुलभतेकरिता महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ मध्ये काही तांत्रिक स्वरूपाच्या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

कंपन्यांना नोंदणी दाखला

महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यावरील कर अधिनियम, १९७५ (सुधारणा) अध्यादेशास मान्यता देण्यासंदर्भात मंजुरी देण्यात आली. ईज ऑफ डुईंग बिझनेसच्या दृष्टीने कंपनी कायद्यांतर्गत नोंदणी करू इच्छिणाऱ्या कंपन्यांना व्यवसायकर कायद्यांतर्गत आपोआपच नोंदणी दाखला देण्यासंदर्भात सुधारणा करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

उद्योगवाढीच्या उपाययोजना

कोविड परिस्थितीनंतर राज्यातील औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी विविध उपाययोजनांना मंजुरी देण्यात आली. या उपाययोजना खालीलप्रमाणे:

महापरवाना/जलद ना-हरकत परवाने उपलब्ध करणे

महा-परवाना : राज्यात येणाऱ्या सर्व थेट परकीय गुंतवणुकीचे व ५० कोटी रुपये व त्यापेक्षा अधिक गुंतवणुकीच्या औद्योगिक प्रस्तावांना परिशिष्ट-१ मध्ये नमूद पुर्व उभारणी संबंधित परवानग्या उपलब्ध न करता बांधकाम व उत्पादन सुरू करण्यासंदर्भात शासनाचे आश्वासनपत्र म्हणून महापरवाना देण्याचा निर्णय घेण्यात आला. हा महापरवाना मैत्री कक्षाच्या (एक खिडकी कक्ष) संकेतस्थळावर ऑनलाइन परिपूर्ण स्वरूपात अर्ज प्राप्त झाल्यापासून ४८ तासात ऑनलाइन स्वरूपात देण्यात येईल. तसेच महापरवाना प्राप्त उद्योगांना परिशिष्ट-१ मध्ये नमूद विविध परवाने व ना हरकती कालमर्यादेत देण्याचे आश्वासित करण्यात येत आहे व विशिष्ट कालमर्यादेत सदर ना हरकती प्राप्त न झाल्यास त्यांना मानिव मान्यता देण्यात येईल.

पात्रता व वैधता : राज्यात येणाऱ्या सर्व थेट परकीय गुंतवणुकीचे व ५० कोटी रुपये व त्यापेक्षा अधिक गुंतवणुकीच्या औद्योगिक प्रस्ताव जे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे निश्चित केलेल्या हरित व केशरी प्रवर्गातील उद्योगांना (पर्यावरण सुलभ) परिशिष्ट-१ मध्ये नमूद पूर्व उभारणी संबंधित परवानग्यासाठी पात्र राहतील. याव्यतिरिक्त घटकास अन्य परवाना/ना हरकत आवश्यक असल्यास मैत्री-एक खिडकी कक्षाद्वारे जलदगतीने पाठपुरावा करून उपलब्ध करून देण्यात येईल. महापरवाना प्राप्त करण्यासाठी घटकास संबंधित यंत्रणेकडून (आवश्यक तेथे) अथवा वैयक्तिकरीत्या खासगी भूखंड उपलब्ध करून घेणे आवश्यक राहील. ज्या औद्योगिक घटकांना त्यांच्या उत्पादनाकरिता/प्रक्रियांकरिता पर्यावरण ना हरकत घेण्याची आवश्यकता आहे अशा उद्योगांना प्रथम पर्यावरणविषयक ना हरकत घेण्याची अट राहील.

सक्षम प्राधिकारी : या प्रकरणी पात्र घटकांना पूर्व उभारणी / बांधकाम चालू करणे / उत्पादन सुरू करण्याकरिता लागणाऱ्या विविध परवान्यांसाठी न थांबता थेट महापरवाना देण्याकरिता मैत्री कक्ष साहाय्य करेल. तसेच जे पात्र घटक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कार्यक्षेत्रात भूखंड प्राप्त आहेत अशा घटकांसाठी महापरवाना मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यामार्फत प्राधिकृत अधिकारी हे सक्षम प्राधिकारी असतील व एम.आय.डी.सी. क्षेत्राबाहेरील पात्र घटक उद्योगांकरिता विकास आयुक्त, उद्योग यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी हे सक्षम प्राधिकारी असतील.

कालमर्यादा : पात्र घटक उद्योगांना परिपूर्ण ऑनलाइन अर्ज प्राप्त झाल्यापासून ४८ तासात महापरवाना देण्यात येईल. या कालमर्यादेत आवश्यक परवाने संबंधित प्रशासकीय विभागाने द्यावेत.

जोडा आणि वापरा : राज्यामध्ये नवीन व विद्यमान औद्योगिक गुंतवणूकदारांना प्रगत तंत्रज्ञान, वाजवी किंमत आणि उपयुक्तता असलेल्या गरजेनुसार बदल करणे शक्य असलेल्या लवचीक पायाभूत सोयीसुविधा पुरवण्याचे प्रस्तावित आहे. कोविड महामारीच्या विषम परिस्थितीनंतर औद्योगिक गुंतवणूकदारांना त्यांची जोखिम कमी करून किमान भांडवलावर उद्योग उभारण्यासाठी उपयुक्त ठरेल. या माध्यमातून राज्यात जोडा आणि वापरा तत्त्वावर औद्योगिक क्षेत्रे विकसित करण्यात येतील.

एमआयडीसीने नवीन गुंतवणुकदारांकरिता खास डिझाईन केलेले प्लग ॲण्ड प्ले तत्त्वावरील जमिनी, प्रगत सुविधांसह स्वस्त किंमतीतील तयार गाळे यांची निवड करता येईल.

हे भूखंड/गाळे दीर्घ/अल्प कालावधीच्या भाडेपट्टे करारावर उपलब्ध करून देण्यात येतील. या प्रयोजनाकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ एकूण ४०,००० एकर जागा उपलब्ध करून देईल.

ज्या उद्योगांमध्ये एक हजारपेक्षा अधिक कामगार आहेत त्यांना कंपनी आवारात वसतिगृह / निवारा बांधण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ जागेची तरतूद करेल. तसेच अन्य उद्योगांसाठीदेखील एम.आय.डी.सी. नियोजन आराखडा कामगार वसतिगृहाकरिता स्वतंत्र आरक्षण ठेवेल.

कोविड-१९ महामारीच्या परिणामस्वरूप कामगारांच्या स्थलांतरणामुळे उद्योग घटकांना आवश्यक मनुष्यबळ प्राप्त करणे तसेच राज्यातील स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरिता एकत्रित माहितीचा समन्वय व साहाय्य मिळण्याकरिता औद्योगिक कामगार सुविधा पोर्टल नावाने ऑनलाइन पोर्टल स्थापन करण्यात येईल याबाबत स्वतंत्र संकेतस्थळ माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या मदतीने उभारण्यात येईल.

एकत्रित शोध : गुंतवणूकदारास त्याच्या गुंतवणुकीविषयी सर्व प्रश्नांविषयक माहिती घेणे, अभ्यास करणे, तुलना करणे इत्यादीसाठी एक सर्व समावेशक पोर्टल तयार करणे हा या पुढाकाराचा उद्देश आहे. परकीय थेट औद्योगिक गुंतवणुकीच्या सर्व नवीन प्रस्तावांसाठी हे एक समन्वय स्थान असून गुंतवणुकीच्या संधी, पुरवठा साखळी इत्यादी महत्त्वपूर्ण माहिती येथे उपलब्ध होईल. पुरवठा साखळीचे स्थानिकीकरण तसेच स्वदेशीकरण करणे आणि स्थानिक कंपन्याना विदेशी कंपन्याबरोबर भागीदारी करण्याची दुहेरी संधी याद्वारे निर्माण होईल.

लवचीकता प्रस्तावित करणे : सूक्ष्म, लघू व मध्यम प्रवर्गातील आजारी/बंद पडलेल्या औद्योगिक घटकांना राष्ट्रीय कंपनी लवादकडे दाद मागण्यास अडचणी आहेत अशा घटकांना प्रशासकीय कायदेविषयक

सल्ला देण्याकरिता व वित्तीय संस्थांशी समन्वय साधण्याकरिता समन्वय कक्ष महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये स्थापन करण्यात येईल व याबाबत कार्यपद्धती व स्वरूप यथावकाश निर्गमित करण्यात येईल.

गुंतवणूक समन्वय अधिकारी : राज्यात उद्योग व्यवसायात थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करणे तसेच देशांतर्गत गुंतवणुकीस चालना देणे या कामी विविध उद्योजक, सल्लागार, व्यापार व वाणिज्य संघटना, केंद्र शासन व परदेशी वकिलाती/ उच्चायुक्त यांच्याशी समन्वय साधण्यासाठी भूषण गगराणी, प्रधान सचिव यांची संपर्क व समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

धान खरेदीपोटी तयार सीएमआर

किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत २०१९-२० मधील खरीप पणन हंगाम व २०२०-२१ मधील रब्बी पणन हंगाम अंतर्गत वाहतूक करण्यात येणाऱ्या धान / सीएमआर (तांदूळ)साठी वाहतूक खर्च उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

कापसाचा चुकारा

शेतकऱ्यांना कापसाचे चुकारे वेळेत देण्यासाठी कापूस पणन महासंघाच्या कर्जास शासन हमी देण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाद्वारे हंगाम २०१९-२० मध्ये किमान आधारभूत दराने खरेदी करण्यात येणाऱ्या कापसाचे चुकारे शेतकऱ्यांना वेळेत अदा करण्यासाठी कापूस पणन महासंघास १८०० कोटी रुपयांच्या कर्जास यापूर्वी दिलेल्या शासन हमीप्रमाणेच, अतिरिक्त १००० कोटी रुपयांच्या कर्जास शासन हमी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

रोहयोतून फळबाग योजना

निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण विभागातील जिल्ह्यात बागायतींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्यामुळे तेथील बागायतदारांचे उत्पनाचे स्रोत नष्ट झालेले आहेत. अशा शेतकऱ्यांना पुनर्लागवडीसाठी पुनरुज्जीवनासाठी राज्य रोजगार हमी योजनेमधून शासकीय अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

वीज शुल्कात सवलत

राज्यातील उद्योगधंद्याना वीज शुल्कामध्ये सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्याचे विद्युत शुल्क ९.३ टक्के असून ते ७.५ टक्के इतके करण्यात येईल. याचा फायदा सर्व औद्योगिक घटकांना होऊन उद्योगधंद्यांना स्वस्तात वीज उपलब्ध होईल. यामुळे राज्य शासनाला दरवर्षी ४४० कोटी ४६ लाख इतका महसुली तोटा होईल. या संदर्भातील घोषणा नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात करण्यात आली होती.

वीज खरेदी

कोस्टल गुजरात पॉवर लिमिटेड या गुजरात येथील औष्णिक वीज प्रकल्पातून पूरक वीज खरेदीसाठी करार करण्यास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पातून निर्माण होणारी ७६० मेगावॅट वीज खरेदीसाठी २२ एप्रिल २००७ रोजी महावितरण कंपनीने दीर्घ मुदतीचा करार केला असून त्याचा समतल दर २ रुपये २६ पैसे प्रतियुनिट इतका आहे. कोस्टल गुजरात प्रकल्पासंदर्भात उच्चस्तरीय समितीच्या शिफारशी विचारात घेऊन सर्व वीज खरेदीदार राज्यांची संयुक्तपणे एक समान दराने समान अटी व शर्तींसह पूरक वीज खरेदी करार करण्यास सहमती असल्यास केंद्रीय विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून पूरक वीज खरेदी करार करण्यात येईल.

आशा स्वयंसेविकांना मोबदल्यात वाढ

आशा स्वयंसेविका, गट प्रवर्तक यांच्या मोबदल्यात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. आशा स्वयंसेविकांना दरमहा कमाल २ हजार रुपये तर गट प्रवर्तकांना ३ हजार रुपये राज्य शासनाच्या निधीतून देण्यात येतील. यासाठी १७० कोटी रुपये खर्चास मान्यता देण्यात आली. १ जुलैपासून ही वाढ लागू होईल. सध्या राज्यात ग्रामीण आणि नागरी भागात ६५ हजार ७४० आशा स्वयंसेविकांची पदे भरलेली आहेत.

नागपूर–नागभीड ब्रॉडगेज रेल्वे मार्ग

नागपूर-नागभीड या नॅरोगेज रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेज रेल्वे मार्गात रुपांतर करण्याकरिता राज्य शासनाचा सहभाग देण्याबाबत राज्य शासनाच्या आर्थिक सहभागास मान्यता देण्यात आली. नागपूर-नागभीड या ११६.१५ किमी नॅरोगेज रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेज रेल्वे मार्गात रूपांतर करण्यात येईल.

कोरोनाविरूद्धचा लढा लढण्यासाठी राज्य शासनाने वेळोवेळी अनेक महत्त्वाचे निर्णय या काळात घेतले. यात आरोग्य विभागाने उपचार पद्धतीपासून ते रुग्णांना घरी सोडण्यापर्यंतच्या धोरणांचा समावेश आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी घेतलेल्या लोकोपयोगी निर्णयामुळे कोरोना संकटकाळात नागरिकांना दिलासा मिळत आहे.

कोरोनाशी ताकदीने लढा..

अजय जाधव

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. गेल्या चार महिन्यांपासून आरोग्य यंत्रणा कोरोनाशी सामना करीत असून त्याला यश येत आहे. राज्यात १ जुलैपर्यंत सुमारे ९३ हजार कोरोनाबाधित रुग्ण बरे होऊन घरी गेले. राज्याचा रुग्ण बरे होण्याचा दर हा जवळपास ५२ टक्के आहे. डॉक्टर्स, आरोग्य कर्मचारी यांनी घेतलेल्या अविरत मेहनतीमुळे हजारो रुग्ण कोरोनामुक्त होत आहेत. यामुळे सामान्यांमध्ये कोरोना बरा होतो असा दिलासादायक संदेश गेला.

राज्यात सुरुवातीला कोरोना चाचणी प्रयोगशाळा केवळ तीन होत्या. त्यानंतर आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सातत्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून प्रयोगशाळांची संख्या वाढवून घेतली. राज्यात आजमितीस १०८ प्रयोगशाळा आहेत. चाचण्यांची सुविधा वाढल्याने रुग्ण निदानात मोठी गती आली. देशातील सर्वाधिक प्रयोगशाळा आणि चाचण्या महाराष्ट्रात होत आहेत.

जनतेशी संवाद साधताना मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे.

प्लाझ्मा थेरपी

कोरोनाच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी प्लाझ्मा थेरपीचा वापर राज्यात होत असून त्यामुळे रुग्णांना त्याचा फायदा होत आहे. या थेरपीचा वापर व्यापक प्रमाणात होण्यासाठी महाराष्ट्रात जगातली सर्वात मोठी प्लाझ्मा थेरपी ट्रायल केली जात आहे. त्या सुविधेचे उद्घाटन नुकतेच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याहस्ते झाले. राज्यातील २३ वैद्यकीय महाविद्यालयात प्लाझ्मा थेरपी सुविधा करण्यात आली आहे. गंभीर रुग्णांना बरे करण्यासाठी प्लाझ्मा थेरपीचा उपयोग प्रथमच होत आहे. राज्यात एप्रिलमध्ये प्लाझ्मा थेरपीचा पहिला प्रयोग केला होता. नंतर केंद्राकडे परवानगी मागितली, पाठपुरावा केला, त्याला यश आले आहे.

महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून राज्यातील १०० टक्के जनतेला मोफत आरोग्य उपचार देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र दिनी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी जाहीर केला. राज्यातील नागरिकांना मोफत व कॅशलेस विमा संरक्षण देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य ठरले आहे. आता राज्याच्या या महत्त्वपूर्ण योजनेबाबत अन्य राज्यांकडून माहिती घेतली जात आहे.

मनमानीला चाप

कोरोनाच्या रुग्णांवर उपचार करताना काही खासगी रुग्णालयांकडून मनमानी पद्धतीने दर आकारणी केली जात आहे. तिला चाप लावण्याचा धाडसी निर्णय राज्य शासनाने घेतला.

मुंबईसह राज्यातील सर्व खासगी व धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या रुग्णालयांमधील एकूण खाटांच्या ८० टक्के खाटा कोरोना व अन्य रुग्णांच्या उपचारासाठी राखीव ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी मेस्मा, आपत्कालीन व्यवस्थापन कायदा, साथरोग नियंत्रण कायदा, बॉम्बे चॅरिटेबल ट्रस्ट आणि बॉम्बे नर्सिंग होम कायद्यांमधील तरतुदींच्या अनुषंगाने खासगी रुग्णालयांना राज्य शासनाने काढलेल्या आदेशाचे पालन करणे

अभिनव उपक्रम

- कोरोनासाठी उपचार सुविधा निर्माण करताना राज्याने अनेक अभिनव उपक्रम केले. मुंबईमध्ये बीकेसी मैदानावर १००० खाटांच्या रुग्णालयाची केवळ १५ दिवसांत उभारणी केली. त्यानंतर तेथेच पुन्हा अतिरिक्त आयसीयू बेडदेखील उभारण्यात आले. मोकळ्या मैदानावर रुग्णालय उभारून आयसीयू बेडची सुविधा असणारे देशातील पहिले रुग्णालय ठरले आहे. त्याप्रमाणे मुंबईत गोरेगाव, महालक्ष्मी, वरळी, धारावी येथे असे कोविड सेंटर अल्पावधीत उभारले. त्याचप्रमाणे ठाणे येथेही अशा प्रकारे रुग्णालयाची उभारणी करण्यात आली. यासोबत आरोग्य विभागाने काही महत्त्वाचे निर्णय गेल्या चार महिन्यांच्या काळात घेतले.
- अतिसौम्य किंवा लक्षणे नसलेल्या कोरोना पॉझिटिव्ह व्यक्तींना गृह विलगीकरणाचा पर्याय देण्याबाबत आरोग्य विभागाकडून मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आली.
- कोरोनामुळे महाराष्ट्रात होणारे मृत्यूचे विश्लेषण करणे आणि त्याचे प्रमाण कमी करण्याकरिता आरोग्य विभागाने मुंबई अणि परिसरासाठी तसेच उर्वरित महाराष्ट्रासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात आली.
- लॉकडाऊनच्या काळात नागरिकांना आरोग्य सल्ल्यासाठी मोफत ऑनलाइन ई- संजीवनी ओपीडी.
- कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने राज्यात सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, सुपारी, पान, पानमसाला, गुटखा तसेच अन्य तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन, थुंकण्यास व धूम्रपानास प्रतिबंध करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्यांना दंडासह शिक्षा.
- कोरोनाच्या काळात राज्यात जाणवणाऱ्या रक्तटंचाईवर मात करण्यासाठी आरोग्य विभाग प्रयत्न करीत असून रक्तदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी आता फेसबुकची मदत.
- राज्यातील आरोग्य विभागातील १७ हजार विविध रिक्त पदे आहेत ती भरण्यासाठी विशेष यंत्रणा केली आहे. सोबतच वैद्यकीय शिक्षण आणि विविध महापालिकांमधील रिक्त पदे भरण्यास मान्यता
- ग्रामीण भागात आशा वर्कर ७४ प्रकारची विविध कामे करतात त्याचा त्यांना कामानुसार मोबदला मिळतो मात्र राज्य शासनाकडून २००० रुपये कायमस्वरूपी मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला. गटप्रवर्तकांना ३००० रुपये मानधन देण्यात येणार आहे.

बंधनकारक केले आहे. यामुळे कोरोनाच्या रुग्णांना खाटा उपलब्ध होण्याबरोबरच उपचाराच्या दरावरदेखील नियंत्रण राखण्यास मदत होत आहे.

रुग्णांना खाटा उपलब्ध होण्यासाठी मुंबईतील खासगी रुग्णालयांना आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी अचानक भेटी दिल्या. पहाटेपर्यंत त्यांची ही कारवाई सुरू होती. त्यांनी चार रुग्णालयांना कारणे दाखवा नोटीसदेखील बजावण्यास सांगितले. आरोग्यमंत्र्यांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे सामान्य रुग्णांना दिलासा मिळाला.

मान्यताप्राप्त असलेल्या प्रयोगशाळांचे कोरोना निदान चाचणी शुल्क निश्चित करण्यासाठी राज्य शासनाने चार सदस्यांची समिती गठित केली होती. या समितीने आठवडाभरातच आपला अहवाल शासनाला सादर करून खासगी प्रयोगशाळेतील कोरोना चाचण्यांसाठी २२०० रुपये व २८०० रुपये असा दर निश्चित केला. देशात कोरोना चाचण्यांसाठी सर्वात कमी दर राज्यात आहे.

रॅपिड ॲण्टीजेन

कोरोनासाठी करण्यात येणाऱ्या स्वॅब तपासण्यांचे जलदरीत्या निदान व्हावे यासाठी रॅपिड ॲण्टीजेन तपासण्यांचा उपयोग करण्यासाठी राज्य शासनाने मान्यता दिली. केवळ १५ ते ३० मिनिटांत याद्वारे निदान होणे शक्य होईल यासाठी तापसदृश्य लक्षणे असलेल्या, तसेच अतिजोखमीच्या व्यक्तींच्या संपर्कातील लक्षणे नसलेल्या, हृदयविकार, मूत्रपिंड विकार, मधुमेह तसेच उच्चरक्तदाबाच्या रुग्णांसह गरोदर मातांसाठी या तातडीच्या चाचणीचा उपयोग केला जात आहे. ॲण्टीजेन चाचणी पाठोपाठ अण्डीबॉडीज् चाचण्या करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. कंटेनमेंट झोनमध्ये किती लोकांना संसर्ग झाला याची माहिती या चाचणीद्वारे मिळणार आहे.

कोरोना रुग्णांवरील उपचारासाठी रेमडेमिसीवीर, फॅबिपीरावीर, टॅझिलोझुमा ही औषधे उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाने सातत्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आणि औषध नियंत्रण प्राधिकरणाकडे मागणी केली. त्यानुसार आता राज्यात ही औषधे प्रत्येक जिल्ह्यात उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. अतिदक्षता विभागात (आयसीयू) उपचार सुरू असलेल्या कोरोनाच्या रुग्णांसाठी विशेषज्ञांचे मार्गदर्शन आणि उपचारासाठी 'टेलीआयसीयू' सुविधेचा वापर केला आहे. मुंबई, ठाणे, जळगाव, सोलापूर, औरंगाबाद, अकोला आणि जालना या ७ जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वांवर ही सुविधा सुरू केली आहे.

राज्यातील कोरोनाबाधित रुग्णांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यासाठी रुग्णवाहिका तसेच खासगी वाहने जिल्हा प्रशासनाने अधिग्रहित करण्याचा निर्णय आरोग्य विभागामार्फत घेण्यात आला आहे. अधिग्रहित केलेले रुग्णवाहक वाहन जास्त गंभीर नसलेल्या रुग्णांसाठी वापरण्यात येईल.

राज्यात कोरोनाच्या रुग्णसंख्येत वाढ होत असताना रुग्णांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यासाठी रुग्णवाहिकांची आवश्यकता भासत आहे. त्यासाठी त्यांची संख्या वाढवण्याकरिता जिल्ह्यांमध्ये रुग्णालये, स्वयंसेवी संस्था यांच्याकडील रुग्णवाहिका उपलब्ध करून घेतानाच गरज भासल्यास, खासगी वाहन पुरवठादारांची वाहनेदेखील रुग्णवाहक वाहन म्हणून वापर करण्याचा निर्णय झाला आहे. कोरोना काळात खासगी रुग्णवाहिकांसाठी रुग्णांकडून अवाजवी दर आकारण्यात येत असल्याच्या तक्रारी होत्या. त्याची दखल घेऊन खासगी रुग्णवाहिका आणि वाहने अधिग्रहित करताना त्यांचा दर निश्चित करून ते उपलब्ध करून देण्यात येईल. २४ तास या अधिग्रहित केलेल्या रुग्णवाहिका आणि वाहने उपलब्ध राहतील, असे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितले.

विभागीय संपर्क अधिकारी

बा विठ्ठला... विश्वाला कोरोनामुक्त कर

महाराष्ट्रासह अवघ्या विश्वाला कोरोनामुक्त कर आणि माझ्या बळीराजाची भरभराट होऊन त्याला सुख, समाधान लाभू दे, असे साकडे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी श्रीविठ्ठलाच्या चरणी घातले.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, सौ. रश्मी ठाकरे आणि मानाचे वारकरी अहमदनगर जिल्ह्यातील वीणेकरी विठ्ठल ज्ञानदेव बढे आणि सौ.अनुसया बढे (मु.चिंचपूर-पांगुळ, ता. पाथर्डी) यांच्या हस्ते महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्रीविठ्ठल-रुक्मिणीची आषाढी एकादशीनिमित्त शासकीय महापूजा करण्यात आली.

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

कोविड-१९ हा संसर्गजन्य रोग आहे आणि तो कोणालाही होऊ शकतो.

आपल्या सुरक्षिततेसाठी आवश्यक आहे

घरीच राहा | एकमेकांमध्ये योग्य अंतर ठेवा | हात वारंवार साबणाने स्वच्छ धुवा | श्वसनासंबंधी स्वच्छता राखा

आपण सर्वजण मिळून कोविड-१९ विरुध्द लढू या

अधिक माहितीसाठी संपर्क साधा

• राष्ट्रीय कॉल सेंटर क्र. +९१-११-२३९७८०४६ • राष्ट्रीय नियंत्रण कक्ष क्र. ०२०-२६१२७३९४ • टोल फ्री हेल्पलाइन क्र.१०४ .बीएमसी हेल्पलाइन क्र. १९१६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन

NHM

unicef for every child

/MahaArogyaIECBureau @MahaHealthIEC /mahahealthiec /MahaHealthIEC

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

If undelivered, please return to:

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., ए-१८०/४, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०३ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे